## प्रकरण तिसरे

# डांग जिल्ह्यातील लोककथा

३. १. प्रस्तावना
३. २. लोककथेचा उगम व विकास
३. ३. भारतीय लोककथांची परंपरा
३. ४. अभारतीयांनी भारतीय लोककथांचा केलेला अभ्यास
३. ५. महाराष्ट्रीय लोककथांची परंपरा
३. ६. डांग जिल्ह्यातील लोककथा
    ३. ६. १. देवकणसराची लोककथा
    ३. ६. २. देवटाफरा आणि निळपसौर यांची लोककथा
    ३. ६. ३. धनसऱ्या-कनसऱ्याची लोककथा
    ३. ६. ४. होली न होलाची लोककथा
    ३. ६. ५. जळींतकाराची लोककथा
    ३. ६. ६. सतरपती पाटलाची लोककथा
३. ७. डांग जिल्ह्यातील काही कथाविशेष व कल्पनाबंध
    ३. ७. १. बाहुल्यातून निर्मिती
    ३. ७. २. सोन्या-चांदीचे आकर्षण
    ३. ७. ३. परस्त्रीसंबंध व मूल प्राप्ती
    ३. ७. ४. स्त्रीची मासिक पाळी (फुलदाण)
    ३. ७. ५. प्रसूतीचे वर्णन
    ३. ७. ६. पाचवीचा विधी
    ३. ७. ७. खोटे बोलणे, लबाडी करणे, फसवणे
    ३. ७. ८. दारूची उत्पत्ती व उपयोग
    ३. ७. ९. स्वतंत्र निर्मिती
    ३. ७. १०. रूपांतरण
    ३. ७. ११. देवादिकांना कोंडणे
    ३. ७. १२. नावे धारण करण्याची पद्धती
    ३. ७. १३. जेवणाआधीचे सोपस्कार
३. ८. निवेदनशैली
३. ९. कथन स्थळे
३. १०. लोकजीवनात लोककथेचे स्थान
३. ११. समारोप
संदर्भ ग्रंथ
साधन व्यक्ती

# प्रकरण तिसरे

# डांग जिल्ह्यातील लोककथा

---

### ३. १. प्रस्तावना:

लोकसाहित्यातील लोककथा हा अतिप्राचीन वाङ्मयप्रकार असून तो सर्वार्थाने व सर्वाधिक लोकप्रिय प्रकार आहे. लोकगीतांची मक्तेदारी जशी स्त्रियांकडे जाते तशीच लोककथांची मक्तेदारी पुरुषांकडे जाते असे म्हणता येते. दोन चार व्यक्ती एकत्र आले की सहजगत्या लोककथेला सुरुवात होते. यात अनेक लहान मोठ्या लोककथांचा समावेश होतो. काही लोककथा या अनुभवावर आधारित असतात, काही कथा या सांगीवांगीवर आधारित असतात, काही सत्य घटनांवर, काही इतिहास पुराणांवर आधारित असतात. या त्यांच्या आशयाभिव्यक्तीवरून, स्वरूपवैशिष्ट्यावरून लोककथांचे अनेक प्रकार, उपप्रकार पाडले जातात. त्यात प्रामुख्याने "दैवतकथा, परीकथा किंवा अद्भुतकथा, उत्पत्तिकथा, स्पष्टीकरणात्मक कथा, दंतकथा किंवा आख्यायिका, बोधकथा किंवा प्राणीकथा, हास्यकथा, वीरकथा किंवा पराक्रमकथा आणि अनुभव कथा"[१] यांचा समावेश होतो. यांचे अजून काही उपप्रकार पाडले जाऊ शकतात. परंतु प्रस्तुत प्रकरणामध्ये विस्तार भयास्तव या लोककथांच्या प्रकारांनुसार सगळयांचा अभ्यास केलेला नाही. याचा अर्थ असा मुळीच नाही की, डांग जिल्ह्यात उपरोक्त लोककथाप्रकार आढळत नाहीत. येथेही सर्व लोककथाप्रकार तेवढ्याच प्रबलतेने आढळतात जेवढ्या प्रमाणात इतरत्र आढळतात. प्रस्तुत प्रकरणात 'देवकणसरा, देवटाफरा आणि निळपसौर, धनसऱ्या कनसऱ्या, होली न होला, जळींतकार आणि सतरपती पाटील' या लोककथांचा सविस्तर अभ्यास केला आहे.

या लोककथा विस्ताराने मोठ्या असल्याने येथे विस्तार भयास्तव अधिक लोककथांचा समावेश करता आला नाही याची मला खंत आहे. मात्र दिलेल्या लोककथांचा योग्यतो अभ्यास करण्यात आला आहे. या लोककथांचे अनेक धातू उलगडतांना त्यात हास्य, विनोद, अद्भुत, रहस्य, बोध, पराक्रम, अनुभव, उत्पत्ती यांचे प्रकर्षाने दर्शन होते. यास्तव ह्या लोककथा अनेक लोककथाप्रकारांना स्पर्शून जातात असे म्हणता येते. त्यामुळे उपरोक्त लोककथाप्रकारांतून जाणवणारे भाव याही लोककथांतून जाणवतील यात काही शंका नाही.

सुरुवातीच्या तीन लोककथांच्या म्हणजेच 'देवकणसरा, देवटाफरा आणि निळपसौर, धनसऱ्या-कनसऱ्या' या तीन लोककथांच्या शेवटी त्यांचा थोडक्यात सारांश दिला आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे त्या विस्ताराने मोठ्या आहेत शिवाय त्यांची निवेदनाची बोली डांगी असून थोडी किचकट आहे. त्यामानाने शेवटच्या दोन लोककथा 'जळींतकार' आणि 'सतरपती पाटील' या समजायला सोप्या आणि सुटसुटीत आहेत. त्यांची निवेदनाची बोली प्रमाणमराठीला खूप जवळची आहे. याच कारणाने त्यांना सारांश जोडला नाही हे लक्षात घ्यावे. चौथ्या क्रमांकाची लोककथा 'होली

न होला' ही मनोरंजनात्मक, लोककथागीत या स्वरुपाची असून ती लहान मुलांना रिझवण्यासाठी ऐकविली जाते.

ह्या लोककथा डांगच्या वेगवेगळया भूभागातून संकलित केल्या असल्याने त्यात कथकाची निवेदनशैली, त्याची बोलीभाषा, अनुभव यात खूप तफावत असल्याचे सहज लक्षात येते. असे असूनही या लोककथांत विलक्षण साम्य असल्याचेही दिसून येते.

**३. २. लोककथेचा उगम व विकास:**

खरे पाहता लोककथांचा उगम केव्हा? कुठे? आणि कसा? झाला. हे सांगणे खूप कठीण काम आहे. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे लिखित वाङ्मयाची उपलब्धता फक्त काही हजार वर्षांपूर्वीचीच आहे. मात्र मानवाच्या उत्पत्तीची परंपरा कितीतरी हजार वर्षांपूर्वीची आहे. त्याचा फक्त आज अनुमान लावला जाऊ शकतो. मानवी जीवन स्थिर झाल्यानंतर त्याला भाषा अवगत झाली असावी व त्याच भाषेतून मानव आपले बरे वाईट अनुभव कथन करत असावा. याचवेळी लोककथांचीही निर्मिती त्यांच्याकडून झाली असावी असे अनुमान करता येते.

काही लिखित वाङ्मयाचा अभ्यास करून मात्र आपल्याला त्यापूर्वीच्या काही घटनांचा अभ्यास किंवा अंदाज करता येतो. लोककथांच्या उगम आणि विकासासंदर्भात असाच एक अभ्यास भाषाशास्त्रज्ञ थिओडोर बेनफे यांनी केला आहे. तो अभ्यास थोडक्यात असा, "१८५९ साली त्याने पंचतंत्राचे भाषांतर करून त्याला विस्तृत प्रस्तावना लिहिली. त्यात त्याने असे विधान केले की, सर्व लौकिक कथा किंवा पारंपरिक कथा भारतातून युरोपमध्ये आल्या."[२] या अभ्यासाचे सैद्धांतिक नाव 'भारतमूलक सिद्धांत' असे आहे. या सिद्धांताला "कॉस्कीन, प्रो. ऱ्होस डेव्हीड्स, सर जॉर्ज कॉक्स या भाषाशास्त्रीय संप्रदायाच्या लोकसाहित्यविशारदांनी पाठींबा दिला. एवढेच नाही तर लोककथांची भारताकडून पश्चिमेकडे झालेली वाहतूक सप्रमाण सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. या सिद्धांताला पुढे ॲण्ड्रयू लँग या मानववंशशास्त्रज्ञाने कडाडून विरोध केला."[३]

"प्रसिद्ध भाषापंडित मॅक्समुल्लरने लोककथांचा उगम मध्य आशियात झाला असे मत व्यक्त करून पूर्वीच्या सिद्धांताला तडा दिला. त्याच्या मते लोककथा मूळ भारतीय किंवा वन्य समाजात जन्मलेल्या नसून मध्य आशियात आर्यांच्या प्राच्य वसाहतीत लोककथांचा जन्म झाला. त्यांच्या या मताचा पुरस्कार पुढे डासेंट, विल्हेम ग्रीम इत्यादींनी केला."[४]

तर "चमत्कारिक व अद्भुत कथांचे उत्पत्तीस्थान म्हणजे भारतवर्ष. पार्शिया किंवा अरबस्तानपेक्षा अद्भुत कथेने प्रथम भारतात जन्म घेतला. अशा शब्दात पेंझर यांनी भारतीय कथा सागराचा गौरव केला आहे."[५] असे अनेक मतप्रवाह लोकसाहित्याचा अभ्यास करतांना आपल्याला पाहायला मिळतात.

**३. ३. भारतीय लोककथांची परंपरा:**

भारत हा कथाप्रीय देश म्हणून सर्व देशांमध्ये नावाजलेला देश आहे. "जगातल्या दुसऱ्या कुठल्याही सुसंस्कृत राष्ट्राच्या पूर्वी, प्राचीनकाळापासून भारतीयांनी अद्भुतकथा, कल्पितकथा,

प्राणिकथा आणि कहाण्या यांना अभिजात चिरंतन वाङ्मयाचे स्वरूप देऊन ग्रंथबद्ध करून ठेवले."[६] या देशात प्राचीनकाळापासून कथांची समृद्ध, सशक्त परंपरा पाहायला मिळते. ही परंपरा वेदकाळापासून किंवा त्याही आधीपासून जनमानसात रुजलेली आहे असे अनेक अभ्यासांती आता सिद्ध झालेले आहे. प्राचीनकाळापासून या कथांना धार्मिकतेच्या दृष्टीने पाहिल्याने त्यांना देवतातत्त्व प्राप्त झाले. याचा परिणाम म्हणून त्या सर्वत्र विखुरल्या गेल्या, त्यांचा प्रचार-प्रसार झाला आणि चिरकाल टिकूनही राहिल्या. अर्थातच त्या जसेच्या तशा टिकून न राहता त्यात वेळोवेळी अनेक बदल होत गेले. काही भाग गळून पडले तर काही भाग नव्याने चिकटवले गेले.

"वेदवाङ्मयात कथेला किंवा कथासमूहाला उद्देशून वापरलेले अनेक शब्द सापडतात. कथा, आख्यायिका, आख्यान, व्याख्यान, अन्वाख्यान, अनुव्याख्यान, इतिहास, पुराण, अर्थवाद हे शब्द संहितानंतरच्या वेदवाङ्मयात आढळतात."[७]

"पारंपरिक कथांचा संग्रह करण्याचा सर्वात पहिला प्रसंग गुणाढ्याचा असून त्याने पैशाची भाषेत 'बृहत्कथा' हा ग्रंथ सिद्ध केला. नंतरच्या ग्रंथकारांना हा प्रेरणास्थान ठरलेला एक महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो. त्यानंतर 'कथासरित्सागर' हा ग्रंथही अतिशय महत्त्वाचा मानला जातो. 'पंचतंत्र' हा असाच महत्त्वपूर्ण ग्रंथ असून त्याचा लेखक विष्णुशर्मा याने राजकुमारांना पंचतंत्राच्या आधारे नीतीचे शिक्षण दिले. हितोपदेश, वेताळपंचविशी, सिंहासन द्वात्रिंशिका, शुखसप्तति हे ग्रंथही भारतीय संपन्न परंपरेचा पुरावा देतात. बौद्ध आणि जैन यांनीही कथांची परंपरा जिवंत ठेवली. बौद्ध जातके आणि जैन चुर्णी हे लोककथांच्या नीतिकथाप्रकारांचेच संग्रह आहेत. रामायण आणि महाभारत यांतील नीतिकथा या प्राचीन स्वरूपाच्या नीतिकथा मानाव्या लागतील."[८] ही परंपरा प्राचीन असून ती भारतीयांनी स्वतंत्ररीत्या, प्रभावीपणे विकसित केलेली परंपरा आहे असे आपल्याला म्हणता येते. ही परंपरा वेगवेळया धर्मियांनी स्वतंत्ररीत्या टिकवून ठेवलेली परंपरा आहे.

### ३. ४. अभारतीयांनी भारतीय लोककथांचा केलेला अभ्यास:

लोकसाहित्याचे अवशेष प्राचीन भारतीय वाङ्मयात सापडत असले तरी त्याचे हेतू मुळात वेगळे होते. त्याला धर्माची जोड होती. धार्मिक दृष्टीकोनातून त्याचा विचार केला जात असे. धर्माच्या प्रसार आणि प्रचारासाठी त्याचा उपयोग केला जात असे. त्यामुळेच बौद्ध आणि जैन यासारख्या वेगवेगळया धर्माच्या शाखा विकसित झाल्या. त्यांच्या प्रसार आणि प्रचाराचे साधन लोकसाहित्यच होते.

हीच नीती इंग्रजांनीही अवलंबिली. त्यांनीही लोकसाहित्याचा उपयोग त्यांच्या राज्य विस्तारासाठी करून घेतला. त्यांना माहीत होते की, येथील लोकसाहित्याचा, लोकसंस्कृतीचा अभ्यास केल्याशिवाय आपल्याला राज्य विस्तार करता येणार नाही. हेतू कोणताही असला तरी इंग्रजांनी लोकसाहित्याला शास्त्रोक्त बैठक मिळवून दिली. त्यांनी लोकसाहित्याचा शास्त्रीयदृष्ट्या अभ्यास केला, जो त्यापूर्वी कोणत्याही भारतीयाने केला नव्हता. ते जरी स्वतः अभारतीय असले तरी त्यांनी जो अभ्यास केला तो भारतीय होता. यात प्रामुख्याने लोककथांचा अभ्यास झाल्याचे दिसून येते. म्हणूनच या अभारतीय अभ्यासकांचा विचार करणे गरजेचे वाटते. यात "लोककथांचा व पर्यायाने लोकसाहित्याच्या ग्रंथांत निविष्ट झालेल्या पहिल्या संग्रहाचा मान मेरी फ्रियरच्या Old Deccan

Days या पुस्तकाला दिला पाहिजे. १८६८ साली ते बाहेर पडले. त्यानंतर मिस स्टोक्सचा Indian Fairy Tales या नावाचा अयोध्या प्रांतातील लोककथांचा संग्रह १८८० साली बाहेर पडला. १८८३ मध्ये Folk-tales of Bengal या नावाचा बंगाली लोककथांचा संग्रह निघाला. सर रिचर्ड टेंपल यांचे Legends of the Punjab, Vol. I हे पुस्तक १८८३ मध्ये प्रसिद्ध झाले."[९] या ग्रंथांच्या शीर्षकांवरूनही आपल्याला सहज लक्षात येईल की, हे सगळे अभ्यासाचे प्रयत्न भारतीय लोकसाहित्याच्या संदर्भात आहेत.

### ३. ५. महाराष्ट्रीय लोककथांची परंपरा:

महाराष्ट्राची राज्यभाषा मराठी असून तिच्या स्पष्ट पाऊलखुणा शिलालेखांच्या आधारे ७ व्या ८ व्या शतकापर्यंत सापडतात. अकराव्या शतकापासून मात्र ती गद्य पद्य वाङ्मय रुपात अवतरीत झालेली दिसते. या सुरुवातीच्या काळातील मराठी वाङ्मयातून लोकसाहित्याच्या पाऊलखुणा शोधण्याचा प्रयत्न आज अनेक अभ्यासकांनी केला आहे. संतसाहित्य आणि लोकसाहित्य, महानुभावीय वाङ्मय आणि लोकसाहित्य, शाहिरी वाङ्मय आणि लोकसाहित्य, पोवाडा आणि लोकसाहित्य यादृष्टीने तौलनिक अभ्यास आज अनेकांकडून होतांना दिसून येतो. हा अभ्यास करतांना लोकसाहित्याचा त्या त्या वाङ्मय प्रकारावर प्रभाव पडल्याचे अभ्यासकांनी दाखवून दिले आहे. लोकसाहित्याचा प्रभाव त्या त्या वाङ्मयावर पडला असला तरी ते ते अभ्यास विषय आज स्वतंत्र आहेत असे आपण गृहीत धरले आहे.

स्वतंत्र मराठी लोकसाहित्याचा अभ्यास मात्र इंग्रजांच्या आगमनानंतर आणि इंग्रजांच्या प्रभावातूनच सुरु झाला आहे. येथे लोककथांचाच विचार करावयाचा असल्याने सुरुवातीला विचार करावा लागतो तो कै. वि. का. राजवाड्यांचा. राजवाड्यांनी १९२५ साली सर्वप्रथम 'लोककथा' हा शब्द वापरला. एक उत्तम कहाणी ही लोककथांचे उत्कृष्ट उदाहरण आहे असेही त्यांनी सांगितले. पुढे 'लोककथा' हा शब्द शं. गो. दाते यांनी मराठी मनामध्ये रुळवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी १९३० साली लोककथांचा संग्रह प्रसिद्ध करून मराठीत लोककथांच्या स्वतंत्र संग्रहाच्या कार्याला चालना दिली. पुढे ना. गो. चापेकर, दुर्गाबाई भागवत, सरोजिनी बाबर, इरावती कर्वे, यू. म. पठाण, रा. चिं. ढेरे, प्रभाकर मांडे, विश्वनाथ शिंदे अशा अनेक अभ्यासकांनी लोकसाहित्याची समृद्ध परंपरा चालू ठेवली.

### ३. ६. डांग जिल्ह्यातील लोककथा:

डांग जिल्ह्यात प्राचीनकाळापासून लोककथा प्रचलित असलेल्या दिसून येतात. रामायण महाभारतापर्यंत त्यांचा संदर्भ आपल्याला जोडता येतो. रामायणातील शबरी ही एक भिल्ल जमातीची रामभक्त होती हे आता अनेक अभ्यासकांनी सिद्ध केले आहे. ही शबरी मूळची डांग जिल्ह्यातील शबरीधामची होती. शबरीधाम हे एका गावाचे नावही तिच्याच नावावरून पडले आहे. येथेच जवळच्या एका वनाचे नाव शबरीवन असे आहे. शिवाय राम आणि लक्ष्मण जेव्हा सीतेच्या शोधार्थ निघाले तेव्हा त्यांना ही शबरी मिळाल्याचे रामायणात म्हटले आहे. त्यावेळी शबरीने त्यांना चाखलेली बोरे खायला दिली असेही म्हटले जाते. ही बोरे खात असता ते ज्या दगडांवर बसले होते ते दगड आजही लोकांकडून दाखवले जातात. तेथे आज भव्य मंदिर उभारले गेले आहे.

असाच एक प्रसंग महाभारतातील सापडतो. महाभारतातील पांडव अज्ञातवासात असतांना डांगमध्ये आले होते असे सांगितले जाते. ते त्यावेळी जेथे राहिले होते ती गुहाही दाखवली जाते. येथीलच एका गावाचे नाव पांडवा असे आहे. हे नाव त्याच महाभारतकालीन पांडवांवरून पडले अशी आख्यायिका सांगितली जाते. हनुमानासंदर्भातही एक आख्यायिका सांगितली जाते. त्यांचा जन्म अंजनकुंड येथे झाला असे सांगितले जाते. अर्थात हनुमानाचे हे जन्मस्थान विवादात आहे. सांगण्याचा उद्देश असा की, डांग जिल्ह्यातील लोककथांना प्राचीन परंपरा आहे ती अशी. याशिवाय राजा महाराजांच्या कथा, भुताखेतांच्या कथा, देवी देवतांच्या कथा, शेतीवाडीच्या कथा, डोंगर दऱ्यांच्या कथा, गावकुसाच्या कथा, नदी नाल्याच्या कथा, पशु पक्ष्यांच्या कथा, घर संसाराच्या कथा अशा अनेक प्रकारच्या कथा डांगमधील खेडोपाडी ऐकायला मिळतात.

### ३. ६. १. देवकणसराची लोककथा:

## देवकणसरा

बेजपूर धर्ती हती, अरं बेजपूर धर्तीवर कोणी नी हता. अरं बेजपूर धर्ती आंग मोळचोळ करणी बरमदेवना स्थापन क्या. बरमदेवना बाहुला बनवा. बाहुला बनवा जुगदाडी ठोकी, कोरे रुमालखन झाका अन अमृत घोळी दीदा. अन बारा गुरुनी फुक मारी. बारा गुरुनी फुक मारी न बरमदेव स्थापन हुयना. बरमदेव उठी बिस्ना. बेजपूर धर्ती सांगं, आरं तूसारखा धनी मासारखी राणी खाव पेव राज करू. बरमदेव सांगं, आरं तू माला जन्म दिणीस, मा तुने हारी लगन नी करा. बेजपूरनी कानमंत्र सोडात अन येला त बेसूद करी टाका. बेसूद करी टाका न इचार करता करता एक दोन वर्सा हुई ग्यात, पण धर्तीवर कोणी माणसा नीही.

आरं माणसा नीही मग आजून इचार करणा. देव अ... यनी आंग मोळचोळ क्या, अन आंग मोळचोळ करी न बाहुला बनवा. अन बाहुला बनवी न जुगदाडी ठोकी, अन कोरे रुमालखन झाकी दीदा. अन जवा बारा गुरुनी फुक मारी, बारा गुरुनी फुक मारी. अन मोरकुचाखन झाडना लावा न मग विष्णू भगवान खडकशी उठना. अन मग सांगुला लागनी, आरं तूसारखा धनी मासारखी राणी खाव पेव राज करू. धर्तीवर देव यवा बनवू, माणूस बनवू अन आपले लगन करू. विष्णू भगवान सांगं, मा तुनेहारी लगन नी करा. तू माला जन्म दिणीस, तुवासारखी आई अन तुनेहारी मा लगन नी करा. आरं बेजपूरला चरचर घाम निघी ग्या. अन रग आणी अन फुक मारी बेसूद करी टाका विष्णू भगवानला.

हे देवा देवा इचार करं दाहा बारा वर्सा निगी ग्यात बेजपूर इचार करं धर्तीवर कोणी नी. अन आजून आंग मोळचोळ क्या. आंग मोळचोळ क्या अन महादेव शंकर भगवान आणि महेश भगवान यो एकज. येना बाहुला बनवा. जुगदाडी ठोकी, कोरे रुमालखन झाका अन बारा गुरुनी फुक मारी. अन मोरकुचाना झाडना लावात. अन महादेव उठी बिस्ना. महादेवला सांगं, ये धन्या तूसारखा धनी मासारखी राणी खाव पेव राज करू. महादेव सांग, तूसारखी राणी मासारखा धनी आपले राज करू ती खरी गोठ. पण माहारी वचन लेवा. वचन लेवा इसा करी महादेव सांगुला लागना, मा वचन लेवूला काय नी तू जी मागशील ती मा देवूला तयार. बेजपूरकर सांगं, माहारी लगन करुला तयार हुयनास मा वचनला काय मागशील ती देवूला तयार आहाव. वचनाला तयार हुई ग्या. पण मा सांगा ती वचन लीदा. तुना तिसरा डोळा आहा हुय माला देशील, तर तुनेहारी मा लगन करुला. बेजपूर धर्ती सांगुला

लागनी, आरं काय नी तिसरा डोळा दी दीदा. तिसरा डोळा दीदा अन महादेवनी फुक मारी अन बेजपूर धर्तीला भुके पाडी टाका, बेसूद करी टाका. बेजपूर धर्ती जागवर रही गय. अन महादेव आहातं हुशार बनी ग्या. तिसरा डोळा कपाळमा दपाडी लीदा.

खाल्ले खातळीला विष्णू भगवानना राख हेरी पाडं. ते राखना बाहुला बनवा अन तेनी जुगदाडी ठोकी अन मोरकुचाना झाडना लावा. अन विष्णू भगवान उठी बिस्ना. विष्णू भगवान उठवा मगं बरमदेव उठवा. बरमदेव उठवी अन काय तिघं मग बरमदेवला बरमदेव सोपा, विष्णू भगवानला विष्णूनगर सोपा अन महादेव आहात धुकेपुराला सोपा. धुकेपुराला महादेव रहना.

इंद्रदेवनी आखे तेत्तीस कोटी देवसाला देवदारकाला बोलवी लीदा. कचेरी भरणी अन इंद्रदेव सांगुला लागणा, आपले मधी आता ये जगमां पाटील नीही. पाटील थवूला लागील. सकाळने आखा देव आंगळी पांगळी, थंडीसोर राक्सस, भंडीसोर राक्सस, दानव या आखा गोळा हुयनात. आरं सोनान्या खुर्च्या, चांदीन्या खुर्च्या, पलास्टीकन्या खुर्च्या आख्या दिद्यात. चौखळामा खुर्च्या टाकी दिद्यात. आखा देव दानव खुर्च्यासावर बीसी रहनात. आखा ग्यात न महादेव सकाळने नव दाहाला उठना. अन सांगुला लागना, ये गुणाजी भारजे आरं आज माला पाटीलकी नेमुला आहात. पण तू धुकट्या परधान, तू धुकट्यामा, स्मसानमा निजणार अन तुला काय पाटीलकी नेमी देतील.

देव निगनात इंद्रदेवने दारकाला ग्यात. इंद्रदेवनी दारकाला आताच पाटीलकी नेमजं. पण महादेव नीही आणेल. महादेव आणा, विचार करना, दळ खुर्चीवर बिस्ना अन सांगुला लागना, आरं देवाहो! पाटीलकी आता कोणाला नेमुला? आरं परधान हता तो आख्यासाला सोदी हेरना. इंद्रदेवनी हुकुम क्या. आरं पाटीलकी अठं चालवूला नीही. महादेव आहा यो मजे एकदम धीरा माणूस. यला आता झोडी देसी काही सांगं नीही. इसा पाटीलकी महादेवला नेमू देवा. आरं राक्सस सांगं मय पाटील, तो सांगं मय पाटील. येहनी लडाय हुयुला हती. पण विष्णू भगवाननी सांगी टाका. महादेवला पाटीलकी देव. आरं महादेव पाटील बनना. पण महादेव पाटील बनना अन महादेवला सांगी टाकणा तुला चारी कोपरा, चारी दिसा तपासुला लागतील.

सकाळने आंगुळपांगुळ करणा अन सांगुला लागना, माला चारी कोपरा अन चारी दिसा तपासुला सांग्यात. महादेव निगना इंद्रदेवने दारकाला ग्या. इंद्रदेवनी दारकाला सांगी टाका, महादेव तू पाटील बनणास. अन चारी दिसा, चारी कोपरा तपासी यवा. आरं महादेवनी तयारी करी अन निघणा. जाता जाता पूर्व बाजूला ग्या. पूर्व बाजू तपासी टाकणा. पश्चिम बाजू ग्या. पश्चिम बाजू तपासी टाकणा. दक्षिण बाजू ग्या. तीही तपासी टाकणा. चारी बिरडा फिरुला लागणा. उत्तर बाजूला चालूला लागणा. उत्तर बाजू जाता जाता आरं खडीना रोड आणा, खडीना टाका. डांबरी रोड आणा, डांबरी रोड सोडा. पितळी रोड आणा, पितळी रोड सोडा. चांदीना रोड आणा, चांदीना रोड सोडा. सोनाना रोड आणा, सोनपूरनगरला जायी भिडणा. सोनपूरनगरला सांगुला लागना, आरं सोनपूरनगरमा तोंडी लागल्या तिसा, पोटी लागल्या भुका. महादेव सांगं अरे आता पाणी नीही काही नीही. अरे सोनपूरला केळाना मळा, जांबीना मळा, आंबाना मळा, निंबूनीना मळा, दाडिम, रामफळ, सफरचंद आखा हता. आखा फळा खावला लागना. खाता खाता तिस लागणी. मधी तळा हता, तळावजवळ ग्या पाणी पिना.

सोनपूरामधी सोनाय देवळी हती. सोनाय देवळीमा सोनावती राणी हती. सोनावती सोनाय देवळीमा पाळणावर हिसळया मारं हती. बांडगी बिसीन हिंदळं अन महादेवला हेरी पाडणी. यीनी जातीत पुरुष नी हेरेल. येला पायपासून झीट आहा. पण माणूस त माणूस, देव त देव पण अगदी कावरा बावरा यो तिने घरं ग्या. सोनावती सांगुला लागणी, ये गुरु माहाराज आरं कोण? कठून आणास? कठून नीही. येला पाणी दीदा, पाणी पिदा. चाय दिनी, चाय पिना. जराकवार न नास्टा दीदा, नास्टा करना. दिवस ग्या इसा करता करता चौखळामा येनी पथारी टाकी. महादेव निजी पडणा. अन सोनावती सांगुला लागणी, ये गुरु माहाराज आरं व्हटं आंगनामा काय निजस वटावर येवा. वटावर निजना. एकदी करता दोनदी, दोनदी करता तीनदी, अन वटावर जागा दीदी. वटावर करता वसरीला जागा दीदी. सोनावती गुरूने हारी मस्करी करुला लागणी. मस्करी करता करता महादेव सांगं, अरे देवा देवा माला आहा त पाळणावर बिसवी हिस्क. पण इसी त मानी पाराबती बायको आहा. पण ती कामनी नीही. मानी मजे बायको ती बायको. महादेव गुरु सांगुला लागणा, आरं देवा देवा यीला फुलदाणा (मासिक पाळी) आणा त सांगुला लागणी, खारट तुरट बनवी खायजो. इसा करता करता आरं पाचा पाच दिस हुयनात. यीनी गंगा मायना रस्ता धरा. कुरुफनी लीदेल, चिकणमाटी लीदेल, नवलाखनी साडी लीदी, हार लीदा अन गंगा नदीला गय. कळसन डोईला आंगुळपांगुळ करं. सोनावती हती ती चोख दुरुस हुयनी. सोनिया घडा हिरी बारवाला चोळी टाकणी. चुंबळ करं सोनिया चुंबळ लीदी, डोकीवर ठवणी. यीनी आता घडा उचला, माथावर ठवा. सोनपूराला निगी आणी. चिंदका चुंदका कुपिला वाळत करणी. सोनावती झाड झुड करणी. दिवा पाणी लावणी. भोजन बनवूला लागणी. भोजन बनवी हन महादेवला भोजन दीदा. दोनी देवता दोनी किरडा बीसी हतात. तोडेक वारमा महादेव जेवूला लागणा. पहला हात टाका देव पुंजी दीदात, दुसरा हात टाका कुतरा पुंजी दीदात, तिसरा हात टाका वळीना उंदरा पुंजी दीदात, चोथा हात टाका मुखी झेलना. जेवण करता करता अर्दा ताट वदना. न सांगुला लागणा, ये बाय आता यी कुत्रीला घाली दिजोस.

यीनी पथारी टाकी, पथारीवर या निजी पडणात. येव करता तेव सोनावती राणी सांगं, अरं गुणाजी धन्या, तूसारखा राजा मासारखी राणी. सर नदर पडणी आयना गर्भ साठायीज ग्या. गर्भ साठायना न एकदी करता दोनदी, दोनदी करता तीनदी, तीनदी करता चेरदी, चेरदी करता पाचदी, पाचदी करता दाहादी, दाहादी करता विसदी, विसदी करता महना हुयीग्या. महना करता सव्वा महना, सव्वा महना करता अडीच महना. अडीच महना हुयना न सीसी आणा. सोनावतीनी आय सांगुला लागणी, ये बुयू बुयू तुला काय हुयना? उलट्या करस, वकाऱ्या देहेस. भाकर बनव, गोड पदरना बनवी दे तरी खावायज नीही. तीन महना हुयनात, तीन महना करता चेर महना, चेर महना करता पाच महना, पाच महना करता साहा महना, साहा महना करता सात महना, सात महना करता आठ महना, आठ महना करता नव महना हुयनात. नव महना न नव दिस हुयनात, नव कलाक हुयनात, नव मिनिट हुयनात. बाईने पोटमा दुखी आणा. महादेव येव हेरं तेव हेरं. कीर्तन करुला झुग्गाधारी हती. अरे सोनपूरने घरमा सोनाय देवळीला एकाना दोन करुला आहा. चिखल्या गायी गुतण्यात तठं तुनी येवा. बे (दोन) झुग्गाधारीनी खोबऱ्यान्या नळया काड्यात. हाती काठी धरी अन झुग्गाधारी हती अन चालूला लागणी. सोनपूरनगरला आणी. न सोनाय देवळीला गय. तवडेक वारमा सोनावती आर्बड्या गर्बड्या लोळूला लागणी. मरणाने घडी जवळ आणेल. इचार करं कोणी ठीक लागं नीही. झुग्गाधारी गय अन

खोबऱ्यान्या नळया काड्यात. उखळापाळीला गय. खोबऱ्यान्या नळया काड्यात हातीवर तेल उबरा, हात मळा अन गर्भाला हात टाकणी. अन आहोळ न सवोळ बाळ क्या. आहोळ न सवोळ बाळ करी न बहाण्यापाठी बहाण्या लागण्यात. झुग्गाधारीनी बहाणी, धरतीनी बहाणी बाईला लागणा, बाईना निजा ते बाळाला लागणा. बाळ हता सोन्या दरवाजा मागं रडूला लागणा. केसी बाळ धरा, केसी सोडी कपाळ धरा, कपाळ सोडी कान झिमन्या धऱ्यात, झिमन्या सोडी नाकी धरा. नाकी सोडी गच्ची धरी, गच्ची सोडी छाती धरी, छाती सोडी पोट धरा, अन बहाण्यापाठी बहाण्या लागणा. कुली धरं, कुली सोडी जांग धरं, जांग सोडी बाळ हता बाळ धरतीला पडणा. धरतीला बाळ पडणा, झुग्गाधारीनी बाळ झेला. बाळ झेली न डोकी टीपी, आरं माथा टीपी दीदा. माथा टीपीहन सुत मांगं, सुत मांगीहन नळ बांदा, नळ बांदीहन नळ खांडा, नळ खांडीहन वरी पाडं, वरी खासीत दाबी. अन तठं कोण पोरगीनी जात. आरं देवकणसराना जन्म हुयना. सोनाय देवळी राणी हती. अगदी काकडी माकडी हती. पण देवकणसरा काळी हती. महादेव काळू त बाळही काळू. बाळ दूद वडूला लागणा. दूद खाता खाता बेजपुरा हय झुग्गाधारी निगी गय.

एकदी करता दोनदी हुयनात, दोनदी करता चेरदी हुयनात, चेरदी करता पाचदी हुयनात, आरं महादेव हता पैसा काडत खवले बजारमा ग्या. ओवा लीदा, इखंड लीदा, तेल लीदा, गुळ लीदा, शेंदूर लीदा, कुकू लीदा, हळद लीदी, पाचवीना सामान लीदा. अन महादेव घरं सोनाय नगरीला निगी आणा. सोनाय देवळीला निगी आणा. झुग्गाधारी सिनगार वटाला बीसी पडणी. सामान मांगा, सामान पुड्या दिद्यात, पुड्या वाटी दिद्यात अन येनी शेंदूर पुडी धुकली दीदी. येनी शेंदूर लावूला ग्या. थोडेक वारमा झुग्गाधारीनी दोऱ्या इन्यात, इखंड घसा, इखंड बांदा, एक हातमा पोसीला बांदा, एक हातमा आईला बांदा, झुग्गाधारीनी सोनाय राणीनी भोजन बनवेल हेरा. मग सती बरमानी पुंजळया पाड्यात. सती बरमान्या पुंजळया पाडी हन हिंदी धरी, हिंदी धरी न पाचवी कय, पाचवी करी न सती बरमा आणात अन येना अक्सर ठोका, अक्सर ठोकी अन निगी चालनात.

पाराबती सांगुला लागणी, माना धनी भुलना. आरं एक वरीस हुई ग्या पण माना धनी काय येहे नी. देवदारकाला आणी. इंद्रदेवानी दारकाला पायऱ्या चडूला लागणी. पायऱ्या चडं दारका थरथर कापं, ये धन्या महादेव काय आनेल नीही. आता देव भुली ग्या. देवा इचार करताहा, महादेव नीही आनेल. मजे काहीतरी आहा, पाराबती येवूला लागणी. अन कवा वरले देसला निगी आणी अन देवासी हेरी पाडी. पाराबती येहे आपली आता बरी गोठ नीही. महादेव भुलना हवा. आरं घरं ग्या का नीही. तठं मग सांगुला लागणी, माना देव तुमी आता न आता गवसी देसाल त बेस नीही त तुमने टेमकानी दिन. पाराबती झगडूला लागणी. माने देवाला पाटीलकी नेमना तो येडा. आरं इंद्रदेवाला एकना दोन हुई ग्या. महादेव भुली ग्या. पाराबतीला सांगा तुला आज नीही उद्या गवसी दिजन. पण जराक धीर ले. इसा सांगुला लागणा. पाराबती निगनी अन घरदारला निगी आणी.

आता जावूला कोण आहा. नारदमुनी हता अन नारदमुनीला सांगत, आठं कुकऋषी आहा. पोपट येला आता बोलवी लीदा. या आहात येला सोपवी दीदा. आरं महादेवना आता न आता तपास लावा. कुकऋषी अन पोपट आकासला धावत निगनात. जाता जाता आखा देस तपासी टाका. महादेव काय सापडं नीही. उत्तर बाजूला ग्यात, उत्तर बाजूला जाता जाता सोनायनगरला निगी ग्यात.

सोनायनगरला ग्यात अन भुका लागण्यात, तिसा लागण्यात अन मळामं ग्यात. येव जांबा खाता तेव चिकू खाता, आंबा खाता, केळी खाता. एकदी करता दोनदी, पोपट अन कुकऋषी भुली ग्यात. येव पाणी आटी ग्या. देवकणसरा हती ती वाढूला लागणी. इसा करता करता पोसी सरकत हिंडं. तोडेक वारमा कुकऋषी पोपट्या खावला पीजी ग्यात. त्याही जात नीही. इंद्रदेव इचार करह, या पोपट भुलना अन कुकऋषी भुलना. नारदाला बोलवा. नारददेवला बोलवा अन आता तेहना सोद कोण लावील. बरमदेव अन नारद निगनात. अन जाता जाता येव चेरी कोपरा तपासी टाकात. तेहना पत्ता नी लागं. आ हुंग्या हिरं माग्या हिरं या निगनात. एखादा माग लावं एखादा हुंगावत जा. अन जाता जाता सोनपूरनगराला निगी ग्यात. तोंडाला तीस लागणी, पोटाला भूक लागणी. केळा फळा खावूला लागणात. खाता खाता तळावर पाणी पिनात. आंगुळपांगुळ करत अन खाल्ले देसला हेरी पाडणात.

सोनायदेवळीने वटाला पाळणा चालं. पाळणावर दोनी देवता दोनी किर्डा हिस्कायजत तेमा पोसी बिस्नाहा. येही हेरी पाडा. तठं जायी न महादेवला पाया पडत. आरं आमनी त बरी गोठ नीही. तेणे समोर गोठ लावूला त तोडेक वारमा सोनाय हती ती घरमहालामा भरायनी, चाय धगवं, चाय धगवता धगवता येही गोठ लावी. आरं आता न आता चाल. नीही त पाराबती इंद्रदेवने चांगली झपाटा दिल. आमना मरण हुईल. आता इचार करह. आरं मा येवला यील पण मानी देवकणसरा पोरगी आहा. यी पोसीला लेसाल त मा यीन. नी त मा नी येवला. देव इचार करणात, अन मग चाय पिनात. नास्टा करणात. मागं फिरणात. इंद्रदेवाने दारकाला आणात. इंद्रदेवाने दारकाला यी न सांगत, ये भगवान आमी महादेवला गवसनाव पण तो सांगं, मानी पोसी लेसाल त मा येवला. पण आता काय करसाल. पाराबतीला जायी अन काय ठगुला. आरं तू आरती बनव. आठूनज उबडी उबडी पाया पडत जाशील त महादेव येवला आहा. नीही त घरंज नीही येवला. तो तुला सोडी जावला आहा. पाराबती ढळका रडूला लागणी. आरं काय नीही मा कबूल करं. दुसरे दिस तयारी करं. मोठा कोडेल लीदा. तेल उब्रा, आरती पेटवी, आखा देव निगनात. काळी सर्कुंडी, हळदी कुणबी, धन कुणबी अन आरक्त्या कुणबी, बरक्त्या कुणबी तेने घरं आखा देव निगनात. देव पुडं ग्यात. कुणब्या नदवूला लागनात. तिसा करता करता पानदेव अन ढगदेव निगनात. पण आता आपलेही जावला पडील. आरं जाता जाता सोनायनगरला देव जायी भरायनात. तेणे मागून पानदेव, ढगदेव, मेघदेव या ग्यात. तोडेक वारमा कुणब्याशी चाल धरी. जाता जाता सोनपूराला निगी ग्यात. सोनपूराला ग्यात. सोनायदेवळीने अठं ग्यात. आंगनामा आखा देव बीसी पडणात. नारदा हता, बरमा हता या आखा सरदाराने सौ नदरमा बिस्नात. येहला चाय पाणी दीदा. महादेवाला सांगत, आता न आता तू चालजो. पण पाराबती उबडा उबडा आरती करं. जवळ गय पोसीला जायी न आरती करणी. महादेव सांगं, मा येवला आहाव पण ये पोसीला लेसाल त मा येवला आहाव. तोडेक वारमा सोनाय राणीनी अखेसाला भोजन बनवी टाका. भोजन बनवता बनवता बाहेर निंग नीही. अन भाकरी बनवं, भाकरी बनवता बनवता यीला हग लागणी. हगी पडणी अन तठंज बाहेर निगुला हती तोडेक वारमा हगनी. तेना जातना मुळा बनवणी. मूळ बनवी न शिकावर ठवणी. बरमदेवनी न नारददेवनी हेरी पाडा. आख्यासाला जेवनला बिसवी दीदा. देव जेवत नीही. नारदा सांगह, ये महादेव! आरं ती शिकावर थवा ती वस्तू देसाल तर आमी खावला. नी त आमी काही खावला नीही. सोनाय राणीला जायी सांगं, ये गुणाजी राणी ती शिकावर काय थवा. काय नी

मात शिकावर हगी ठवन्याव यी कोण हेरी पाडणा. जातना फुक मारी मुळा बनवात, त्या मुळा कापात आख्यासाला वाटी दिदात. अर्रर... या त पाद्रट पाद्रट लागनात. आखा देव खायी ग्यात.

महादेव सांगुला लागणा, मानी पोसीला लेसाल त मा येवला आहाव. आखा देव येडी पाडी करणात. अन देव सांगुला लागणात. आरं इंद्रदेव चंद्रदेव आखा देव जायी न पोसीवरून आरती करणात. कुणबी हतात या जाय हन वखरडाला बिसनात. पोसीला नारदा जायी न उचली हेर. धरती माता आता जाहा पण पोसी उचलायज नीही. बरमा ग्या तो उचली हेरं. तेलाही नी उचलायज. इंद्रदेव ग्या तो उचली हेरं तेलाही नी उचलायज. तेत्तीस कोटी देव जायी उचली हेरनात पण पोसी काय उचलायज नीही. देवाशी इज्जत गय. आमी पाहाड उचली लेजन इसा देव आमी. आमाला नी उचलायज तू? नारदा झगडं, कुणब्या ग्या. बो बो बो कुणब्याशी तू वाय एक बुर्खुन्ड्या, लंगट्या इसा करी झगडूला लागणा. तोडेक वारमा काळी सर्कुंडी ग्या. अन तठं जायी न देवकणसराला पाय पडणा. चेरी कोपराला पाय पडणा. सांगुला लागणा, देवकणसरा असली बापनी, असली मायनी तुला आमी सेवा चाकरी करणार तू आमाला पग्या लागून ये देवाशी आब्रू लेवला हवीस त उचलायशी. इसा करी न हात जोडी इनंती करणा. देवकणसरानी बाखुंडला धरणा. एकज हाती उचला. खांदावर बिसवा. अन काळी सर्कुंडी, अर्ध कुणबी, धन कुणबी, आरक्त्या कुणबी मोहरं चालनात. देव खालं हेरुला लागनात. लंगट्या कुणबी उचली ली चालना. अन देव मागून चालनात. महादेव पाराबती चालनात. सोनाय राणी ढळका रडं. तिसा करता सोनाय राणी नी यील. अन धवळे गिराला उतरी पडणात.

मग पाराबती पोसीला मया करं. इसा करता करता पोसीला चड्डी लय दीदी. फडका लय दीदा. फदुकळ्या नेसं. तिसा करता करता पोसीला यी सांगुला लागणी, ये बुयू तू शेण झाडस आखा करस, धावती जा आख्यासाला धेन करस. महादेवने अठं एक महना करता दोन महना महादेव हता यो आता दारकाला निगी ग्या. पोसी शेण झाडं तठं जायी पाराबती सांगं, ये पोसे तुना नाव काय? पोसी सांगणी, यी शेण बचकाटी दाखव. पाराबतीला रग आणी, माला रांड माला शेण बचकाटूला लावस. यीला रग येहे, रग आपटी लेहे. तिसा करता करता यीनी नागल्या काड्यात अन यी उखळापाळीला गय. उखळापाळीला झाडी टाका. अन नागल्या उबरी पाड्यात. कांडूला लागणी. तठं जायी न पाराबाती सांगं, ये पोसे तुना नाव काय? नागल्या बचकाटी दाखव. ही रगी खुर्दी भरणी, एक लात दीदी. पोरगी हती ती ढळढळ रडं. कणसरा रडी पडणी. अन कांडूला लागणी, कांडता कांडता दळूला गय. दळी टाका, पीठ भरी थवा. चुलापाळीला गय, परात लीदी, पीठ काडा, पीठ कालवा, तवा थवा, देवकणसरा भाकरी बनवूला लागणी. पाराबती गय ये पोरगे आता न आता तू नाव सांग, नाव सांगुला गय त पिठना गोळा बचकाटी दाखवं. पाराबतीला रग आणी. रग येऊ खोटे पाराबतीनी भितुक उचला. अन देवकणसरने टोकळाला लावी दिनी. पोसीनी हाट होळी उडी गय. देवकणसराला डावली दीदा. तोडेक वारमा इचार करं, पोसी बाहेर निगनी. पोसीनी होळी उडी गय. अठं धावंदत हिंडं तठं धावंदत हिंडं. पोसीला भूजलवी थवनी. पोरगी रडूला लागणी. रडता रडता बा येता त माला सेवा चाकरीला काहीतरी औषद लयता. पण महादेव काय ये नीही. किसा आता दिवस हता आस्मानी ग्या. पोरगी इचार करं, रडत पडत महादेवने आंगुळीशी गय. पगे लागणी. हात जोडीन उबी रहनी. धरतीला उतरी गय. आंगुळीने दगडशी उतरी गय.

महादेव आणा पोसीला गवसं. गवसता गवसता पाराबतीला सोदं. ये गुणाजी भारदा पोरगी हती ती गय कठं नी कठं. हय हती. येव हिंडं उडत तेव हिंडं उडत. हय पोसी तुना येव भरमसाट उडत हिंडं. येव गवस तुना पोसी इसी सांगुला लागणी. महादेव हता आख्य गावमा सोद लावं. अन सोद लावी त पोसी काय सापडं नी. धवळे गिराला अखे तपास लावं. पोसी काय सापडील नीही. इसा करता करता एकदी करता दोनदी, दोनदी करता तीनदी, तीनदी करता चेरदी हुई ग्यात. पोसी काय सापडं नीही. महादेव भुलना इचार करता करता आंगुळीशी ग्या. आंगुळपांगुळ करुला बिसना. तोडेक वारमा पोरगी हती, पोरगीनी डीरा काडात. देवकणसरा वास्टासारखा निंगुला लागनात. महादेव इचार करं, अठं काहीतरी भविष्य निगं. माला आता मरणा कर्जील. महादेव सांगं, नारदाला बोलवा. मग नारदाला बोलवी लीदा. आरं माने आंगुळीशी काय निंग. ती जराक वळखी हेरा. देव वळखी हेरत. वळखायजील नीही. देव कोंडी दिदात. इंद्रदेव आणा, इंद्रदेव वळखी हेरना तेलाही नी वळखायज. तेलाही कोंडी दीदा. भगत बोलवी लया, भगत वळखी हेरं. खडी पुडी वाचं. खडी पुडी वाचं तरी तेहसाला वाचायज नीही, वळखायज नीही. भगत मोठ्ला मोठ्ला कोंडवी दिदात. सूप चोळ्या गुरु लया, सूप चोळ्या गुरुही खडी वाची वाची तेलाही नी वाचायज. तेलाही कोंडी दीदा. महादेव खाल्ले कातळीला ग्या. वाण्या बामन्या लयात. वाण्या बामन्या पोथी पुराण वाचनात. तेवर तपास लावं. तेवर उंगं न मावळं आता पैसा लेवा इसा इचार करं, पण या धरात तेहला वळखायज नीही त कोंडी दिदात. इसा करता करता तेव हिंडता हिंडता चंद्री गुरु लया, चंद्री गुरूला वाचायज नीही तोही कोंडी दीदा. मावची गुरु लया तोही कोंडी दीदा. वारली गुरु लया तोही कोंडी दीदा. कोळी गुरु लया तोही कोंडी दीदा. तेलाही नी फुटील. देव कुणबी हता, अद कुणबी, काळीसर कुणबी हता. पानदेव लया, पानदेवही कोंडी दीदा. तेलाही नी वाचायज. वळखा नी निंग अन काळसर कुणबी ग्या. कुणबी सांगुला लागणा, ही पोसी हती तीज आहा. मग कुणबी सांगुला लागणा, ये भगवान! आता न आता या देव आखा सोडी दे. या आमी वळखनाव यीलाज तुला चाकरी करुला पडील. आरं काय नीही आमा नीही चाकरी तुमी करा इसा सांगुला लागणा. कुणबी सांगुला लागणा. आखा देव सोडी दे. देव काय घरं ग्यात. आरं एक महना कोंडी दिदला. देव आखा खट्या अन दाडी वाढवी देव जेणे तेणे घरं ग्यात. बायकाशी वळखी टाकात देवालासा नी वळखायजील. आरं कोण आहात? कुणबी सांगं, ये भगवान आता न आता येला आऊत बनव. येला आता सर करुला लागील. तेला नागलीना फाटा निगनात. भातना फाटा निगनात. अन उडीदना तुरीना फाटा निगनात. वरीना जुवारीना फाटा निगनात. भादलाना बाजरीना फाटा निगनात. जाग जागं बारा कीर्तन आठरा वर्णा निगनात. अन वळखा ये तेनी आखा रोपी दिदात. रोपणी कय, रोपणी उपटी अन तठं थवी दीदा. महादेव सांगं ज वाटा देवला. महादेवनी आखा भरी थवा. कुणबीला दाणा नीही दिल. तेनी लंगटी तोडी डगला काडा आखा खोक्रवी टाका. महादेवनी धरी न डोकी भाद्री टाकी.शेंडी राखी न कुणबी तंगाडात. वरले दारकाला ढळढळ रडत पायऱ्या उतरनात तठं खालले पायरीशी आणात.

देवकणसरा हती उडनी पडनी अन पायऱ्या जायी न पोसी हुई बिसनी. ये बाबा काहा रडस आरे पोसे पोसे तुला सांगी न तू काय करशील. पण बा त सांग जराक काय हुयना. आरे महादेवने अठं एक वरीस खेती कारणाव पण आमाला एक दाणा नी दिल. अन आखा मुस्कामा दाणा भरी न तोज ठवना. इसा आमनी लंगटी तोडी टाकणा. डगला काडी टाका, डोकी भाद्री टाकी. अन आमाला दाणा

नीही दिल. घरं जायी न आईसासला काय दाखवू. इसा करी न कुणबीनी सांगी टाका. ये बाबा घरं जावा. मुस्का सारवा, वसरी, उखळापाळी सारवजोस. दिवापाणी लावजो. उखळाला जायजो अन उखळा जायी न डोकी खाजवी पाडजो. डोकी खाजवी न मुस्का मांडी देजो. आरती करुला लावजो आयाला. उडणी पडणी पोसी न अल्पित हुई गय. कुणबी हेरं पोसी अठं हता न केव ग्या.

घरं ग्या न बायका सोदुला लागण्यात, ये धन्या! केव र धान्य केव? आरं काय धान्य धान्य गाड्या मागून येत्याह्या, टेक्टरा भरी येताहा. तुमी घर सारवी देवा, दिवापाणी लावा, आरती करवा इसा सांगुला लागणा. उखळापाळीला ग्यात अन कुणबी हता, कुणब्याशी डोक्या खाजव्यात शेंडीलाहून धार पडणी. धार आहा त नागल्यानी धार, भातानी धार, उडदानी धार, खुरास्नूनी धार, भाज्यानी धार पडूला लागणी. मुस्क्या भरुला लागण्यात. महादेवन्या मुस्क्या रिकाम्या हुई ग्यात. कुणब्याशी मुस्क्या आता भरी ग्यात. बायका हेरुला लागण्यात. धने धने दारकालाहून धान्य यी ग्या.

महादेव एकदी करता दोनदी, तीनदी करता चेरदी, महना पाठी महना ग्यात. महादेव सांगं ज कुणबीने अठं पाहणा जाव, पण पाहणा जायी न त्या काय खाताहा ती हेरी येव. कुणबीने अठं महादेव पाहणा ग्या. गुरुना रूप ली न ग्या. सौ नदरना बिसना. तोडेक वारमा बायकाशी हेरी पाडा. त चाय धगवी ती दीदी, मग आंबील दीदी, आंबील पिना अन जराक वारमा भाकरी दिद्यात. भाकरी दी न कोणा आखू दही तूप दीदा. महादेव खावला लागणा. वाय करी खा न मुस्क्यासाला हेरं. येला मय दाणा नीही दिदेल. पण ह्या होडा कठून लयना. महादेव रामराम करना अन धवळे गिराला निगी ग्या.

पाराबती सांगुला लागणी, काय र धन्या काय करताहा? आरं तेहन्या त मुस्क्या भरेल धान्य. तेही तूप दीदा त माला खावायज नीही इसा दीदा. आर्रर... तू खायी आणास? आपलेही बनव र देवा. ही मुस्कात जायी न हात घाली न काडी हेरं, भातनी मुस्की हेरं हाल लावताज कली पडणी. नागल्यानी मुस्की कली गय. येमा त धान हता. आरं कुणब्याने अठं निगी ग्या. अन ही इचार करं, आपला धान्य ग्या. आता धान्य नी मीळ. आपले आता कुणबीला सांगू, आपले आहा त शेती भाजण करू. कुणबीशी त खांडूला लागनात. आपले पाथी करू. आपले पाथी करुला अन तू त बेस नीही. मग पाथीही नी करुला. मा त वरला माल लेवला अन खाल्ला साड तू लेवला. काय नीही कुणब्या होकारी पडणा. आरं कुणब्यानी वावर खेडी टाका. येणी भूयमुग लया, भूयमुग पिरा अन वरला सावंगी टाका. कुणबी सांग, ये भगवान आरं तुना आता वरला ली ले. अन आता आमाला काय नीही. आरं येणी पालासकट काम करी न उडवा क्या. पाला चोळी हेरं तेमा दाणा पण नीही. कुणब्यानी ह्या आवता धरी न ह्या आख्या शेंगा काड्यात. शेंगा मुस्कामा भरी थव्यात. महादेव सांग, कुणबी नीही ठगायजील. कुणबीला सांग, आरं कुणब्या इसा नीही. आता बुटीना न वरलाही मांज लेवला. त काही नी भगवान वरलाही अन बुटीनाही तुज लिजो. येही शेती करुला बिलगनात. तेही मकीना बियारण लयनात, पिरी दीदा, मकी निसवायी पडणात. आंग्री काप्यात अन उडवा करी दीदा, साठा करी दिनात, बेस गोळा करी ठेवनात. महादेवला सांग, हे भगवान आखा तू खणी ले, मुळा खणी हेरणात तेमा दाणा नोको का शेंगा नोको. कुणबी ठगायज नीही. पण आता काही नीही देवासाला सांगी टाकणा. इंद्रदेवाने दारकाला ग्या. देवासाला सांग, आरं औंदने वरीसला डोंगरला पाणी पाडूला, अन खालं पाडूला नीही. कुणबीनी पोपट पोसेल अन पोपटनी आयकी पाडा. अन पोपट आयकी न आणा. पोपट कुणबीला सांग, ये बा! औंद

पाणी नी वर्सुला. औंद पाणी डोंगरला वर्सुला. अन कुणब्यानी डोंगरला पिक काडा. कुणबी ठगायज नी. आरं मागले वरीस आगायज आर्डील तेवर तेही तांबी दीदी. आरं देडोक आहा त खावाड पेवाड क्या अन तोंड आवकळी दीदा. नील पाखरू अन चुईना आवाज बंद, कुहुना आवाज बंद, पाय किडाना आवाज बंद, चाटू कोकाना आवाज बंद, जो आर्डील तेवर दंड. येही सांगी टाका. पोपट सांगं, ये बा! पाणी वर्सुला नीही. जो आर्डील ताहाज पाणी येवला आहा. ताहाज ढग निंगुला. येणी घर चातुर्मा येणी औत काडा, नंद जुपा, अन भर जात्रामा खेडूला लागणा. अन देडोकने बुजमा फाळ ग्या. अन देडोक आरडी पडणा. आआं... करी न देडोक आरडी पडणा. देडोक ड्राव ड्राव करणा. तोडेक वारमा चुही आर्ड, मग कुहू आरडनी, पाय किडा आरडाना, अन ढग निगनात. वारदेव निगनात. पाणी पाऊस देवला लागनात. देवाशी कचेरी भरणी. देव सांग, कोण पुडं आरडना? पुडं त चाटू कोका आरडना. अन तेवर कोण आरडना? तेवर पाय किडा आरडना. तेवर कोण आरडना? तेवर कुहू आरडनी. तेवर कोण आरडना? तेवर चुही आरडनी. चुही सांग, मा त नी आरडनेल. आरं देडोक आरडना. देडोकला जायी सोदं. देडोक सांग, कुणब्यानी माने बूजमा फाळ घाली दीदा. लकवा इत किगळी पडणाव. कुणबी काय ठगायज नीही.

देवकणसरा कुणबीनी हठून निघनी अन् जाता जाता रांड गांडूसे अठं गय. रांड गांडूसाला जायी सन पोसी हुईन तठं सांगं, ये आया! माला एक घास भाकर दे. अन तठज रहुल लागणी. रातभर रहणी अन् सकाळने उठी झाड झुड करुला लागी गय. पाणी, बासना चोळूला लागणी. अन् तोडेक वारमा पाणी लय. भाकरी करवी न डोसाला जेवाडूला लागणी. बुयू डोसीनेज घरं रहणी. एकदी करता दोनदी पाचदी डोसीना घरदार सांदायजी जाहा. तठं एक कोंबडी हती. कोंबडी आता पिला काढणी, कोंबडीनी कोंदडा भरात. कोंबडा इकी दिनी. तेवर शेळी मेंढी लिनी. शेळी मेंढीनी गोंदण्या भऱ्यात. गोंदण्या भरी न गावत्री लिदी. गावत्रिनी गोठा भरी ग्या. तिसा करता करता डोसी एकदाज सांदायजी गय. मोठी श्रीमंत हुयनी बजारमा हिंडूला जा त पोसीला हेरं नी काही नी. अन् देवकणसरा हती ही इचार करं. आता डोसीला चरबी चढणी. डोसी येव जा तेव जा. शेळा पण नीही खा, झुगारी देहे. देवकणसराला रग आणी.

रगमाज कुणब्याने अठं गय. ते दोन भावळी हतात. वाटा पाडी लिनात. दोघं भावळीसी शेती कय. वडीलनी शेती चांगली, धाकला भाऊसनी शेती नीही. तेनी बायको सोय नीही करं. आठ दिसला आंगळं. अन् कपडा त बदली बदली नेसं. इसी करी बायको सोय नीही करं. देवकणसरा थाकी गय. कुणबी हता ढळकन रडूला लागणा. खळामा पिक मोळूला लागणा. बारीक भाऊस सुपडा भरी ली पोळं.

देवकणसरा तठून निगनी देवदारकाला महादेवने तठं गय. महादेवने अठं पोसी बांडगी आहा. यी बांडगीजं नारणदेव सांगं माला करता. बरमादेव सांगं माला करता. आखा देव झुंबायजी पडणात. एखली बायको, एखली पोसी पाच मिनिटमा भोजन बनवह, आख्यासाला जेवाडह. पण पोसी कोणाला करुला मानं नीही. देवाशी धवळे गीराला कचेरी भरणी. पोसीला फसवुनी कामगिरी पानदेववर सोपी. पानदेव आणा, पाणी मागुला लागणा. तीसाज चाळावर लिहणा. देवकणसराला मटकन हातीला धरणा. अन् देवकणसरानी उसबाडी लावा.

देवकणसरा इंद्रदेवाने दारकाला गय. पायऱ्या चढूला लागणी. तठं सव्वा महिनाना लगन हता. सुखदेव मादळी वाजवूला लागणा. रंभापातळ नाचुला लागण्यात. मग सुखदेव मादळी भूकायजी ग्या. तो सांगुला लागणा, ये रसोड्यादेव! आमाला जेवण देवा. तुमना रसोडा तयार आहा. तुमी जेवूला येवा. आख्येसी हात धवात, तेत्तीस कोटी देव पंगतीला बीसी ग्यात. लापसी दीदी, पुऱ्या दिद्यात, खमण दीदा, भात दीदा, डाळ दीदी अखा दी दीदा. अन् देवकणसरानी वायुदेवना चिंतन क्या. वायुदेव आणा, देवकणसरानी कुहेट कुहेट वारा सोडी दीदा. आख्येसे नाखरूटमा भरायजी ग्या. येहला जेवण नीही जा, वकाऱ्या देताहा, उबगाऱ्या देताहा, नाक दडपताहा, तोंड दडपताहा. इंद्रदेवनी आदेस करा. काय कुहेल आहा ती गवसी काडा. डुक्कर, कुत्रा, मांजर, धांड्या काय कुहेल हवा ती गवसा. काय घनायजह गवसूला लावा. गवसता गवसता उखरडाला सोडीला हेरीपाडा, यीज घनायजह. देवकणसरा वळखाज नीही. डोसीला सांगत आता न आता निघी धाव. डोसी सांगं, वाय बारीक माला भगरनी ढेकळी द्या. मा खायनी निगी जायीन. पण कोणी एक दाणा नीही दिदेल. मग वारा बंद हुई ग्या. देव वायसेक जेवणात. देवकणसरा उडणी पडणी धरतीला उतरी पडणी.

हिमाय देवीला सांगा, ये बुयू बुयू मा तुने घरं आण्याव. अन् काहा व बुयू रडतज. काहा आज बेस नीही. देवने दारकाला गयेल. माला जेवण नी देतील. बुयू हठं शिकावर जी हवा ती बनवी खायजोस. तू कोणाला देशील नोको. मा चालण्याव यहु कन्यापाशी चाचण्यापुरीला. चाचण्यापुराला गय यहुला सांगं, ये बुयू आठं देव येतील त माना निरोप सांगशील नोको. मा त सातीसारणे दाबुला जाहा. पाणीना डॅम बनवूला आणेल. देव कोठला मोठला आहात. या तेत्तीस कोटी देव. खाना खाई न बीसी रहत. गांडीमा कन (कळा) निग. देवकणसरा चाचण्यापुराहून देवदारकाने आन पानदेवाने सारणीला गय.

सारणीला जाय हन उघडी नागवी सारणी सात्या सारण्या बाबीहून देवकणसरा निगी गय. झरा आटी ग्यात, इरून हिरी आटी ग्यात. पाणीना खाकडा नीही. आनना खाकडा नीही. मुस्का घटी ग्यात. सुखदेव मादळी, रंभापातळ या सांगुला लागनात, रसोड्याहो आमाला जेवण देवा. भूक लागणी. भुक्याजी पडणात. पाणी लया, पाणी टाक्या भरेल हत्या. टाकीसामा पाणी घटी ग्या. गुंडामा पाणी नीही, घागरमा पाणी नीही. रसोडा हता, रसोडामा डाळ नी मिळ. काय पाणी नी मिळं. अन्न नी मिळं. देव सांग जेवण नीही. रसोड्यादेव घाबरी ग्या. जेवण काय कुतरा खाई ग्यात का मांजरा खाई ग्यात. येव तेव हेरा पण कठज काही मिळणेल नीही. देव मरणे दारमा यी ग्यात. शेवटे चाचण्यापुराला नारदाला दवाडा. नारदा हिमाय देवीला जायी सांगं, ये बुयू! काही हवा त खावला दे. हिमाय सांग, आरं बारा वर्सानी आंबेल आंबील आहा. तेमा किडा पडी आहात. तरी नारदा ती आंबेल आंबील ली देवदारकाला ग्या. आता देवाहो घाबरसाल नोका मा आंबील लयनाहाव. देवासाला ती किडावाळी आंबील खावाडी. देवसाला किडावाळी आंबील खाई एकदाज हगरी लागणी. देव खालले खातळीला जायी पक्का रडणात. मग नारदानी बारा वर्सान्या वाळेल भाकरी लयात. देवशी त्या भाकरी खडकवर ली कुटी टाक्यात, फोफरवी खाद्यात, फोफरत नी त घोगीमा अटकत, डोळा बटबट काडूला लागनात. नारदा धावंदत ग्या हन बोचीने एक एक धूमावाळी दिद्यात. तिसी भाकर बाहेर पडणी. डोळा काढता काढता बचवात. तेहला देवकणसरा वळखाज नीही तेनी यी शिक्षा. मग देवकणसरा नी वायू देवाला सांगा, ये वायू देव आता न आता धाव न देवासे गांडीमा वारा भरी न खालले खातळीला हेलपाटी

देवा. वायू देव ग्या न अखे देवासाला खालले खातळीला हेलपाटी दीदा. देवांगणीसे भोत्यामा, लुगडामा वारा भरायजी तेहलाही तेव खालले खातळीला झुगारी दीदा.

मग नारदा यहुहारी देवकणसराला मिळूला ग्या. देवकणसरा रगवायजेलज हती. पण नारदानी हात पाय पडी देवकणसराला सांगा, बुयू! तू काहीतरी दे नीतं आखा देव मरी जातील. मग देवकणसरा सांग आता घरी जावा अन पाणी वरशील. पण देवकणसराला वळखजा. एक भगरनी ढेकळी पण दिदेल नी तेनी यी शिक्षा दीदी. नारदा ग्या. तिसा पाणी आणा, इहिरी भरी गयात. नयला पाणी यी ग्या, मुस्क्या भरी गयात, रसोडामा रसोडा बनी ग्या. इसा जेव तेव बेस हुई ग्या. पण देवकणसराला वळखजास. ती अखे देवसामा मोठी देव आहा. तिने वगर ये जगमा काहीज रह नी.

**सारांश:**

महादेवाला पाटीलकी दिल्याने तो चहुबाजूला फिरता फिरता सोनपूरनगरीला सोनायदेवळीला सोनाय राणीला भेटला. त्यांच्यात प्रेमाचे संबंध स्थापन होऊन देवकणसराचा जन्म झाला. एकीकडे पार्वती महादेवाची वाट पाहून थकली. तिने इंद्रदेवाला धोक्याचा इशारा दिला. 'माझा नवरा (महादेव) शोधून द्या नाहीतर योग्य होणार नाही.' लगेच इंद्रदेवाने नारद आणि ब्रह्मदेव यांना पाठवून महादेवाचा शोध लावला. पण महादेवाने अट घातली की, माझ्या मुलीलाही (देवकणसरालाही) घरी घ्याल तरच मी येईल, अन्यथा नाही. इंद्रदेवाने अट मान्य करून महादेवाला पार्वतीच्या हवाली केले.

महादेव घरात नसता पार्वतीने पेटत्या लाकडाने देवकणसराला मारले. त्यामुळे देवकणसरा रागावून महादेवाच्या आंगुळीशी जाऊन धरतीला उतरून जाते. मुलीचे रुपांतर शेतीत होऊन ती तेथे उगवते. परंतु ती कोणाकडूनही ओळखली जात नाही. शेवटी कुणबी तिला ओळखतो. महादेवाच्या सांगण्यावरून तिची सेवा करतो. शेतीचे पिक सर्व महादेव घेतो. आणि कुणबीला तेथून हाकलून देतो.

कुणबी रडत असता देवकणसरा मुलीच्या रूपाने भेटते. ती कुणबीला घरी जाऊन डोकी खाजवायला सांगते. कुणब्याने तसेच केले असता त्याच्या शेंडीतून धान्याच्या धारा पडायला लागतात. त्याचवेळी महादेवाच्या कणग्या रिकाम्या होतात. म्हणून महादेवाने कुणबीबरोबर शेती करण्याचे ठरवले. त्यातही महादेवाने कुणबीला फसवण्याचा प्रयत्न केला मात्र कुणबी काही केल्या फसत नाही.

एकदा इंद्राच्या द्वारकेला सव्वा महिन्याचे लग्न असते. तेथे देवकणसरा म्हातारीचे रूप घेऊन जाते आणि थोडेसे खायला मागते. तेथे अनेक गोडधोड पदार्थ असतांनाही म्हातारीला कोणीही काहीही खायला देत नाही. यास्तव ती तेथून रागावून निघून जाते. तिच्या प्रकोपामुळे तेथील अन्न पाणी नाहीसे होते. देव अशावेळी नारदाने आणलेली बारा वर्षांची आंबलेली आणि किडे पडलेली आंबील खातात. नंतर ते बारा वर्षांची वाळलेली भाकर खातात. त्यामुळे त्यांच्या तब्येती बिघडून आणि अन्न पाण्यावाचून ते मरणाच्या दारात येतात. मग नारद देवकणसराला विनंती करतो की, आता देवांना काहीतरी खायला दे नाहीतर ते मरण पावतील. त्यावेळी देवकणसरा सांगते, मला देवांनी थोडेसेही खायला दिले नाही म्हणून ही शिक्षा दिली.

यापुढे सर्वांचे चांगले होईल मात्र देवकणसराला कोणी विसरू नये. कारण ती सर्वश्रेष्ठ आहे.

### ३. ६. २. देवटाफरा आणि निळपसौर यांची लोककथा:

**देवटाफरा आणि निळपसौर**

सुर्यादेवने बहणीसना नाव मुरुदेवकन्या. सुर्यादेवने बहणीसन्या सुर्यादेवनी पत्रिका काढ्यात. पत्रिका सापी वायुदेवापाशी दिद्यात. तेनी मग आख्य सहा नगरमा पाठवी दिद्यात. सहा नगरमा पाठवी न मग काय कोणी निळूपांडवनी इचा अन वाची हेरना. मग सांगुला लागणा, सुर्यादेवने बहणीसला मा पर्नील त मा काहीतरी मोठा हुई जाईन. इचार करी न सुर्यादेवने दारकाला ग्या. वरले तळावला जाय राम राम करुला लागणा. येहनी पत्रिका इचा. मजे माजे बहणीसला पर्णुला आणा. त काही नी माने बहणीसला पर्नुला आणास त मा सव्वाखंडी तीळ पिरीन ती तू आळवटी दे माला. मग तू माने बहणीसला हाती धरीन ली जावा. सव्वाखंडीने काळेवावरला तीळ पिरी दीदी. तीळ पिरी हन निळूपांडवला ली न काळा वावर दाखवी दीदा. काळा वावर दाखवा न मगं निळूपांडव आळवटी दिल. तीळ ती काय इचायजत? ती इचता नी यील. मग सूर्यादेवला सांगं, भावड भावड! माला संडास लागणी. संडास करुला जाय याह्या. मग संडास करुला एक झुरुड आड करता, दोन झुरुड आड करता सुर्यादेवला ठगी पळणा.

मोठे भयंकर जंगलमा निगी ग्या. तठं इंदोलीदेव हता. इंदोलीदेव भयंकर जंगलमा मोहरने मागले हिंड. कडाला मोठे पाबोरमा हिंड हता. येणी एक दोन मोहरी काढ्यात. एक दोन मोहरी काढीन तेव झुरडालत निळूपांडव ग्या. तोडेक वारमा इंदोलीदेव सांगं, ये निळूपांडव कठं जाहास? निळूपांडवनी पत्रिका झुगारी दीदी अन तेलाही हानी टाकी निगी ग्या. इंदोलीदेव सांगं, इ कागद कठला. कागद येणी इचीन वाची हेरा. बो बो सुर्यादेवनी बहिण जो पर्नील तेला त महाल देवला आहा.

इंदोलीदेवनी कासिटना टोकर तोडा अन तेना बारा नाडमा मध भरीन सुर्यादेवने दारकाला ग्या. वरले तळावला जायी न सुर्यादेवला सांगं, राम राम भावड. पण सुर्यादेव राम राम घाल नी. यो आंगळ नी काही नी लंगट्या अन माने बहणीसला पर्नुला आणाहा. इंदोलीदेवनी एक नाड काढीन मद चाटूला लागणा. मद एखलाज खायना. मग दुसरा नाड काढा. ये भावड यी लेरं मद खाशील त. सुर्यादेव काही हेरं नी. तोडेक वारमा येणी बारा नाडमाहून अकरा नाड मद खाय लीदा. सुर्यादेव हेरुला लागणा. सुर्यादेव धावंदी ग्या. खपटा चाटी हेरं त यो त मद लयना. काय भावड काम पडणा. तुनी बहणीसला मा पर्नुला आणाव. मा तुने बहणीसला परनले शिवाय रहणार नी. तुने बहणीसना घुड काय आहा ती माला दाखव. माना घुड काय नीही. 'काळे वावरला सव्वाखंडी तीळ पिरी, ती सगळी तीळ इची देवा. ती तीळ पूर्ण शेरला शेर मापला माप भरी देवा. न तुनी माने बहणीसला हाती धरी ली जावा.' इसा करीन सुर्यादेवनी सांगा. येला नी इचायज इसा करीन सुर्यादेव त पलंगला बीसी ग्या.

इंदोलीदेव इचार करं. आरं देवा देवा! सव्वाखंडी तीळ काळे वावरला पिरी हन इंदोलीदेव इंदोलीगडना चिंतना करणा. इंदोलीसाला जाय सांगुला लागणा, ये मोठे बुयू! मा घुडमा पडणाव. सुर्यादेवने दारकाला आताना आता येवा, काळे वावरला येवा. काळे वावरला यीन ती आखी तीळ इची देवा. नीही त माना मरणा हुई जावला आहा. इसा करीन इंदोलीदेव काळे वावरला जायी दगडवर बीसी रहना. इंदोली उडण्यात नी उडण्यात त इंदोलीदेव हता तठं उतरी पडण्यात. इंदोली राजाने समोर गयात. बाबा काय संकट पडणा? बुयू, काळे वावरमा यी तीळ पिरी दीदी. आता यी तीळ आखी इची

द्या. मा सुर्यादेवने बहणीसला पर्नुला आहाव. मानेहारी ती लगन करुला आहा. माला यी तुमी तीळ इची देवा अन मग निगी जावा. आख्या इंदोली काळे वावरला उडी पडण्यात. पात धरी तीळी इचुला लागण्यात. झोऱ्या आथरेल तेमा सासवूला लागण्यात. पण तेमा एक इंदोली गरोदर हती. तिना गर्ब पडी जाईल इसा करीन दोन तिळ्या ती गिळी खायनी.

इंदोलीदेव सुर्यादेवला सांगं: ये सुर्यादेव आता तुने मापला माप, शेरला शेर या तिळ्या ली लेवा. अन बहणीसला माला देवा. शेर भरुला लागणात, एक शेरमा दोन तिळ्या घटुला लागण्यात. यम दोन तिळ्या वस्या आहात. त्या दोन तिळ्या पुऱ्या करीन मग माने बहणीसला हात लावा.

इंदोलीदेवनी आख्या इंदोलीसाला बोलवी लया. आख्यासे बोचीला धरा. ताहा एक इंदोलीनी दोन तिळ्या काढ्यात. त्या ली न सुर्यादेवपासी ग्या. ये भावड या तुण्या दोन तिळ्या ले अन बहणीसला माने हाती देवा. सुर्यादेव ढळढळ रडूला लागणा. सुर्यादेवनी बहणीस मुरुदेवकन्यानी तयारी करीन इंदोलीदेवने मांग मांग चालूला लागणी. जाता जाता इंदोलीगड चढूला लागणी. दोनीजना घरं ग्यात. खावला बनवा. खायीपी निजी ग्यात.

मुरुदेवकन्याला फुलदाणा (मासिक पाळी) आणा. एकदी करता दोनदी, दोनदी करता चेरदी, चेरदी करता पाचदी येणी चिकन माटी ली मुरुदेवकन्याला दीदी. या आता शिणगार पेटी फोडीन नव लाखनी साडी काढी, बोचक्या बांदा अन गंगा नदीला निगी गय. गंगा नदीला जायी न चोपड्या खडकला बीसी पडणी. चिकार माटी काढीन खडकवर फोडी, हातवर पाणी ली माटीला शिपुला लागणी. शिपीन हातवर माटी लिनी. मळंदुला लागणी. तिने मळंदू डोकी माथाला लावा. डोकी माथा धवी चोख दुरुस्त हुयनी. काळे डोहिमा उडी पडणी. झुमक्या फोडूला लागणी, झुमक्या फोडता फोडता बाहेर निगनी. नव लाखनी साडी काढी. जुना पिसा सोडी टाकणी. मुरुदेव नव लाखनी साडी काढणी, वडीताडी नेसुला लागणी, मिऱ्या घोळी पाडुला लागणी, मुरु कास्टा देवला लागणी.

मागं फिरणी, घरदारला आणी. घरदारला यीन भोजन बनवूला बासन कुसन चोळी टाका. घरदार झाडी टाका. बंगाळ्या भात काडा, यळण्या सुपडा काडा, खैऱ्या मुसळ काडा, भात उखाळावर लिदा, कांडुला लागणी, सडी तांदूळ काढात. भोजन बनवी दोनी देवता जेवूला लागणात. जेवता जेवता रात पडणी. पण मुरुदेवकन्या सांगं, बाबाला त गोड पदार्थ एकदाही दिदेल नी. आरं ये धन्या मा बाबाला भोजन ली जावला आहाव. यीनी आखा भोजन डालखामा भरा, दुर्डामा भरा. जाऊनी तयारी करी. अन् धन्या सांगं, नोको गुणाजी भार्यू नोको व जास. मा अठं काय एखलाज करू. यो रडुला लागणा. पण मुरुदेवकन्या मानं नीही. यीनी आहा त टोपला भरा, चुंबळ कय, डोकीवर भोजन थवा अन वाटला चालुला लागणी.

इंदोलीदेव मागून रडत चालं मुरुदेवकन्या मोहरं चालं. जाता जाता नदर पुरं ताव उभा रहीन हेरं. आजू मुहरं चालं. इसा करता तो पोळश्या वनला ग्या, पोळश्या गडाशी ग्या. अन येनी नदर नी पुरं. पोळसवर चढूला लागणा. मुरुदेवकन्या जीसी मोहरं जा तिसा तिसा यो वर वर चढ. इलाज नदवं यो इचार करं, रडत जा न चढत जा. इसा करता करता यो पोळसने शेंडाला चढी ग्या. शेंडाला आहा त फांदी नीही. यो पोळसवरहून निसटी पडणा. निसटी पडत खोटे येना मरणा हुई ग्या.

मुरुदेवकन्या सुनेवन खंडाला चालूला लागणी. सुर्यादेवने दारकाला जावला हती. निळूपांडव राजाना राजवाडा आणा. ये राजवाडाला गय. निळूपांडवनी मुरुदेवकन्याला हेरी पाडा. यी मानी इज्जत लिहनी. आता माही यीनी इज्जत घालवूला आहाव. मगं निळूपांडवनी शिपाना दुकान टाकी रहना. साड्या ले साड्या इसा करीन मुरुदेवकन्याला सांगुला लागणा. साड्या दिद्यात. मगं लोटी (कासार) हुई पडणा. बांगड्या भरा, बांगड्या भरा इसा करीन मुरुदेवकन्याला बांगड्या भरव्यात. रिबीन तुरा माळीन मुरुदेवकन्या बांगड्या खळाळवत मुहरं चालणी. निळूपांडव मुहरज जायी न सोनार बनणा. सोना-चांदी पेहरवी दीदा. कानमा कुंदळ, गळामा साखळा माळी दिद्यात. पण मुरुदेव मानं नीही.

आरं देवा देवा! पाच वाजनात दिवस ग्या. न यीला आंदारा पडत आणा. तोडेक वारमा निळूपांडव वनमा ग्या. अन तीन वासानी झोपडी बांधणा. झोपडी बांधीन, डवर हुईन, फाट्या इस्तो फुकीन बीसी रहना. यी तठं जायी न पाणी मांगुला लागणी. ये डवरबा, पाणी दे. येनी पाणी दीदा. तिसा करता करता ये बुयू माला भूक लागणी. माला काहीतरी लया हवास त दे. डवरबा मय लया हा. ले. वाय एक भाकर यीनी भोजन दीदा, लापसी दीदी. खायीन आजू मागुला लागणा. तिसा करता करता निळूपांडवनी रात पाडी. बाईला त रातना जाता नी ये. ती वटावर निजी पडणी. तेव खकडूला लागणा, यी जवळ गय. जवळ जाता जाता यीना गर्भा रही ग्यात.

सकाळने उठणी अन तठून मागं फिरनी. इंदोली राजा आहा त पडीन मरी गयेल. येबायन केबायन इंदोली राजान्या बहण्यास गवसुला निगण्यात. पोळसवनला गयात. भाऊसवर माखी पडं, कुही ग्या. तेही हेरा बाबाना मरणा हुई ग्या. यहनी आहवळना सहवळ बाळ करीन बाहुला बनवी न कोरे रुमालखन झाकी दीदा. उसव पायतीला झुगदांडी ठोकी न बारा गुरूशी फुक मारी. बारा विद्या मान्यात. मोरकुचाखन झाडणा क्या. इंदोलीदेव खटकनी उभा उठना. माला कोण बचवणार? आमी तुन्या बहण्यास. वहणीस तुला सोडीन निगी गय. मोठी नक्टी आहा. कठून सोधी लयनास. झगडूला लागण्यात. येबायन केबायन निगी गयात. इंदोलीदेवही तेने घरदारला ग्या.

मुरुदेवकन्याना गर्भ वाढूला लागणा. मुरुदेवकन्या इंदोलीपूरला यी गय. एकदी करता दोनदी, न नव महना नव दिस हुयनात. पोटमा दुखुला लागणा. येव लोळत हिंडं तेव लोळत हिंडं. आता एकाना दोन करुला आहात. येबायन न केबायनला सांगुला धावचाव करत ग्या. जाब देवला लागणा, बुयू बुयू वहणीसनी पोटमा दुखह. आता ना आता तुमी सेवाडी करुला यवा. येबायन न केबायननी डोळा उडवी दिदात. यो आपले बाबाना पोसा नी आहा. येला आपले मारुलाशिवाय रहणार नीही. खोबरान्या नळया काढ्यात. हाती काठी धरी धावताव करत ग्यात इंदोलीगडला. वहणे वहणे आता घाबरशील नोको. आमी यी गयाव. खोबरेलनी नळी काढी न हातवर उबरा. गर्भावर हात टाका. येबायननी फडकी काढी, फडकी काढीन यीना डोळा बांदी दिदात. कान उघडा रहणात. तोडेक वारमा बहाण्यापाठी बहाण्या लागण्यात. बहाण्या लागत्या बेलपूरण्या बहाण्या, धरतीन्या बहाण्या, झुग्गारन्या बहाण्या, देवदऱ्यान्या बहाण्या. बाळ सोनिया दरवाजा हालवूला लागणा. बाळ सरकुला लागणा. बाळ धरतीला पडणा. बाळ धरतीला पडत खोटे यीनी शिरावीना शितपडा लयात. असुतमा लोंगळी लिदा. खापऱ्या लयात, लोंगळी धरा, कुडवळीला बाळ काढा. उखरडाला बाळ पुरी दीदा.

इंदोलीदेव सांगुला लागणा, ये बुयू बुयू! यी काय व? ही बायको आहा ही शिरावना शितपडा न खापऱ्या आहात. या असूदमा आहात. यी बायको तुमनी दिहनी. यो चाहुरू काढी न मुरुदेवकन्यानी शेंडीला धरा. चाहुरीना मार लावा. कंबर माना ढिला आहा, मार नोको देस. असली बाळज रडणा तो मा आयका. माना पाटा बांदेल आहात, तो बाळ मानेजवळ देजा. ही मानं नीही. चावरीना मार न आंदारी खोलीला कोंडी दीदा.

तोडेक वारमा मांजरनी हेरी पाडा. मांजर ये घर जाहा ते घर जाहा. दुदना गलास, तांब्या ली पोळं अन उखरडाला जायनी कलवी दे. अन ते बाळने तोंडमा जाहा. येबायन न केबायननी हेरी पाडा. मांजर रोजदिसला बासना ली जाहा. येही हेरी पाडीन तठून बाळ काढीन गोठामा ली थवा. मग मांजर गायला सांगुला लागणा. भिंग्री गाय बाळकाला रोजदिसला गोठामा धावाडं (दुध पाजणे). तिसा करता करता गायला तरास दीदा. मग बाळला हरण्यागडाला ली गयात. तठं हरणीनी दूद पाजा. बाळ वाढूला लागणा. सुर्यादेवला माहित पडणा. सुर्यादेव इंदोलीगडला आणा. वरले तळवाला ग्या. हरण्यागडला नदर टाकी. सुर्यादेवनी बाळ हेरी पाडा. बाळला लयी न मुरुदेवकन्या सोडवी. मुरुदेवकन्या तठं धावाडूला लागणी. बाळ वाढूला लागणा. निळूपांडवनी सांगेल, ही पोसी हुईल त तिना नाव आहात निळपा थवजो. अन पोसा हुईल त तेना नाव पांडूराजा थवजो. मुरुदेवकन्याना बाळ वाढूला लागणा. एक महिना करता दोन महिना, दोन महिना करता बारा महिना हुयनात.

हेमल्या गावित अन हेमलीन गावतीन दोनी इचार करत. तोडेक वारमा यीला फुलदाण आणा. फुलदाण आणा अन मग यीनी डोकी माथा धवा. पाटलीनने अठं मुग पिरेल तेमा सौरभोंड (डुक्कर) पिजना. मुग खायी जाहा इसा करी न तेला काकऱ्या पारधीला मारुला सांगा. काकऱ्या पारधीनी माळा घाला. माळावर धनुषमेढा ली बीसी रहना. पारधीने सुमुरहून भोंडीसोर राकोस डुक्कर ली जाहा. काकऱ्या पारधीनी माग लावा. माग लावता लावता कापरीमा भरवा. डुक्कर निघणा न दोघोसाला हानीपाडी निंगी ग्या.

गंगा नदीला हेमलीन गावतीन आहा त फडका नेसुला बिलगणी. तोडेक वारमा तनाहून डुक्कर निंगी ग्या. अन काकऱ्या पारधी इज्जत जाईल इसा करी न बुडने आड दपी ग्या. वायसेक नदवूला लागणा. येहने दोन्याशी सर नदर पडणी. सर नदर पडत खोटे यीना गर्भ साठायजी ग्या. बराबर तू माला ठगणास इसी करीन निगी गय. यीना गर्भ वाढूला लागणा. एक महिना करता दोन महिना, दोन महिना करता नव महना न नव दिस हुई ग्यात. बाईने पोटमा दुखी आणा. पोटमा दुखी आणा न बेजपूर धर्ती झुग्गाधारी निगनी. देव सुयारीन झुग्गाधारी वनसापतीला सांगं, आये माने संगती यीजो. माला इटाळ लागील. इटाळ लागील तरी गानशी येवला पडील. मोहरं चालणेल गावत्री मिळणी. तिलाही ली गयात. तिध्या बहणी हेमल्या गावितसे अठं वस्त्री उखळापाळीला गयात.

खोबरान्या नळ्या काढीन गर्भावर हात टाका. हात टाकीन मळंदुला लागण्यात. आवळ-बावळ-सवळ क्या. बहाण्यापाठी बहाण्या लागण्यात, झुगान्या बहाण्या, धर्तीन्या बहाण्या, देवदऱ्यान्या बहाण्या, उलाल देवान्या बहाण्या, बाळ सरकुला लागणा. बाळ येता येता धरतीला पडणा. लोहारी कांड लया, सुत लया, नळ बांधा, नळ खांडा, वरी दाब्यात, आंगुळपांगुळ कय, बाळला धावाडूला

लावा. धावाडता धावाडता बाळ मोठा हुयुला लागणा. एकदी करता दोनदी, दोनदी करता वरीस हुई ग्या. बाळ चालूला लागणा. हेमल्या गावितनी तेला नटवी थटवी दीदा.

देवटाफरा उखळापाळीला नाचुला आणा, उखळापाळीहून चौखळाला आणा. हेमलीन गावतीन पैसा ली हन कौल्या बजार गय. एकज नंबरन्या बारा जोड चपल्या लेवला लागणी. निळपसौर या साती बहणीसी ती हेरी पाडा. या चपल्या एकज नंबरन्या कोणाला होड्या लेहे सोदुला लागील. ये डोसे आया, या चपल्या कोणाला लेहेस? आमने पोसाला लेह्या. पण कोडाक पोसा आहात? एकज पोसा. इसा करीन सोदी टाकण्यात. अन खदकारी हसुला लागण्यात. एक आठोडाला होड्या बारा जोड चपल्या लागत त तुना पोसा होडाकोडा आहा. देवटाफरा आमने पोसा, तेला आहा त नाचुला लागह.

ती आयकी न त्या साती बहणी डोसीने मागं लागण्यात. देवटाफरा ला आमी फसवल्याशिवाय रहजन नीही. हेमलीन गावतीन अन हेमल्या गावितने अठं गयात. कोंदडीला, दरवाजाने फाडीला दपी रहण्यात. देवटाफरा देव डोंगरला यी न नाचह, चौखळामा यी न नाचह. मग देवटाफरा घरमं भरायजी ग्या. भूगुनी उघडी जेवण करुला लागणा. देवटाफरा जेवणा अन उखळा पाळीला आणा. या त दरवाजापाशी दपी हत्यात. देवटाफरा तडकणी उडणा अन वटावर यी पडणा. बरा बरा आमाला उडी टाकीन निगी ग्या. तुला फसवल्याशिवाय रहजन नीही.

निळपसौर रगी खुदी भरणी. देवटाफराला तंगाडत लिदा. देवटाफरा पोळूला लागणा. देवडोंगरला नाचुला बिलगणा. तठं जाय पाठी लागण्यात. सुनेवन खंडाला तंगाडत लिदा. देवटाफरा पोळसवनमा पोळस बनी न चांगला फुलुला लागणा. निळपसौरशी फुल हेरी पाडा. लाल फुल हता तेमा एकज धवळा फुल हता. धवळा फुल निळपसौरने मनमा आणा. धवळा फुलज हय बुयू आपले खुडा व. सोरा नी पुरं. निळपसौर पोळसवर चहडूला लागणी. पोळसवर अर्धेक जाता जाता पोळस कडकण मुडी पडणा. त देवटाफरा आवानी मावा मोडी न पळत सुटणा.

शेंडेवन खंडाला निगी ग्या. शेंडेवन खंडाला जायी न सावर बनना, फुलुला लागणा. एकज फुल हता. निळपसौरनी फुल हेरी पाडा. अय पोस्येहो तो फुल पाडा व. पाडूला लागण्यात पण हात नि पाय पुरं. निळपसौर चढूला लागणी. निळपसौर चढूला लागणी न देवटाफरा इचार करं, देवटाफरा कडकण मुडी पडणा. अन देवटाफरा उडणा-पडणा जातना देवटाफरा बनना अन पोळूला लागणा. आता ठगणास नी त अठही तुला धरत्याव. देवटाफरा जाता जाता देवडोंगरला निगी ग्या. पण येहला काही गाठं नीही. तठून देवटाफरा निगना खांबागडला ग्या. खांबागडला जायी न देवटाफरा नाचुला बिलगणा. निळपसौरला कधीज हात लागं नीही. देवटाफरा गडून गड हिंडं पण हाती लागं नीही.

देवटाफरा मावल्यामा नाचुला बिलगणा. देवटाफराला निळपसौरनी मटकणी हाती धरा. मा हारी आजना आज तू लगन करशील त मा तुनी बायको बनील, तुने हारी मा लगन करीन. देवटाफरानी इज्जत गय, येहनी फसवी टाका. सातशे कुवऱ्या, नवशे देवांगणी येहना लगन संगजोडा हुई ग्या. तठं मावल्या राख्यात, भाये राख्यात. निळपसौर यी त मावल्या आहा. येनी पुंजा अन देवटाफरा यीना नवरा बनना. इसा करी हन येला आपले आता पुंजा दिजहन.

**सारांश:**

सूर्यदेवाने मुरुदेवकन्या या बहिणीच्या लग्नासाठी एक पण ठेवला. जो कोणी पण पूर्ण करील त्याला मुरुदेवकन्याशी लग्न करता येईल. हा पण असा की, 'काळ्या वावराला सव्वाखंडी तिळी पेरून, ती तिळी परत सगळीच्या सगळी वेचून द्यायची.' हा पण पूर्ण करण्यासाठी निळूपांडव येतो. परंतु त्याच्याने पण पूर्ण होत नाही म्हणून तो पळून जातो.

मग इंदोलीदेव पण पूर्ण करण्यासाठी येतो. तो इतर काही इंदोलींच्या मदतीने पण पूर्ण करतो. पण पूर्ण होताच इंदोलीदेव मुरुदेवकन्याशी लग्न करतो आणि घरी येतो. काही दिवसांनी मुरुदेवकन्या पतीच्या विरोधात जाऊन आपल्या पित्यास शुग्रास अन्न घेऊन जायला निघते. वाटेत तिला निळूपांडव भेटतो. तो सुडाच्या भावनेने तिला उशीर करून रात्र पाडतो. नंतर एकटाच वनात जाऊन म्हाताऱ्याचे सोंग घेऊन झोपडी बांधून राहतो. मुरुदेवकन्याही त्याच झोपडीत मुक्कामासाठी थांबते. तिला निळूपांडवकडून गर्भधारणा होते आणि ती तेथूनच परत इंदोलीदेवाकडे येते.

दरम्यान इकडे इंदोलीदेवाचा पळसावरून पडून मृत्यू झालेला असतो. परंतु येबायन आणि केबायन या इंदोलीदेवाच्या बहिणींनी त्याला जिवंत केलेले असते. त्यामुळे पूर्ववत दोघांचा संसार सुरु होतो. नऊ महिन्यांनी मुरुदेवकन्याच्या प्रसूतीची वेळ होते. त्यावेळी येबायन आणि केबायन या दोघी बहिणी येतात. सुडाच्या भावनेने मुरुदेवकन्याचे डोळे बांधून प्रसूती करतात. आणि बाळाला उकिरड्यावर नेऊन पुरतात. बाळाच्या जागी शिराविला (झाडू) ठेवून भावाला सांगतात की वहिनीच्या पोटी हेच झाले आहे. यास्तव तिला झोडून मारून कोंडून ठेवले जाते.

उकिरड्यावरच्या बाळाला मांजराने त्या त्या घरांतून दूध चोरून आणून पाजले. मात्र मांजराला येबायन आणि केबायन यांनी बघितले. त्यानंतर ते बाळ गायीच्या गोठ्यात ठेवले असता गायीने स्वतःचे दूध पाजले. नंतर हरण्यागडाला ते बाळ नेले. तेथे हरणीने दूध पाजले. ही बातमी सूर्यदेवाला कळताच त्याने त्या बाळाची आणि मुरुदेवकन्याची सुटका केली. (हा भाग येथे संपल्यागत वाटतो.)

पुढील भागात हेमल्या गावित आणि हेमलीन गावतीन असतात. हेमलीन गावतीन नदीवर अंघोळीला गेली असता काकऱ्या पारधीशी तिची नजरभेट होऊन तिला गर्भधारणा होते. पुढे ती प्रसूत होऊन तिला देवटाफरा नावाचा मुलगा होतो. त्याला नाचण्याची खूप आवड म्हणून त्याला एका आठवड्याला बारा जोड चपला लागत. म्हणून त्याच्यासाठी आई चपला घेत असता निळपसौरने बघितले. तिला नवल वाटले. ती देवटाफराच्या घरी आली. परंतु देवटाफरा तिच्या हाती लागत नाही. अनेक राने-वने, डोंगर-दऱ्या हिंडल्यानंतर तो मावल्यांमध्ये (डोंगऱ्यादेवामध्ये) नाचत असता निळपसौरने त्याला पकडले. ही निळपसौर मुरुदेवकन्याची मुलगी. शेवटी दोघांनी लग्न केले. तेव्हापासून डोंगऱ्यादेवाची प्रथा चालत आली आहे.

**३. ६. ३. धनसऱ्या-कनसऱ्याची लोककथा:**

**धनसऱ्या कनसऱ्या**

एक हता साया कुणबी एक हती सावाय राणी. तेहने पोटी पुत्र नीही. येव हेरं तेव आता सावाय राणी सांगं, आपले पोटी पुत्र नीही  होडा घरदार आहा येला खावला कोणी नीही. कठं तरी जावा,

भगतने अठं जावा, वान्या बामनाणे अठं जावा, कठंतरी नवसपाणी लेवा, त पोसा हुईतील. साया कुणबी सांगुला लागणा, दगडखुटना देव करू. साया कुणबी उठना, सकाळने आंगुळपांगुळ करना कौल्या बजार निंगी ग्या. कौल्या बजार ग्या अन येनी एक रुपयाना शेंदूर लिदा. शेंदूर ली हन पोळसखडीला आणा. पोळसखडीला आणा न पोळसाना पाना खुडात, तेवर शेंदूर कालवा, शेंदूर कालवी न दगडखुटला शेंदूर लावूला लागी ग्या. दगडखुटला देवा करी देवला लागणा. दिपाडला शेंदूर लावं, आख्ये झाडबुडला शेंदूर लावणा. घरं निगी आणा.

सावाय राणी सांगुला लागणी, ये धन्या धन्या! गयेल कठं? तू सांगस ज दगडखुटना देव करुला. हय पण इसा नीही. सकाळने उठवा आंगुळपांगुळ करवा, मगं ताहा गौरी पेटववा अन नवस लेवा त आपला परिवारना काहीतरी देव येव्हार हुईल. सकाळने उठी न कुणबीनी गायी काढ्यात. जंगलमा चारुला ली ग्या. भिंगरी गाय हती, ती गाभण हती. घरदारला आणा गोठामा वहरवी दिना. दुसरे दिस सकाळने गायी काढ्यात न काकरे डोंगरला ली ग्या.

सावाय राणी हती. खराटा हाती धरा, डालखा हाती धरा, गोठामा भरायणी, गोठामा भरायणी न शेणपाणी झाडूला लागणी. शेणपाणी झाडता झाडता दोन तेमं गोटा सापडणात. हेरुला लागणी, आरं देवा देवा गोटा भारी आहात. यीनी डालखामा भरात अन उखरडाला टाकात. घरमहालाला आणी. हात पाय धवणी. शिराव उचली वस्त्री झाडूला बिलगनी. वस्त्री झाडता झाडता वाघुलादेव उखरडाला टाकला त्या वाघुला उडणात पडणात अन उखळापाळीला आणा त. उखळामा हतात. यी उखळामा हात घाली न कचरा काडूला गय. हातमा दोन लाडू आणात. दोन लाडू हेरुला लागणी. कोंदडी झाडी न देडगुमा भरात. उखरडाला ली टाकात. घरमहालाला आणी. हात पाय धवणी. डालखी काढी. कणगीमा हात टाकी नागल्या काढूला लागणी. नागल्या काढूला लागत खोटे त्या दोन वाघुला तिने हातमाज यी ग्यात. हेरुला लागणी. शेण झाडा तठही ह्याज. वस्त्री झाडी तठही ह्याज. अन आता कणगीमाही ह्याज. यीनी त्या थवी दिदात.

तोडेक वारमा साया कुणबी गायी ली आणा. गायी गोठामा वहरवी दिद्यात. सावाय राणी सांगुला लागणी, धन्या धन्या! आपले गोठामा आहा त दोन गोटा हतात. तठून निघनात उखळामा हतात. उखळामा निघनात कणगीमा हतात. आता लाडू या थेवी दिदात. साया कुणबी कलवी वलवी हेरुला लागणा, भस्की हेरुला लागणा. मगं सांगुला लागणा, ये गुणाजी भारजा! आपले काही नीही सकाळ आंगुळपांगुळ करुला लागील. सकाळ हुयनी. साया कुणबी उठणा, आंगुळपांगुळ करणा, बोचला दोन दाना बांदना अन हाती काठी धरी न साया कुणबी भगत, गुरु गवसत चालना. जाता जाता येशी झापा सोडा, येशी झापा सोडी हन यळूजाळीना वन लागणा. यळूजाळीना वन सोडी अन कारव्या झुग लागणा. कारव्या झुगाला ग्या. मग सावरनगरला ग्या. सावरनगरला जायी न वाणी बामुण हेरं. वाण्या बामणानी पोथी पुराणा काढा पण तेहला नी वाचायज. साया कुणबी हता अन नंदीवाला गुरुपाशी ग्या. गुरुनी तपासा, तेला तपास नी लागं. वारली गुरूने अठं ग्या, राम राम करणा. बिस्तार दीदा, पाणी पीना. कधी नी मधी येस आज काय काम पडणा काय नीही. खडीपुडी लयनाव. खडीपुडी येनी यळण्या सुपडा काढा. यळण्या सुपडामाहून दाणा उबरी पाडात. खडीपुडी वाचुला लागणा. वाचता वाचता भारुला लागणा, च्यारी कोपरा यळण्या सुपडाना बांधुला लागणा, च्यारी विद्या बांधुला

लागणा, जुग बांधुला लागणा, तेत्तीस कोटी देव बांधुला लागणा, काळी चीढी बांधुला लागणा. बांधता बांधता येवर हेरुला लागणा तेवर हेरुला लागणा. भूतखेत हवा, डोंगर मावल्या हव्यात, आईबाई हवी, हिरोबा हवा, कणसरा हवी पण कोणी मिळं नीही. भगतला ददरी घाम निघणा. अन हिमायना नाव लिदा. खडीपुडीवर हिमायना नाव लिदे खोटे तेवर हिमायना मुख पडणा. भगत गुरु हसी पडणा. साया कुणबी सांगं, ये भगतबाबा काहा हसनास? तुना आहा त चांगला दिस आहात. पण आता तू घरमहालाला जायजो. घरमहालाला करडी इनजो. तुला काहीतरी सापडेल आहा. माला काही नी दोन गोटा सापडेल आहात. हय हिमाय आहा. तू घरमहालाला जायजो, वनमा जायजो, यळू तोडजो, करडी इनजो, डालखी इनजो, टोपली इनजो अन मा आहा त अमुक दिसी यीन ये मा वायदा कराहा.

घरमहालाला ग्या. वनमा ग्या. यळू तोडणा. भारा बांदा. भारा घरं ली आणा. यळूला चिरी टाका. वाख काढात. काडक्या काढ्यात. करडी इनी पाय बिसवात. सारवसुरव क्या. वारली गुरु आणा. वारली गुरुनी उखळापाळीला आता सारवणा देवाडा. सारवण दी हन दिवापाणी लावा. दिवापाणी लावी हन तिळी तांदूळ काढात. आगरबत्ती लावी धुपली हन शेंदूर मागा. शेंदूर तेला चोपडी दीदा. करडीमा बिसवी दीदा. सावाय राणी आरती करुला लागणी. निवद बनाडवा, निवद बनाडवी हन घरमहालाला थेवा. साका पाड्यात, साका पाडी हन घरमहालाला थेवी दिदात. मग साया कुणबीशी दोघं भगत बाबाशी जेवणबिवण करणात. साया कुणबीनी भगत बाबाला देणगरी दीदी. राम राम करा. भगत गुरु कारव्या जुगला निंगी ग्या.

साया कुणबी विचार करं. दिस हता येळ पडणी, आंदार पडणा. दोनीजना निजी पडणात अन तिसा करता करता चार पाहरानी रात निंगी गय. कोंबडा दादा चार वाजते आर्वूला लागणा, मोर आहा त केहाळूला लागणा, वानोर काय केल्या हुंकारुला लागणात. तिसा करता करता सुर्यादेव निघणा. अन दऱ्यादेवाला तारा टाक्यात. दऱ्यादेव उजाड हुयना. कारव्या जुगला तारा टाक्यात. येही दोनी देवताशी सकाळने उठनात अन गौरी पेटवी. गौरी पेटवी हन साया कुणबी गौराला ग्याह्या. गौरावर धूप बाळूला बिसना. धूप बाळता बाळता देवासा नाव लेवला लागणा. सतरसुंगी, यमा भवानी, तुळजा भवानी. आजू आठव करं. सावाय राणी धावती गय. गौरी हिसकनी, काठी हिसकनी अन धूप बाळूला बिलगनी. रानोडीदेव, साती सौऱ्या, हिरोबा, देवकणसरा इसा करी न देवासा नावा लेवला लागणी. कनाज देव मिळं नीही. येहमायना नाव लिदा. येहमायना नाव लीदे खोटे तिला वारा आणा. वारा आणा खोटे यीला नवस पावना. येहना वचन पडणा. माला पोसा हुईल त मा येहमायला वराढी टाकीन. वराढी टाकीन इसा नवस लिदा. घरमहालाला ग्यात.

घरमहालाला जात खोटे यीला फुलदाण आणा. इसा करता करता एकदी करता दोनदी, दोनदी करता पाचदी, पाच दिस हुयनात. यीनी गुरुफन्या काढ्यात, नव लाखनी साडी काढी, चिकनमाटी काढी, पोगामा दाब्यात. बोचक्या बांदा अन सोनायी चुंबळ लिदी. सोन्यायी घडा लिदा. गंगा नदीला चालनी. गंगा नदीला गय तोडेक वारमा यीना इटाळ हता, घडा बुटे थेवा, बोचका काढी बुटे थेवा. पोळसवनी गय. पोळसवनला आहा त पोळस दादाला इटाळ भाळूला लागणी. पोळस दादा सांगुला लागणा, ये बाये... ये बाये! माला इटाळ नोको भाळवस माला हातं वंसी पाणी देवला लागं. वंसी पाणी

पुरवायज नीही. माना पान हातं देव यव्हारला जाहा. माना पान आहा त मयीतमा जाहा. माना पान आहा त आखेज जाहा. सावाय राणीनी सराफ दीदा, तू वंसी पाणी आहा त तुना पगरणे काम पडील.

पंगाराने बुडाला इटाळ भाळवनी, सावरीने बुडाला इटाळ भाळवनी, लाल फुलाला इटाळ भाळवी दिनी. तिवजेपुडी इटाळ भाळवं बिवजेपुडी इटाळ भाळवं. हिरी बारवाला गय. सोनिया चुंबळ थेवी घडा थेवा. काळशींग डोहला गय. बोचक्या थेवा, चिकनमाटी काढी, चिकनमाटी फोडूला लागणी, चिकनमाटीला शिपना करात. काळशींग डोहमा उडीपडणी धुकट्या फोडूला लागणी. धुकट्या फोडता फोडता केंग आणा. केंगला इटाळ भाळवं. फुलकुट आणी, फुलकुटला इटाळ भाळवं. कोकली आणी, कोकलीला इटाळ भाळवं. खेकड आणा, खेकडला इटाळ भाळवं. पूर्ण हुई न चोपडे खडकला यी बिसनी. माटी ली न हातवर मळंदुला लागणी. हातीवर मळंदी हन डोकी माथाला लावणी. डोकी माथाला लावी हन आहोळना बाल सवोळ करं. अन सुटक बाल आंगठामा दाबं. पाणी सोडत जाहा न आंगळत जाहा. आंगळत जाता जाता आखा बाल हता पिरूटी कय केसानी गुठळी थवी दिनी. कपडा काढात, साडी काढी, वडीतानी नेसुला लागणी. अन मिऱ्या पाडूला लागणी. मोरू काष्टा देवला लागणी. चोखी हुयनी जुना कपडा धवी टाकात. केसा लिदात दोरी इनी दगडाखाल दाबी न तेनी जातनी तेरुली मुंगी बननी. तेना मुंगीना जलम हुयना. खांदावर जुना फडका थेवात अन हिरी बारवाला गय. दोघ्या बहणी रंभाकुवरी तीही डोकी माथा धवणी. हिरी बारवाला आणी. दोघ्या बहणी हिरी बारवाला गुंडा चोळूला लागण्यात. अन घडा हता यो घडा हिरीमा बुडवा. घडा भरा मांडीवर थेवा. सांगुला लागण्यात, ये बुयू! तू गयेल कठं? मा नी कठं गयेल. मा आहा त हाय इटाळ बोळवूला गयेल गंगा नदीला. अन तू बुयू कठं गयेल? त माही त इटाळ बोळवूला आणेल. आरं यी सांगुला लागणी, तुला ज पोसी हुईल अन माला ज पोसा हुईल त माने पोसाला दीजो. तेस्ना वचन पडणा. तठं मग त्या याहणीस बनण्यात. तिसा करता करता हात वचना लिदात. दोघ्याही हत्यात त्या घरमहालाला गयात. ती रंभाकुवरी जमसदपुराला गय. सावाय राणी हती ती सावायनगरला आणी. आरं दोघ्याही जेणे तेणे घरं गयात. शिनगार वटाला चढणी. उखळापाळीला गय. घडाने जागं घडा थेवा. चुंबळीनी जागं चुंबळ थेवी. घरमा गय बासन कुसन काढा. बासन कुसन काढी न राख लिदी. राख लावी न बासन कुसन चोळूला लागणी. चोळी न पाणी लावं. पाणी लावी न चोख दुरुस्त क्या. उखळापाळी झाडी टाकणी. झाडी टाकी न बंगाळ्या भात काढा. भात काढी न कांडला करं. कांडला करी न पाणी थेवी दीदा. भोजन बनवूला लागणी. भोजन बनवी न दोनी देवता दोनी कीर्ता इचार करत. तोडेक वारमा यीनी जेवण वाटी दीदा. साया कुणबी जेवूला लागणा. सावाय राणी आता बीसी न नदवह. तोडेक वारमा पाची बोटा टाकना गोळा वाळं. देव येव्हार पुंजना, कुत्रा पुंजना, दुसरा गोळा वाळना न वळीना उंदरा पुंजना अन पाची बोटी जेवूला लागणा. जेवता जेवता अर्दा भात वदना. अन सांगुला लागणा, ये गुणाजी भारजा! अरं ताट वदना आपले पाठीमागं बिजली कुत्री आहा तिला घाली दीजो.

साया कुणबी निंगना शिनगार वटाला बीसी पडणा. नागवलीना सात पाना काढात, कापुला लागणा. कासा सोपारी लावी इडा वळी न मुखी झेलं. मुखी झेली लिदा होटभर धरती थुकी दिना. तठं लाल हुयना. तठं गोंड्या गुजबाल हुयना. तठं गोंड्या गुजबालना जलम हुयना. सावाय राणी आहा त पदर लावनी चाटीपुसी खायनी. बासनकुसन धवी टाका. झाडझुड करणी. पलंग टाकणी पलंग टाकी न दोनी देवता दोनी कीर्ता गोठी लावत. गोठी लावता लावता चार पाहारनी रात हती एक पाहरा निघी

गय. मग तीन पाहरा रहनी. या तिनी पाहराला यीना गर्भ रहना. गर्भ वाढूला लागणा. एकदी करता दोनदी हुयनात, दोनदी करता चेरदी हुयनात, ऽऽऽ नव महना न नव दिस हुयनात. अन बाई आरबड्या गरबड्या लोळूला लागणी. उखळापाळीला लोळता लोळता मरणाने घडे जवळ आणी. साया कुणबीला सांगं, आरं धन्या धन्या! खालले खातळीला जावा. आरं सुयारीन लयवा. इसा करी न सांगा. यो मग धावत कौल्या बजार ग्या. एक डाहळा सुई लिद्यात. सुई ली न धावत घरं आणा. धन्या धन्या! आरं केव गयेल? तू त सांगस सुई लय त मा सुई लयनाव. तू येडा पुरुष आहास. सुई ली न दाखवह त यीनी झुगारी दिद्यात. बायको धरपडत हिंडं. साया कुणबी शिनगार वटाला लोळी पडं. आरं देवा देवा तू काय करहस? त तुला मा नेटा द्याह्या. आरं धन्या कारव्या झुगाला देवसुयारीन हवी त बोलवी लयजो. ताहा काहीतरी चिखल्या गायी गुतण्यात इसा सांगजो. तठं ग्या. देवसुयारीनला सांगं, ये डोसाय, ये फुय! आरं आमने बायकोने पोटमा दुखह, एकना दोन करुला आहा. तठं तुनी येवा. अन सुयारीन बाई सांगुला लागणी, बाबा बाबा मा येवला याह्या. चाल आता तयारीज. तिनी खोबरान्या नळया काढ्यात. काठी काढी हाती धरी. सुन्यावन खंडाला येवला लागणी. वनसापती अन गावत्रीला ली हन सावायनगरला आण्यात.

शिनगार वटाला गयात. घरमहालाला भरायण्यात. खोबरेलनी नळी लिदी. गावत्री माय उसे बिसनी. बेजपूर हती तिनी खोबरेलन्या नळया काढ्यात. हातवर तेल वता. हात मळं गर्भावर हात टाका. गर्भावर हात टाकी हन सवोळ बाळ करं. बहाण्यापाठी बहाण्या लागण्यात. देवदऱ्यान्या बहाण्या, झुग्गान्या बहाण्या, धरतीनी बहाणी बाईला लागण्यात. बाईना गर्भ चुम्बूतज फिरं. बाई सांगुला लागणी, बाया हो माला मरणा होतील आता करू तरी काय. बाळ सरकुला लागणा. सोन्या दरवाजा हानुला लागणा. बाळ केसी धरा, केसी सोडी कपाळ धरा. कपाळ सोडी गच्ची धरी, गच्ची सोडी न छाती धरी. बहाण्यापाठी बहाण्या लागण्यात. बाळ हता पोटी धरा, पोटी सोडी कंबरा धरा. कंबरा सोडी कुल्ली धरा, कुल्ली सोडी जांग धरा. जांग सोडी गुडगी धरी, गुडगी सोडी नळा धरा. नळा सोडी ढोपरा धरा, ढोपरा सोडी तळपाय धरा. तळपाय सोडी, बाळ हता धरत्री पडणा. देवसुयारीननी बाळ झेला. धरत्रीला थेवा. लोहारी कांड मांगा, सुता मागात, चौगा भरात, नळ खांडा, नळ खांडी वरी पाड्यात, वरी पाडी हन खासी खण्यात, खासी खणी हन वरी दाब्यात. पाणी धगत क्या. पाणी ली बाळला आंगुळी लिदा, मायला आंगुळी लिदा. आंगळवी हन हात धवीन दारू पिण्यात. दारू पी हन देवसुयारीनसी निघण्यात.

देवसुयारीनसी जंबूबेटला गयात. जंबूबेटला रंभाकुवरी तिन्या आहा त बहाण्यापाठी बहाण्या लागण्यात. ती पोरगीनी जात जल्माला हुयनी. तठं वरी दाब्यात हन तिनी आंगुळपांगुळ कय. आंगुळपांगुळ करी हन दारू पी हन देवसुयारीन निघी चालण्यात.

साया कुणबी उठुला लागणा. सावाय राणी उठुला लागणी. सारवसूरव करणी. साया कुणबी आंगुळपांगुळ करणा. पैसा टक्का लिदा. खौल्या बजार ग्या. खौल्या बजार जायी न ओवा लेहे, इखंड लेहे, शेंदूर लेहे, कुकू लेहे, हळद लेहे, सुत लेहे, खोबरा लेहे, नारळ लेहे, तेल लेहे इसा बजार करुला लागणा. बजार करी हन घरमहालाला ग्या.

देवसुयारीन येवला लागणी. देवसुयारीनपासी ग्या, सामान दीदा, खोबरेल दीदा. अन येनी पाना लयात पाना दिदात. देवसुयारीन शेंदूर वाटूला लागणी. शेंदूर वाटी दीदा. पुढ्या काढ्यात धुपली दिद्या. शेंदूर लावूला गय. शेंदूर लावी आणी. दोरी इनी, इखंड घसा, दोरीला इखंड बांधी न पोऱ्याला बांधा एक मायला बांधा. देवसुयारीननी येळऱ्या सुपडा लिदा. अन गोठामा गय. सतीने दगडसी धूपा बाळं, येसा वाळं, पुंजळया पाडं. पुंजळया पाडी शेंदरा सोडं, कुकवा सोडं, हळदाय सोडं, मस सोडं. निवद बोना चढवी दीदा. सतीनी दारू शाका पाडा. सतीने दगडवर शाका पाडी हन तेवर पुंजळी टाकी. तेवर शेंदरा सोडा. तिसा करता करता बाईला बोलवी लिदा. दगडे बिसवी हन पोऱ्या हता हाती लिदा. दोन पोसा एक पोरगी अन पोसा हातीमा हिंदी धरी अन तेने हातीमा पैसा दिदात. देवसुयारीननी हिंदीमा बाळ थेवा, थाळी मांगी, सती पुंजुला लागणी. थाळी ठोकुला लागणी. आजूबाजूला बिससील नोको, बजारमा जायजो, पैसा टक्का परत लयजो. इसा करी न शिक्षण देहे. हिंदोळा देहे पोऱ्याला काढं. बाईपन देहे. बाईपाहून ली न हिंदीमा थेवं. थाळी ठोकं सांगुला लागणी, मामा यील मामाला पाणी दिजो. बिसका दिजो. इसा करी हन शिक्षण देहे. बाळाला ली हन बाईपासी देहे. तीपासून मांगं हिंदीमा थेवं. थाळी ठोकं आईस बोलवील त धावंदी पोळजो बाहास बोलवील धावत यीजो. इसा करी न शिक्षण देहे. हिंदीमा बाळ थेवा. तिसा करता करता पाच धाना थेवात. हिरी बारवाला गय. हिरी बारवाला धाना टाकात, शिपण टाका. घरमहालाला आणी निवद बोना मागा. आख्येसाला जेवण दीदा. भगरीऱ्या बोचक्या बांध्यात, भाकरी बोचक्या बांध्यात. पैसा दिनात, दारू पिनात, पुंजळया मोड्यात. पुंजळया मोडी न चाराणा (चार आणे) ली पोसाने हातमा दीदा. येना आहा त एक गोरगटा लयी बांदजो. इसा करी न शिक्षण दीदा. देवसुयारीन निंगी चालणी.

निंगी जाता जाता जमसेदपुराला गय. तठं पाचव्या कऱ्यात. तठं बोचक्या बांध्यात. पोरगीने हातमा दोन आणा दिदात. तिला बाळगाठी लयजो इसा करी न सांगी टाका. देवसुयारीन निंगी चालणी. वनमा गय, भाकर सोडी हेरं आंबी गय. घुगऱ्या आंबी गयात, बोना आंबी ग्या. भेंडवळमा झोकी दिदात. तेना आहा त आंड्या मद बनना. घुगऱ्या आंबी गयात सागळने कोपरामा झोकं तेना कोती बनना. भाकरी हत्या हितला झोकं त भोवर बनं. कोडानी भाकर गोडानी भाकर पोकळी झोकं तेना आहा त तुमसर बनं. इसा सराप दीदा. देवसुयारीन मोकळी हुई हन निंगी गय.

सती बरमा सावायपुरला निंगी आणात. सती आहा त सती पुंजं. बरम आहा त अक्षर ठोकं. तिसा करता करता बरमासी अक्षर ठोकी हन निंगी ग्यात. तिसा करता करता बाळ वाढूला लागणा. बाळ वाढता वाढता एकदी करता पाचदी हुयनात. पाचदी करता दसदी हुयनात. दसदी करता वीसदी हुयनात. बाळ रडूला लागणा. आरं देवा देवा. रडू काय बंद नी हुयं. साया कुणबी हता वाण्या बामनाने ग्या. जमसेदवाण्या बामन्या तठं नावरुस थेवं. आरं येना नाव आहा त तू धनसऱ्या थेव. पोरगीना नाव धनाय थेवजो. इसा करी न येला शिक्षण दीदा. येहनी रड बंद हुयनी. वाढूला लागनात. वाढता वाढता एक महना हुयना. एक महना करता करता तोंडला हेरी न हसुला लागनात. तोंडला हेरी न हसता हसता दोन महना हुयनात. दोन महना करता करता चार महना हुयनात. चार महना करता पाच महना हुयनात अन बाळ उबडा वळूला लागणा. बाळ वाढूला लागणा. आठ महना करता बारा महना हुयनात. बारा महना हुयनात आरं वरीस हुयना. पोसा हता चालूला लागणा. साया कुणबीनी लगुरी लयी, चेंडू लया. उखळापाळीला लगुरी मांडं. एखलाज चेंडू टाकं. एखलाज झेलकं. तेना धनसऱ्या बाळ एखलाज

खेळूला लागणा. खेळता खेळता शिनगार वटाला आणा, तठं लगुरी मांडं. आंगणमा ग्या. आंगणमा लगुरी मांडं तठं खेळं. रानमाळ ग्या तठं लगुरी मांडं, चेंडू टाकं एखलाज झेलकं.

घरमहालाला आणा. खेळता खेळता अंगठी होडा लोखुंड गवसं. लोखुंड गवसी न बाहासला जायी सांगं, पिता पिता आरं ये लोखुंड लेवा. तू सव्वासे दाहोळ्या, सव्वासे राहूळ्या, फाळ, वस्वा, किक्रा, आख्या इसा पाडी लयवा. लोखुंडला हेरी साया कुणबी सांगुला लागणा, आरं येना का होडा बनं. आरं येडा पुरुषा इसा नीही. आरं जावा पाजवी इ करी लयवा. साया कुणबी इचार करं. तिसा करता करता सावाय राणी सांगुला लागणी, धन्या धन्या! पोसा एखुलता एकज आहा. आपले बेस पाहजो. इसा करता करता आरं साया कुणबीनी लोखुंड लिदा. लोहारने घरं चाला धऱ्यात. धवळे लोहारला जायी न लोखुंड दाखवं. तेला सांगं, येना सव्वासे दाहूळ्या अन सव्वासे राहूळ्या पाडवा. फाळा पाडवा, वस्वा पाडवा, किक्रा पाडवा. इसा करी न सांगुला लागणा. अठं त धमनला वारा नीही, कोळसा नीही. इसा करी न लोहार सांगुला बिलगना. लोहारला रग आणी, लोखुंड हेरी न होडा काय येना पडं इसा करी न सांगुला लागणा. आरं दोन टेमकाखन मार दीदा. मार दी हन धवळ्या लोहारसे साया कुणबी रडत रडत मोहरं चालना. देवलोहारसे ग्या. देव लोहारला जायी न सांगुला लागणा, राम राम करना. इसा करता करता काय काम पडणा. आरं लोखुंड लयनाव. दाहूळ्या पाडूला, राहूळ्या पाडूला, वस्वा पाडूला, फाळ अन किक्रा पाडूला वाकस पाडूला इसा करी न सांगुला लागणा. आरं येनी टीकाम लीदी. माट्या खण्यात. फोपरुला लागणा. चुला बनवा. धमनीला वारा लावा. वारा लावी न सांगुला लागणा, धमनीला कुकू लाव. धमनमा वारा लावा. इस्तो टाकी लोखुंड लिदा. शेगडीमा थेवा. लोखुंड हता टिपूला लागणा. लोखुंड फुलुला लागणा. आरं लोखुंड अंगठी होडा हता त हात होडा हुई ग्या. हाती होडा, नळ होडा, जांग होडा लोखुंड वाढूला लागणा. लोखुंड फुलुला लागणा. देवलोहार इचार करं. काही तरी आहा लोखुंड. मादळ होडाक हुई न शिंग्या काढ्यात. दाहूळ पाडूला लागणा. सव्वासे दाहूळ्या पाड्यात, सव्वासे राहूळ्या पाड्यात. बारा फाळ पाडात. बारा वस्वा पाडात, किक्रा पाडात, वाकस पाडात. चकमक बनवी लोखुंड वदना. लोहार सांगं, इ लोखुंड लेवा. लोखुंड मा नी लेवला आहाव. लोखुंड तुला देवला आहाव. लोहार सांगं, मालाही पुरील अन माने पोसासालाही पुरील. इसा लोखुंड दीदा. साया कुणबीनी भारा बांदा. सावायनगरला निंगी आणा.

कुराडला दांडा बिसवा, इळाला थरांबू बिसवा. दोघं बापलेक सकाळने उठनात. माळ जोहुला ग्यात. खांडूला निंगणात. घडा भरी साया कुणबीनी पाणी लिदा. वनमा ग्यात. दैवे माळाला ग्यात, करडे माळाला ग्यात. माळाला हेरनात बीसी पडणात. निवद्या आवनाला ग्यात. कुणब्या माळाला ग्यात. बाहास हता सादडाला चहडना. सादडा खालून खांडत वर जा. धनसऱ्या सांगुला लागणा, येडा पुरुष आहास तू. वर जायी न खालं खांडत येवला लागह. धनसऱ्या आहा त शेंडाला ग्या. खांडूला लागणा. आखा माळज घालुला लागणा. आरं तेला तोडुला निगायज नीही. कोंडवायनी ग्या. साया कुणबी उतरी पडणा. सांगुला लागणा, एखुलता एक बाळ हता यो कोंडवायजी ग्या. आता करू तरी काय. एखुलता एक पोसा आहा आता काय हुईल नी काय नीही. खालून चहडूला लागणा. खालून चहडता चहडता तोडत जाहा न उगवत जाहा. जेमतेम मोकळा करी पाडा. मोकळा करी न साया कुणबीनी धनसऱ्याला उतरवी पाडा. उतारी पाडा न धनसऱ्या घडाजवळ धावंदत ग्या. अन पाणी आखा पी ग्या. अन घडा कलवी दिना. पाणी इखरी टाकना साया कुणबी जायी न सांगुला लागणा, आरं पोसा पाणी केव पाणी

नी आहा. घडा कली ग्या. बाळा बाळा आता न आता धावंदत जा. नदी किनारीला जावा न पाणी ली येवा. साया कुणबी सांगुला लागणा, धनसऱ्यानी घडा हाती धरा न नदी किनारीला ग्या. नदी किनारीला ग्या न तठं वाळू हेरीपाडी. वाळूला बीसी पडणा. हिमाय देवान्या पुंजळ्या पाडूला लागणा. हिमाय देवान्या पुंजळ्या पाड्यात न सागाना पाना दिदात. हिमायनी कथा लावूला लागणा. हिमायनी कथा लावी एखालाज घुमं. एखालाज उल्फा देहे. एखालाज कासळ लावं. इसा करता करता सागना पाना तुटी ग्यात. मग इचार करं आरं घागर फोडी टाकी. तेला शिडका पाडात. कमरामा दोरा हता तो तोडी टाका. खापरीला दोरा पोवी दीदा. तेना कासोळा बनवात. येनी हिमायनी कथा लावी. साया कुणबी हेरत हेरत ग्या. एखुलता एक बाळ हता. वाघनी खादा, जनावरनी खादा, नडगनी खादा, कासनी खादा. तो रडत पडत ग्या. पोसाला गवसं. नदीकीनारीला यो वाळूवर पुंजळ्या पाडी हन आरती करं. एखालाज घुमुला लागं. उल्फा एखालाज कासोळा लावं. नाचुला लागं. तिसा करता करता साया कुणबी दपत ग्या. तेना रनगा हेरता हेरता एक दांडाखन दीदा. तो रडत रडत माळवर आणा. माळहून रडत रडत पोळूला लागणा.

जमसेदवाणी कौल्या बजार गयेल. तठं आहा त कपडा हतात. धनायनी आखा कपडा यीकी दिदात. धनाय राणी बजारमा गय. बजारमा गाडी जुपी दीदी. बजारमा जमसेदवाणी तिकडं गयेल तोडेक वारमा यीनी आहा त सस्ता माहाग कपडा यीकी दिदात. तोडेक वारमा आहा त जमसेदवाणी ग्या. बुयू बुयू! कपडा काय क्यात? पोपा पोपा आखा मय गिराक लावात. गिराक लावी हन आखा कपडा मय यीकी दिन्याव. पैसाना हिसोप क्या. हिसोप क्या त खोट लागणा. जदवं पायना जोड काढा अन पोसीने दोन चावणामा दिद्यात. पोसीला सांगं, बुयू बुयू! अठं नीही तू सावायनगरला जावा. तठं साया कुणबी अन सावाय राणी तुनी सासून तुना सासरास आहात तठं तुनी जावा.

धनसऱ्याला सांगं, तू जमसेदपुराला जावा. तठं तुना जमसेदवाणी सासरास, रंभा तुनी सासूस अन धनाय तुनी बायको आहा. तठं तू जावा. यो रडं हता तोडेक वारमा घरमहालाला आणा. तोडेक वारमा आईस सांगं, बाबा बाबा! तुला कोणी झोडा, कोणी काय क्या? माला पोपानी झोडेल. कासवरी झोडा? आरं मा पाणीवर गयेल. तठं आहा त मा कासोळा लावा. घडा फोडी टाका. तेना मय कापऱ्या बनव्यात, कासोळा बनवात. तठं मा कथा लावं हताव. ताहा पोपानी दांडाखन दिद्यात. सावाय राणीला रग आणी. शिराव धरी शेंडीखण दोन हाण्यात. आईस सांगुला लागणी, अठं नीही जमसेदपुरा जायजो. तठं तुना जमसेदवाण्या सासरास, रंभाकुवरी सासूस अन धनाय राणी तुनी बायको. तठं तुनी निंगी जावा. धनसऱ्या बाळ हता चालूला लागणा.

धनाय राणी हती घरमहालाला आणी. आईस सांगुला लागणी, कोण बुयू झोडं? पोपानी झोडेल. कासवरून झोडेल? मा आखा कपडा फुकट दी टाकात. यीकी दिदात तेवरहून झोडेल. आईसला रग आणी. खराटानी शेंडीला धरा, भुंडाने चार झपाटा दिदात. अन मग आईस सांगुला लागणी, सावायनगर जायजो. तठं तुना साया कुणबी तुना सासरास, सावाय राणी तुनी सासूस अन धनसऱ्या बाळ यो तुना नवरास. तठं निंगी जायजो. धनाय राणी हती चालूला लागणी.

येता येता धनसऱ्या बाळ उंबऱ्या माळला उंबऱ्याजवळ यी लागणा. पोटी लागल्या भुका, तोंडी लागल्या तिसा अन उंबरा खावला लागणा. उंबरा खाता खाता उंबरा नी मिळं त वर चडी ग्या.

तोडेक वारमा धनाय राणी उंबराजवळ आणी. इचार करं. सावायनगर त आजून झाज लांब. आता करू त काय करू. पोटी लागल्या भुका, तोंडी लागल्या तिसा. आता करू तरी काय. आरं उंबरासे चुम्बूत हिंडं. उंबरा मिळत नीही. वर हेरं तव त धनसऱ्या बाळ हता तेला सांगं, ये पोसा ये जुवान! काय करहस? धनसऱ्या सांगं, मा त उंबरा खाहा. आरं त उंबरा नीही. तू कठली नी कठली माला सांगस. आरं तू जाहास कठं नी कठं. आरं मा त सावायनगरला जावला. साया कुणबी माना सासरास, सावाय राणी मानी सासूस अन धनसऱ्या बाळ माना नवरास तेहने घरं जावलाहाव. अन तू कठं जाहास? आरं मा आहा त जमसेदपुराला जावला आहाव. जमसेदवाण्या माना सासरास, रंभाकुवरी मानी सासूस अन धनाय राणी मानी बायको. तठं मा जावला आहाव.

आरं पण मा त तीज. धनसऱ्या उडी पडणा. तिला हाती धरना. तिला संकट पडणा. आरं दिवस ग्या. तोंडी लागल्या तिसा, पोटी लागल्या भुका. पाणीना सोध लावत खाल्ले खातळीला ग्यात. हिरी बारवा लागनात. हिरी बारवाला ग्यात. चुम्बूत पाळीला हिंडत पाणी काय सापडं नी. डोल सापडं नी, हात पुरं नी. इचार करत. हिरी बारवाने पाळीला बीसी पडणात. रात पडनी आरं देवा देवा आता करू तरी काय. धनाय राणी बेसूद हुई गय. दोनी देवता इचार करता करता रातवाय निजी ग्यात.

काचण्यापुरणी येहूकन्याला सपन पडणा. सपनात त या दोन बाळ भुकेला आहात, तिसमा आहात मरी जातील. काचण्यापुराहून येहूकन्या आंबील काढणी, पाणी काढणी अन उडणी पडणी उंबऱ्यामाळसे इ गय. हिरी बारवाला गय तठं दोनी देवता दोनी कीर्ता निजी गयला. आरं उसाला आहा त पाणी थेवा, पायत्याला आहा त आंबील थेवी. धनसऱ्या बाळ चौकायजी उठना. पाणी हेरी पाडणा, आंबील हेरी पाडणा. पाणी पिना आंबील पिना. आंबील पी हन धनायला उठवा. तिला पाणी दिना, आंबील दीदी. तीन पाहरा रात गय. चारवे पाहराला सुर्यादेव साकळे बारीला निघुला लागणा. साकळे बारीला रथ खकडना. कोंबडा दादा बांग ठोकणा. केल्या, वानर, हुबकाऱ्या मारं अन उजेडा पडणा. सूर्यादेवनी आऱ्या टाक्यात. वाण्या बामुन पोथी पुराण वाचं. वारली गुरु खडीपुडी वाचं. दोनी देवता इचार करत उंबऱ्यामाळला इ ग्यात. उंबऱ्यामाळहून कसूर कापा. तुरना भोंगा पाडा. दोनी देवता तठं रहुला लागनात.

धनसऱ्या बाळ वनमा जा, शिकार करं, कांदमूळ खनत, मोलमजुरी करुला लागनात. धान्य नीही इसा करता करता वरीस ग्या. अन यीला गर्भ रहना. गर्भ वाढूला लागणा. एकदी करता दोनदीऽऽऽ. (पुनरुक्ती टाळण्यासाठी पुढील वर्णन दिले नाही.) धनसऱ्या अन धनाय राणीने पोटी कनसऱ्या बाळ हुयना. कनसऱ्या बाळ वाढता वाढता शेती करुला लागणा. दैन्यामाळला खांडणी करं, तंगड्यामाळला खांडणी करं, उल्फ्यामाळला खांडणी करं, रतेमाळला खांडणी करं, करड्यामाळला खांडणी करं, बाम्हन्यामाळला खांडणी करं, चिबडीमाळला खांडणी करं, बारा माळला खांडन्या कऱ्यात. वडीतोडी केर्डा पाडात. सुळ्या बनव्यात. सुळ्या बनवी न भरण्या कऱ्यात. भरणा करी न रेसना करात. रेसना करी न कनसऱ्या बाळ शेती करुला लागणा. कनसऱ्या बाळ, बरमदेव काळशिंग डोहला जाळा ली हन टाकूला ग्यात. जाळा टाकी हन मासा काढात. अन घरमहालाला आणात. भूजपाणी आखी हुई गय आता काय काम. आता बियारणना काम आहा.

बियाणा सोद कठं लावू. आपले धर्तीवर कणसरा नीही. बी कठं गवसुला इसा करी हन कनसऱ्या हता बियारण गवसं. देवदारकाला सोदं. महादेवने देवदारकाला ग्या. धवळे गिराला जायी हन महादेवाला सांगं, आरं बियारणना काम पडणा. महादेव सांगं, आरं बियारण अठं नीही मुहरं जावा. शेंगळ दिपला ग्या. तठं देवकोठारीनला सांगं, बियारणना काम पडणा. आरं अठं बियारण नीही. काचण्यापुराला जावा. काचण्यापुराला ग्या. यहूकन्या हती. यहूकन्यापासी बियारण सोदं. अठं बियारण आहा पण घुश्यारीन पण जायजो. घुश्यारीनपासी ग्या. घुश्यारीन सांगं, मापं बियारण आहा. खोलून खोल्या भरेल आहा. बियारण द्याह्या पण तुला माना बियारण भरुला लागील. चोरी करी लयीन पण माला बियारण भरुला पडील. आरं कनसऱ्यानी सांगी टाका का मा तुला बियारण परत दिन.

बियारण देवला यो भुली ग्या. आपले पिरी देवला अन उंदीर आहा त कदवं ली पोळूला, चोरी लेवला. तेना बियारण मांगा नी दिल. इसा करी न बियारण लिदा. वंजारपुरला वंजारनपासी ग्या. वंजारपासी नंद मागात. आरक्त्या नंद बरक्त्या नंद. तंगड्या नंद उल्फ्या नंद. देव्या नंद काळ्या नंद. भोऱ्या नंद आरं नंद लिदात. नंदीवर नागलीना बियारण भरा. उडीदना बियारण भरा. खुरास्नूना बियारण भरा. भाताना बियारण भरा. जुवारीना आखा बियारण भरा. बारा तिठा भऱ्यात. आठरा वना भऱ्यात. वंजारदेव बियारण ली चालना. येता येता काळीसर कुणबी, अद कुणबी दारकाला आणा त. दारकाला यी न कनसऱ्या बाळ उखळापाळीला ग्या. बियारण खाली क्या. नंद हतात शिनगार वटाला आणा त. आंगणमा आणा त. चारापाणी टाका. नंद वंजारपुरला निंगी आणात. अन कनसऱ्यानी वारली गुरूला बोलवा. वारली गुरुनी दिवा मागवात. दिवा उखळापाळीला काढात. उखळापाळीला खैऱ्या कोंबडा लयात. काळी तलग लयी. खोबरा गोटा लयात. आरं बी बाटवूला सुरवात करं. येनी मग गौरी मागी. धूपा बाळयात. शेंदरा सोड्यात. वारली गुरु पाया पडं. पाया पडी हन मुसळ लिदा. मुसळ ली हन पाच धपका मारी दिदात. पाच धपका पायीला बीसं. बाईनी पाच धपका मारात. पाचजना हुयनात. पाचीजनाशी बिया कांडी टाक्यात. तठं साका पाड्यात. साका पाडी हन खैऱ्या कोंबडा मारा. बिया मापा भरात. आरं आपला माप आणा. आरं वदूला लागणा. उल्फा आणा. उल्फा करी न बिया आहा त भरी ठवना. वारली गुरूला काळजा दिदात. बिवंदा दिदात. उडीद दिदात. वारली गुरूला देणगी दीदी. वारली गुरु निंगी ग्या.

मिरिग चालनी. मिरिग करता रोहिण्या चालण्यात. रोहिण्या करता जून आणा. जूनमा पाणी नीही. रोहिण्या भरी न चालण्यात. कनसऱ्यानी नंद काढात. नाकी पोव्यात. औता जुपात. औता जुपी न कनसऱ्यानी पेरणी कय. पेरणी करी हन दाताळी दीदा. वघळ्या पाड्यात. पाण्याला वाट हेरत. पाणी चालूला लागणा. बहिऱ्या बाजू गाजुला लागणा. गाजता गाजता बहिऱ्यानी आयकी पाडा. तडाखा उडणा, वायूदेव चक्रीवादळ सुटूला लागणा. पाणी आहा त सारंगपुरला पडूला लागणा. पाणी देव दऱ्यालाहून सारनाला चढणा. सारनालाहून आकासला फिरं. आकासलाहून पाणी वर्सुला लागणा. पाणी वरसता वरसता देवकणसरा उगुला लागणी. उगता उगता चांगली उंगणी. आखा धाना पिरी दिदात. बारा धाना पिरी दिदात. बारा धाना पिरी हन पानदेव देवकणसराना नवरा रगवायजी पडं. रगवायजी पडं त पाणीज नी ये. देवकणसराला मारी टाकह.

**सारांश:**

साया कुणबी आणि सावाय राणी यांच्या पोटी पुत्र नाही म्हणून ते नवस करतात. हिमायच्या आशीर्वादाने त्यांना पुत्र प्राप्ती होते. मध्यंतरी सावाय राणी आणि रंभाकुवरी यांची विहिरीबारवाला भेट होते. त्यावेळी सावाय राणी सांगते की, मला मुलगा आणि तुला मुलगी झाली तर आपण त्यांचे लग्न करून देऊ. सांगितल्याप्रमाणेच पुढे सावाय राणीला पुत्र आणि रंभाकुवरीला पुत्री प्राप्त होते. मुलाचे नाव धनसऱ्या तर मुलीचे नाव धनाय राणी ठेवले जाते.

पुढे मोठे झाल्यावर त्यांच्या चुकीच्या वागणुकीमुळे धनसऱ्याला आणि धनाय राणीला घरातून काढून दिले जाते. आणि त्यांच्या त्यांच्या सासरवाडीची ओळख देऊन सासरवाडीला जायला सांगितले जाते. त्याप्रमाणे धनसऱ्या आणि धनाय आपापल्या घरातून सासरवाडीला जायला बाहेर पडतात. परंतु सासरवाडी दूर असल्याने ते दोघे उंबऱ्यावनाला एकमेकांना भेटतात. त्यांची तेथेच ओळख होते. तेथेच झोपडी बांधून राहतात. वर्षानंतर त्यांना पुत्र प्राप्ती होते. त्याचे नाव कनसऱ्या ठेवले जाते. बापापेक्षा हा हुशार असतो. शेतीही चांगली करतो.

**३. ६. ४. होली न होलाची लोककथा:**

**होली न होला**

एक होली न एक होला हता. तेसी खोपा क्या. खोपा करी न तेमा तेही साहा आंडा घालात. आंडा घाली न पिल काढात. अन होलीन होला आऽऽऽ राजाने आवनामा ग्यात. राजाना पोसा सांगं, चिकाटी देवला लागील. राजाने पोसानी चिकाटी दीदी. होला चरत चरत ग्या न होला लागणा. होला लागणा न फोपडूला लागणा. तोडेक वारमा होली उडणी न फांदीवर बिसनी. फांदीवर बिसनी न होला सांगुला लागणा,

*"होले होले तमे घरं जावा,*

*यो थारा पोर एखलो."*

*(ही रचना गीतात्मक आहे.)*

होली उडणी क नीही भुर्रर्ऽऽऽकण उडी गय. तेहने पोसासाला खावाडी आणी. होला त बोल्या करे. येने त मारी नाखवाणु, मारी नाखवाणु न इसा करीन होलाला मारी न घरं ली ग्यात. घरं ली थवी दीदा. होली गय काय नीही. ती मांडववर जाय बिसनी. येव तेव हेरं होला नदरं नी पडं. होली सांगं,

*"होला होला यो त राजाना सोकरा,*

*हाती सोन्याची डेंगुरी,*

*तुझी पखडी मोडली."*

होला मयेल तरी सांगुला लागणा,

*"होले होले तमे घरं जावा,*

*यो थारा पोर एखलो.''*

होली उडणी क नीही भुर्ररऽऽऽकण उडी गय. पोसासाला खावाडूला लागी गय. होला बोल्या करे. येने त मारी नाखवाणु. मारी नाखीन, भुजी टाकीन एकदम तेना मटन बनवी रांधी टाका.  होली गय काय नीही. होली येव तेव हेरं मग सांगुला लागणी,

*''होला होला यो त राजाना सोकरा,*

*हाती सोन्याची डेंगुरी,*

*तुझी पखडी मोडली.''*

होला त बोल्या करे. येने त मटन खाई नाखवाणु. होला सांगुला लागणा,

*''होले होले तमे घरं जावा,*

*यो थारा पोर एखलो.''*

होली गय काय नीही. पोसासाला खावाडा. ताव त होलाना येही मटन खाय लिदा. होला बोल्या करे. येने खाई लेवाणु. खाय लेहे अन मग होली गय. होली जाय न हेरं ताव त होला नीही. होली आरडूला बिलगणी,

*''होला होला यो त राजाना सोकरा,*

*हाती सोन्याची डेंगुरी,*

*तुझी पखडी मोडली.''*

आ तारी! होली त आवीज गय. येने मारी नाखवाणु. यो त मरं नीही. तोडेक वारमा होला पोटमा आरडूला लागणा,

*''होले होले तमे घरं जावा,*

*यो थारा पोर एखलो.''*

यो त बोल्या करह. हाळकड्याला सांगह तलवार लय. हाळकड्यानी तलवार लयी दीदी. अन मग यो संडास करुला बिलगणा. संडास करुला बिलगणा न होला निघणा नी काय. गांडीवाटं भुर्ररऽऽऽकणी उडी ग्या. अन तलवार टाकी न येना बुजज तोडी टाका. होडीज गोठ.

**३. ६. ५. जळींतकाराची लोककथा:**

**<u>जळींतकार</u>**

काही माणसांनी मासे मारण्यासाठी माज तयार करून एका डोहात टाकला. पण डोह काय माजला नाही. एक रनमाळ होता, त्या रनमाळात देवाने मगरमाशाचा आवतार घेऊन बसला. एका माणसाने पाहिलं आणि येऊन सांगतो. 'अरे इथं या डोहामध्ये काय पाहता. इथं मासू नाय. मासा तो बाहेर निंगला, जंगलात आहे.' त्या जंगलामध्ये मासा आसताना तो वागुल करतोय, तोंडातून फेस

पडतंय. आणि लोकांचा धावणा गेला. लोकांजवळ वस्तरा होती. कोणाजवळ भाला होता, कोणाजवळ कुराड होती, कोणाजवळ इळा होता, कोणाजवळ सूऱ्या होत्या.

तो मासा बोलाया लागला. 'आरे... आरे... मानवा, माजे गळ्यालं सुरी लावू नोका, माजे गळ्यालं भाला लावू नोका. तुमालं काय लागील त माजे शेपूटपासून कापा.' आणि तो मगरमासा शेपूटपासून लोक कापायलं लागलं. रगत वाहया लागला तरी मगरमासा मेला नाही. जेला जेवढा लागला तेवढा, कोणी गोणट्या भरून घेतोय, कोणी झिल्या भरून घेतोय. पण मासा घटत नाय. बारा तेरा पाड्यावरचे लोकांनी नीला. पण मगरमासा घटला नाय. जेवढाचे तेवढाच राहतोय.

एक मांग आपले पोरांना सांगाया लागला, का येवढी लोका घेऊन येत्याय त जा आपालबी घेऊन या भाजीलं. मग त्या दोनी बहिण भावंडा निगली. तिथं जाऊन उभी राहली. मगरमासा पुढं वागुल करतोय, तोंडातून फेस पडताय. तेंलं कीव दिसली नाय. तेंचे जवळ एक भाला होता, एक टोपली होती. एक दोन तास झाले पण त्यांनी ते मासूलं भाला लावला नाय. सगळे लोक निंगून गेले तरी हे तिथंच उभी राहल्यात.

मगरमाशालं वाच्या वळाली, 'पोराहो! एवढे लोक कापून घेतात, तुमी का कापत नाही?' 'नाय देवा, लोक मागून कापून नेतात, तू पुढं वागुल लावतोस. तुजा जीवन आणि आमचा जीवन एकज आहे. तवा आमालं तुजा मटन लागत नाही. आमी रीतज निगुन जातुय.' मगरमासा परसन झाला. तेनी त्या पोरांना तेंची टोपली मगरमाशाचे तोंडाजवळ ठवाया लावली. मगरमाशानी वागुल केला. तोंडातून फेस पडला. आणि त्या फेसापासून दोन बिया तयार झाल्या. त्या बिया धोदीच्या (दुधीभोपळा) होत्या. पोराहो, ह्या बिया घेऊन जा. पण मी गोष्टी सांगतोय तो आई-वडलांलबी सांगायचा नाय अन् बाहेरबी कोणालं सांगायचा नाय. फक्त तुमालं अन् मालं माहीत. ह्या बिया घेऊन ठाणून द्या. दोन बियातून एक बी उंगील एक बी निष्फळ जाईल. या बियापासून मोड निंगील, तो मोड पानात यील अन् तेलं एक धोदी यील. एकज धोदी यील जास्त धोदी येणार नाय. धोदीबी घराएवढा वाढील. तो धोदी थोडासा कापून, छिद्रा पाडून, तेच्यातला मैला काढून टाकायचा. तेमात थोडीशी माटी भरायची, फाट्या भरायच्या, पाणी भरायचा, आन्न भरून ठेवायचा. काही दिवसांनी जळींतकार होईल. रात्रंदिवस पाणी सुटील. चाळीस दिवस चाळीस राता पाणी सुटील. या सृष्टीचा पाणजंजळ होऊन जाईल. सृष्टीवर झाड राहणार नाय, बुड राहणार नाय, देव कैलासात जातील, झाड नाय, बुड नाय, दगड नाय, खुट नाय, मानव नाय, दानव नाय, पशु पक्ष्या काही राहणार नाय. आसा जळींतकार होईल.

त्या बिया दोन्ही पोरांनी घीतल्या अन् घरी आली. मिरिग लागला अन् पाऊस पडला. पोरांनी त्या धोदीच्या बिया ठाणून दिल्या. एक बी उंगली, मोड आला, पणात आला, एक धोदी आला. धोदी वाढता... वाढता... वाढता... चार महिने पाऊस गेला. धोदी वाढला, वंजला, पिकला. मग तेंनी तो धोदी खुडून ठेवला.

देवानी सांगेल तेप्रमाणे तेंनी कापून तेच्यातला मैला काढून टाकला, माटी भरली, फाटी गौरी भरली, पाणी भरला, आन्न भरला, आपालं रोज जवडी वस्तू लागते तवडी भरून घीतली. मग त्या दोनी पोरा मधी शिरली. आणि मधाचे, कोतीचे मेणानी तो डाला लावून लिपून घीतला.

मग वादळ निगला, चौमुलखी पांगला, पाऊस पडाया लागला. ढोर गुरालं खायालं नाय काही नाय. चाळीस दिस अन् चाळीस राता पाऊस झाला. या पृथ्वीवर पानजंजळ झाला. पृथ्वीवर काय राहला नाय. फक्त धोदी तवढा पाण्यावर तरंगत होता. देव स्वर्गात गेलं, मानव-दानव मारलं गेलं. ढोर गुर, पशु पक्ष्या, दगड खुट, झाड बुड काहीज राहला नाय. अन् ते पानजंजळावर एक देव होता. त्याचे नाव वारदेव. त्याने तो धोदी इकडं फिरवता तिकडं फिरवता वर राहलं एकवीस ताल आणि खालं राहलं सात ताल. अन् सातीतालामधी कुठेतरी जागा ढिली आसील तिथं ठेंब ठेंब पाणी पाझराया लागला. तो टीवा टीवा पाणी साचता साचता तेची एक कुंडी बांदाली. त्या कुंडीमधी एक किडा जन्मालं आला. त्या किड्यापासून माणसासारखा देवाचा शरीर उत्पन्न झाला. त्याचे नाव यशभगवान नारायण. त्याने बारा वर्सा तप केला. उजव्या डोळ्यातून तेज्या आसू पडला. त्या आसूपासून आदिशक्ती जन्मालं आली. बारा वर्साची कोरनकार, आठरा वर्साची भरजानी. पण आजूबाजूलं कोणी नाय. आंदारनगरीत जन्म झाला. मंग यशभगवान नारायण सांगाया लागला. वर जळींतकार झाला काही राहला नाय. आता तुज्यापासून उत्पन्ना आहे. आणि मग आदिशक्ती बारा वर्सा तपावर बसली.

विष्णू तयार केला. आरे विष्णू! वर जळींतकार झाला. झाड बुड राहला नाय, पशु पक्षी राहला नाय, देव कुठं कैलासात गेलं माहीत नाय. मग मी काय करू विष्णू सांगाया लागला. तुजा माजा लग्न झाल्याशिवाय उत्पन्ना तर होत नाय. विष्णू हात जोडाया लागला. आरे आरे माई, आया व आई जमणार नाय. तुनी माजा जन्म केलास, तू माझी माता झालीस. तुझ्याशी मी लग्न करत नाय. आदिशक्तीलं राग आला. डोळ्यातून आग सोडली. विष्णूची जाळून बाळून राख केली.

आजून बारा वर्सा तप केला. आणि बरमाची उत्पन्ना केली. विष्णूप्रमाणे बरमाही आयकला नाय. तेजीही जाळून बाळून राख केली.

आजून बारा वर्सा तप केला. मग माहादेव तयार केला. आरे माहादेवा! वर जळींतकार झाला. झाड बुड, पशु पक्षी, पाहाड पर्बत काही राहला नाय. तर आपल्याला उत्पन्ना करायची आहे. माहादेव सांगाया लागला, हा होईल. उत्पन्ना करून टाकू ना. तुजा माजा विवाह होईल, लग्न होईल आडचन नाय. पण जे दोन देव मोहरं जन्मालं आलं तेजी उत्पन्ना कर. माहादेवानी हाट धरला. ते दोन देवाची उत्पन्ना करशील तर आपला मिलन होईल. आपल्यापासून उत्पन्ना होईल. मग आदिशक्तीना बरमा, विष्णू तयार केलं. आता तीन देव तयार झालं. मग माहादेव यशभगवान नारायण जवळ गेला. हे पिता हा जळींतकार जाईल कसा? मिटील कसा? मुरील कसा? अन् उत्पन्ना होईल कशी? यशभगवान नारायणना परसाद दिला हातात. आरे माहादेवा! हा परसाद दोनी हातात धर, सातीताल फोड, वर जळींतकारावर जाय, हा परसाद घोळ, त्याशिवाय जळींतकार आटणार नाय. मग माहादेवानी सातीताल फोडलं, हातात परसाद धरला, परसाद घोळाया लागला. ज्या ज्या ठिकाणी मोठं मोठं झिरं होतं. त्या त्या ठिकाणी परसाद घोळला. उबडीक दाबलं. आता मोठमोठे झऱ्यावर हे डोंगर बसलं. मग ते झरं दाबलं. तवा धरतीवरचा पाणी मुरला, पृथ्वी कोरडी झाली. सगळा सपाट झाला काही दिसत नाय. पण एक धोदी होता. आता धोदी पाहल्यानंतर तिनी देवानी इचार केला. इथं काहीतरी पडेल आहे. कोरडे पडेल धोदीजवळ तिनी देव गेलं. धोदीचा डाला उगडला. तेज्यातून मांगाची दोन पोरा बाहेर काहाडली. अन् इचारला, तुमी कोण? देवा! आमी दोनी भावंडा. मग आता दोनी भावंडांचा

विवाह होत नाय. पोटी संत होत नाय. मग पोऱ्या होता तो उंगवत दवाडला अन् पोरगी होती ती मावळत दवाडली. वीस बावीस वर्सा झाल्यानंतर त्या पोरांचा देवानी मेळा केला. मेळा करतांनी दोनी पोरांना इचाराया लागले. ही कोण अन् हा कोण? पोऱ्या सांगतो का, मी हे पोरगीलं वळखत नाय. अन् पोरगी सांगते का, मी हे पोऱ्यालं वळखत नाय. वळखभूल केली. वळखभूल करून दोनी पोरांचा जोडा केला. या दोनी पोरांपासून आजची आठरा जातीची उत्पन्ना झाली. मानवाची उत्पन्ना झाली.

### ३. ६. ६. सतरपती पाटलाची लोककथा:

## सतरपती पाटील

एक सतरपती पाटील होता. पाटलाचं सात मुल होतं आणि सात तेज्या सुना होत्या. मोठा श्रीमंत पाटील होता. तेज्याकडं एक राघो पोपट होता. सतरपती पाटलाच्या आणि देवाच्या संग तेच्या गोष्टी होत होत्या. पाटील खूप शेती करत होता. नागली, वरी, मुग, भात प्रत्येक प्रकारची. सोळा धाना आठरा वर्णाची तो शेती करत होता. पाटलाची आणि देवाची मित्रता झाल्यानंतर देवाने काय सांगितला का, "आयका मनं पाटला! जेवढा जी तू धान करतोय, तेवढा धान आमालं पिकवता येत नाय. त्यामुळे आपण दोघं मिळून शेती करू. आणि देवानी कपट काय केला? का जेवढा जी मोहोरचा पिक पिकला तो आमी घेव अन् मागून पिक पिकला ती तू घे." आता पाटील चिंता कराया लागला. पहिला पिक देवानी घीतला त मागं काहीज उरत नाय. पाटलालं माहीत होता. मग राघो पोपट सांगाया लागला का, "आयका हो पाटील! ही शेती जर केली तर त्याच्यातून तुला या देवलोक पिकपाकोटा देणार नाही. पिकपाकोटा देणार नाही तेच्या आगोदर शेती कोणची करशील? तू मकयाची शेती कर अन् पहिला पिक यील ती त्यांना दे." मग त्या पोपटाने सांगल्यानंतर आता त्या वर्षी नागली, भात नाय केला. सगळे माळात मकयाची शेती केली. शेती करल्यानंतर आता तो मकय उंगला, तो वाहडाया लागला. वाहाडता... वाहाडता... वाहाडता... आणि त्या मकयानी पहिली आंगर टाकली. आंगर टाकल्यानंतर मागून तेजा पिकाचा पोट्रा आला. पिकाचा पोट्रा मागून आला. त देवानी कबुली करेल होती का, पहिला पिक आला तो आमालं दियाचा. मग ती आंगर वाळत चालली. आणि पाटील देवालं सांगाया लागला का, "आयका मन देवाहो! तुमचा जी मोहोरचा पिक येऊन गेलेला आहे, वाळत चाललेला आहे. ती सावंगून घ्या." त्यानंतर ती आंगर समदी देवानी सावंगून नीली. पोट्रा काय देवालं माहिती नव्हता. जी वर निगला तिज तेलं माहिती होता. आंगर तवडी तेनी सावंगून नीली. ती मळली पण तेच्यात काही पिक निगला नाय. नंतर पाटलानी माणसा घेऊन तवडं मकयाचं पोट्रं मोडलं. माणसा घेऊन सोलून टाकलं आणि वाळवत होता. तवड्यात देव आलं. म्हणे, "आमालं तुनी पिक दिला तेवत आमालं काहीज निगला नाय, धान म्हणून काहीज आला नाय." पाटील बोलला का, "आता तुमीज बोललं का जी पहिला पिक यील ती आमालं द्या. अन् जी मागला निगला ती तुजा."

ते वर्षी सतरपती पाटलालं भरपूर पिक पिकला. मग दुसरे वर्षी देव काय सांगाया लागलं का, "जो पहिला पिक आला तो तुजा अन् मागला पिक आला तो आमचा." मग आता राघो पोपटाजवळ सर्वच खेळ होता. पोपटानी पाटलालं सांगला का, "हे वर्षी तू भूयमुग, नागली, वरी, भात जे धान आहे ते तवडं कर. मग मागल्या वर्षी आता नागली, वरी, भात, भूयमुग, समदं केलं. ज्यावेळेस पिक आला. वरी निसवायली, नागली निसवायली, भात निसवायला तवडा धान निसवाला. पटलानी पहिला पिक

तवडा खुडून नीला. आंगरी कापून नीली. खाली साड राहला. देवाला पाटील सांगाया लागला का, “आता पहिला पिक माजा मी काढून घीतला. आता जीबी राहला आशील ती तुमी घ्या.” आता देव आलं देवानी उरला सुरला सगळा वहडून नीला. तेज्यात काही निगला नाय. कारण तेज्यात पिकज नव्हता. तेज्यात धानज नव्हता त कुठून पिकणार आहे.

देवानी खूप प्रयत्न केला पण पाटील काय आयकत नाय. पाटील आयकत नाही मग देवानी विचार केला. का, या पाटलाचा आपालं जीवन आणायचा आहे. जेणीकरून तो आपले ताब्यात वागील. दुसरे वर्षी परत पाटलानी भरपूर शेती करायचं ठरवून खूप माणसं मंजरीला घेतली. सात जोड्या आवताच्या घीतल्या. पण जमीन काय उरकत नव्हती. पाटलालं राग आला. तेनी सवताज आवताची एक जोडी घीतली. आऊत धरला. घाय केली. घाईघाईत, रागारागात मदन्या बैलाला दोन काठ्या पाटलानी हाणला. अन् बैल हासला. बैल हासल्यानंतर पाटील विचारात पडला. का, तू हासलास का?

लावणी झाली अन् सात आवत्यांना पाटलानी सांगला का आता तुमी घरी जा. आज बैला चाराया मी राहतूय. बैल चारायलं पाटील राहला. बैल चरता चरता तेंची पोटा भरली. घरी जायाची तयारी झाली. अन् पाटलानी घरी जायाचे वाटवरज घोंगडी टाकली. तेज घोंगडीवर आडा पडला. आता मदन्या बैल मोहरं निगला. बैलाला वाचा वळाली. “आरं पाटला चाल आता.”

पाटील सांगं, “नाय... नाय... नाय... तू मावर पाय देऊन जाशील तरी चालील, पण मी उठणार नाय.”

बैल सांगं, “पण का बरं?”

पाटील सांगं, “पण तू आज हासलास का?”

मग बैल सांगाया लागला का, “आरं पाटला! आज तू हावडा धान केलास, मालं दोन काठ्याबी हाणल्यास. पण तुलं त आज देव द्वारकाला घेऊन जाणार आहेत. तुलं एवढी शेती काय कामात पडील?”

मग पाटील सांगं, “आज देव मालं घेऊन जातील, त मी काय करू?”

“मग तू आसं कर. आज तू जेऊन खाऊन तुज्या घरी आंगणात इस्तो फुकून दे. बिडीकाडी, तंबाखू आणून ठेव. देव आल्यानंतर तुलं नद्र पडणार नाही. त माजे गळयात एक घाटी (घंटी) बांदून दे. देव आलं का मी घाटी वाजवून दीन. मग तुलं जाग यील. अन् मी उठलो का लगेज तुनी सांगायचा का, या देवाहो, या देवाहो बसा. मंग देव तुलं नद्र पडतील. मग तुनी काय करायचा? का देवाहो तुमी आता आलसज त हाय तंबाख आंबल हाये ती आंबल करा. तुमी मालं घेऊन जाणार आहेतस पण जेवढा जी माझा घरदार आहे, तवढा हेरून सारून, मापसली धनसंपदा किती आहे तवढी हेरून आपण जाव.” एवढा बैलानी पाटलालं सांगला.

मग घरी जाऊन पाटील खायलाबियला समदा करून पद्धतशीर. एवढा दिस पाटील घरात निजत होता पण त्या दिस पाटील धुना ठोकून, ईस्तो पेटवून बाहेर बसला. आर्दे रातीलं देव आलं. बैलानी घाटी वाजवली. पाटील उठला. देव काय तेजे नद्र आलं नाय. लगेज हात जोडून राम राम केला.

देवाहो बसा... बसा... बसा... तवढ्यात त देव सांगत का, आपले कोणालं नद्र पडत नाय. मग पाटलानी कसा पाहला? मग देव नद्र पडलं अन् पाटलाजवळ जाऊन बसलं. हं देवाहो तंबाखू हाये, आंबल करा. घियालं त आलसज पण माजेजवळ जवढी धनसंपदा आहे, तवढी शेवट शेवट मालं हेरुंद्या. नंतर जाव. मग देव तेनी मांग लावलं. पैशाच्या तिजोऱ्या दावल्या, भाताच्या, नागलीच्या, वरीच्या भोवाळ्या दावल्या. एवढी माजी धनसंपदा आहे.

पण जी काही माजी खरी धनसंपदा आहे ती तळ घरात आहे. मग तळ घरात घेऊन गेला. तळ घरात पाटलानी फसवून देव कोंडलं. बाहेरून कडी कुलपा लावून दिली. तारीखवार, दिसवार पूर्ण झालं पण देव काय गेलं नाय. देवाची काय भेट झाली नाय. देव दवाडलं पण देव का आलं नाय? मग देवाची दारका भरली. देवानी इचार केला. देव गेलं पण देव काय आलं नाय. दारकामंदी एक देवासा पोपट होता. का, जारे आपलं देव गेलं कुठं राहलं कुठं? तेजा तपास करून या. मग पोपट आता कार्वेज युगामधी पाठवला. त्या देवाचा तपास लावता... लावता... लावता... देवाचा तपास लागला नाही. देव तळ घरात कोंडेल होतं. देवाचा तपास नाय आणि आता हाव नवलखी पोपट होता, बिन वळख्या पोपट होता. त आपल्या या कार्वेज युगामधल्या पोपटांकडून तो पोपट मारले गेला. पोपट काय दारकेला गेला नाही.

नंतर देवाचा तपास लावाया वाघ पाठवला. वाघानी सगळी पृथ्वी चाळली पण देवाचा तपास लागला नाही. नवलखी वाघ पाहून आपले कार्वेज युगातील वाघांनी तो वाघ मारला. वाघही परत गेला नाही. नंतर एक घोडा पाठवला. जारे म्हणे देवाचा तपास करून ये. घोड्यानी जवढी आपली आठ खंड काशी, नव खंड धरती आहे. तवढी चाळणी केली पण देवाचा तपास लागला नाय. पृथ्वीवर नवलखी आसताना तो घोडासुद्धा मारला गेला. तीन जीत्रोब मेलं.

मंग स्वतः महादेव आला. पृथ्वी चाळता... चाळता... चाळता... तेनी मरेल पोपटाची, वाघाची अन् घोड्याची हाडका सापडवली. त्या हाडका गोळा करून एक खासीत पुरली. अन् तेज जागवर एक मोहवाची टोळंबी ठाणली. अन् महादेव निंगून गेला. टोळंबी उंगली, टोळंबीचा मोहू झाला. बारा तेरा वर्सानी मोहूला फळा आली, गळाया लागली. मग महादेवानी पारश्याचा आवतार घीतला. महादेवानी दारूचा धंदा काहाडला. दारू इकत होता. जो रोख दारू पिल तेलं दियाचा अन् जो उदार मागील तेलं दियाचा नाय. आसा महादेवाचा नेम होता. दारू इकता इकता एक दिस सतरपती पाटील ते भट्टीवर गेला. दारू पेता... पेता... पेता... पैसं निठलं. पाटील सांगं, "जारं होये पारश्यापसून उदार दारू घेऊन या. काहा तो देणार नाय."

पण पाटलाचे जोडीदाराहालं महादेवानी उदार दारू दिली नाय. "आरं... आरं... पाटील! दारू त उदार देत नाय." पाटलाचं जोडीदार सांगाया लागलं.

"आरं काहा नाय देत? देवाचं देव मी कोंडलं. अन् तू कोण मोठा बाजीराव." पाटील माजला. पारश्यानी पाटलाची गोठ आयकली. पारश्यानी पाटलाचे हातालं धरला. आता तुलं काय पियाची ती पे. पाटीललं पक्की दारू पाजली.

"आरे दादा! कसक देव राहतय त मी पाहेल नाय. त चाल ना दाव." पारशी सांगाया लागला.

"तुलं काय करायचा देव माजे घरी हायेत." आसा पाटलानी सांगून पारश्यालं मांगं लावून घरी नीला. तळ घर उघडला. देवाचं हालाचं बाल. तेलं पाणी नाय, तेलं आन्न नाय. अन् मग ते देव आता महादेवानी गवसलं. आणि मग देव पाटलाचा आत्मा घेऊन स्वर्गालं गेलं.

### ३. ७. डांग जिल्ह्यातील काही कथाविशेष व कल्पनाबंध:

कथाविशेषांचा विचार करता जगभरच्या लोककथांमध्ये कथाविशेष पाहायला मिळतात. काही कथाविशेष समान असतात. म्हणजेच एकाच तत्त्वावर आधारित असतात तर काहींनी नित्य नवीन रूप धारण केलेले असते. कथाविशेषाला मुलकथा असेही म्हणतात. तसेच कल्पनाबंधाला कथाबीज असेही म्हणतात. कथाविशेषासंबंधी प्रभाकर मांडे यांनी स्टिथ थॉमसन यांची व्याख्या दिली आहे. ती अशी, "ज्या पारंपरिक कथेचे स्वरूप पूर्णतया स्वतंत्र असून, जिचा अन्वय लावण्यास कोणत्याही इतर कथेची जरूर पडत नाही. त्या कथेला कथाविशेष म्हणावे. अशा कथेत एक किंवा अनेक कल्पनाबंध असू शकतात."[१०] तर "कल्पनाबंध म्हणजे लोककथांचा असा एक मूलघटक जो स्वतः स्वतंत्रपणे स्थिर राहू शकतो. अशा रीतीने स्थिर राहण्यासाठी त्याच्यात कोणते तरी असाधारण तत्त्व किंवा अपूर्वता असणे आवश्यक असते."[११] याचे एक चांगले उदाहरण डॉ. पुरुषोत्तम कालभूत यांनी दिले आहे. ते म्हणतात, "माता हा कल्पनाबंध होऊ शकत नाही. कारण, ते सामान्य तत्त्व आहे. सावत्र आई हा कल्पनाबंध होऊ शकतो. कारण, ते असामान्य तत्त्व आहे."[१२] असेच काही कथाविशेष व कल्पनाबंध डांगच्या लोककथांमधून पाहायला मिळतात.

### ३. ७. १. बाहुल्यातून निर्मिती:

कोणत्याही देवीदेवतांची किंवा मानव प्राण्याची निर्मिती करण्याआधी एखादा बाहुला तयार केला जातो. त्या बाहुल्याला कोऱ्या रुमालात झाकून ठेवून त्यावर अमृत घोळले जाते. नंतर बारा गुरूंनी फुक मारून अर्थात मंत्रोच्चार करून, मोरकुचांनी झाडणी केली असता त्यातून जिवंत माणूस अथवा देव निर्माण होतो. हा कथाविशेष 'देवकणसरा' कथेत सुरुवातीलाच आला आहे. त्यामध्ये बेजपूर धर्तीने ब्रह्मदेवाची, विष्णूची आणि महादेवाची निर्मिती अशीच बाहुल्यातून केली आहे.

'देवटाफरा आणि निळपसौर'च्या कथेतही इंदोलीदेव जेव्हा पळसावरून पडून मृत्यू पावतो. तेव्हा त्याच्या बहिणी येबायन आणि केबायन यांनी इंदोलीदेवाच्या मृत शरीराचे बाहुल्यात रुपांतर करून नंतर त्याला जिवंत केले.

### ३. ७. २. सोन्या-चांदीचे आकर्षण:

डांगच्या आदिवासींना सोन्या चांदीचे भारी आकर्षण असल्याचे या लोककथांमधून दिसून येते. त्यांच्या कथांमध्ये सोन्या चांदीचे अद्भूतीकरण झाल्याचेही दिसून येते. त्यांच्या कथांमध्ये प्लास्टिकच्या खुर्च्यांबरोबरच सोन्याच्या आणि चांदीच्याही खुर्च्या पाहायला मिळतात. तसेच खडीचा रस्ता, डांबरी रस्ता, पितळी रस्ता आणि चांदी, सोन्याचाही रस्ता पाहायला मिळतो. सोन्याचा रस्ता थेट सोनपूरनगरला जाऊन भिडतो. तेथे सोनाय देवळी असते. त्या सोनाय देवळीत सोनावती राणी असते. येथे सोन्याचा रस्ता, सोनपूरनगर, तेथे असलेली सोनाय देवळी म्हणजेच सोन्याचे घर

आणि त्या घरात राहणारी सोनावती राणी. या प्रत्येक नावात सोन्याचा उल्लेख केलेला पाहायला मिळतो.

सोनिया घडा, सोनिया चुंबळही पाहायला मिळते. इतकेच नव्हे तर एखाद्या स्त्रीच्या प्रसूतीचे वर्णन करतांनाही योनीद्वाराला सोनिया दरवाजा असे म्हटले आहे. हे वर्णन इतके प्रभावीपणे केलेले असते की, तेथे अश्लीलतेचा भावही शिल्लक राहात नाही.

**३. ७. ३. परस्त्रीसंबंध आणि मूल प्राप्ती:**

डांगी लोककथांमध्ये परस्त्रीशी संबंध असल्याचे वर्णन अनेक कथांमधून दर्शविले जाते. अशा विवाहबाह्य संबंधातून अनेकदा मूल प्राप्ती झाल्याचे दाखवले जाते. देवकणसराच्या कथेत महादेवाला पाटीलकी दिल्यानंतर तो सोनपूरनगरला जातो. तेथे त्याचे सोनावती राणीशी परिचय होते. ती त्याची चांगली काळजी घेते. म्हणजेच त्याला झोक्यात बसवून झोका देते. मांडीवर डोके ठेवून झोपवते. हे सोनावती राणीचे वागणे त्याला आवडते. मात्र त्याचवेळी त्याला हेही माहीत असते की माझी पार्वती बायको आहे. परंतु तो पार्वती आणि सोनावतीची तुलना करतो आणि त्याला सोनावती जास्त आवडते असे मानतो. तो तेथेच वर्षभर राहतो. त्यांच्या या विवाहबाह्य संबंधातून देवकणसराचा जन्म होतो असे दाखवले आहे.

देवटाफरा आणि निळपसौरच्या कथेत इंदोलीदेवाच्या पत्नीशी म्हणजेच मुरुदेवकन्याशी निळूपांडव सुडाच्या भावनेने का असेना पण संबंध ठेवतो. मुळात त्यालाही मुरुदेवकन्या हवी असते परंतु इंद्रदेवाचा पण तो पूर्ण करू शकत नाही. यास्तव तिचे लग्न इंदोलीदेवाशी होते. मुरुदेवकन्या एकटी असलेली पाहताच त्याची ती इच्छा परत उफाळून येते आणि तो तिच्याशी फसवून संबंध ठेवतो. या संबंधातून पुढे निळपसौरचा जन्म होतो. याच कथेत हेमलीन गावतीन नदीवर अंघोळीला गेली असता काकऱ्या पारधीशी तिची नजरभेट होते. या नजरभेटीतून तिला दिवस राहतात. आणि पुढे देवटाफराचा जन्म होतो.

**३. ७. ४. स्त्रीची मासिक पाळी (फुलदाण) :**

स्त्रीच्या मासिक पाळीबद्दल आदिवासींमध्ये मोठे कुतूहल आहे. तसेच त्यांचे काही नियमही आहेत. प्रस्तुत प्रकरणातील लोककथांमध्ये मासिक पाळीला फुलदाण/फुलदाणा असा शब्द वापरलेला आहे. त्याचे वर्णन बहुदा लग्नानंतर किंवा स्त्री पुरुष मिलनाआधी केलेले असते. लग्न – फुलदाण – शरीरसंबंध – गर्भधारणा – प्रसूती असा एक ठराविक क्रम या कथांतून ओवलेला दिसतो. फुलदाणच्या वेळी स्त्री काही नियम पाळते. ती पाच दिवस घरातील स्वयंपाक करत नाही. विहिरीवरून पाणी आणत नाही. पतीजवळ झोपत नाही. देवादिकांची पूजा करत नाही. पाचव्या दिवसानंतर ती नदीवर जाते. पाण्यात डुंबते, चिकनमातीने केस धुते, जुने कपडे बदलते, नवीन कपडे चढवते, चोख दुरुस्त होते आणि विहिरीवरून पाणी घेऊन घरी येते मग स्वयंपाक करते असे दाखवलेले असते.

एका ठिकाणी तर नदीवर जाऊन विटाळ धुण्याआधी सावाय राणी पळसवनाला जाते. तेथे पळसाच्या विरोधात जाऊन पळसाला विटाळ लावते. नंतर पंगाऱ्याला विटाळ लावते, सावरीला विटाळ लावते, लाल फुलाला विटाळ लावते. नंतर नदीवर येऊन ती केंगाला, फुलकुटाला,

कोकलीला, खेकडाला विटाळ लावते. नंतर चोख दुरुस्त होते आणि घरी जाते. येथे केंग, फुलकुट (माशांचे प्रकार), कोकली (छोटा झिंगा), आणि खेकडाला विटाळ लावणे ठीक आहे. कारण ते पाण्यातच असल्याने त्यांना विटाळ लावला जाऊ शकतो. परंतु पळस, पंगारा आणि सावर या झाडांनाविटाळ लावणे ही कल्पना का सुचली असेल? तर पळस, पंगारा आणि सावर यांच्यात बरेच साम्य आहे. तिन्ही झाडांना भर उन्हाळ्यात फुले येतात. ती केशरी, तांबट, लाल रंगाची असतात. या फुलांचा रंग आणि स्त्रीच्या फुलदाणच्या वेळी होणाऱ्या रक्तस्त्रावाचा रंग सारखा असल्याने ही कल्पना सुचली असावी. दुसरे कारण असे की, पळसाच्या वाळलेल्या फुलांपासून तयार होणारा रंगही तांबट लाल असतो आणि त्याचा उपयोग येथील आदिवासी होळीमध्ये मोठ्या प्रमाणात करत (हल्ली हे प्रमाण खूप कमी झाले आहे.). या रंग साम्यामुळे ही कल्पना सुचणे शक्य आहे. विटाळ लावतांना तिन्ही झाडांची नावे घेऊन पुढे लाल फुलाला विटाळ लावल्याचे तेथेच म्हटले आहे. यावरून हे अधिक स्पष्ट होते.

### ३. ७. ५. प्रसूतीचे वर्णन:

स्त्रीच्या फुलदाणविषयी जेवढी उत्सुकता या लोककथांमधून दिसून येते तेवढीच उत्सुकता स्त्रीच्या प्रसूतीबद्दलही दिसून येते. प्रसूतीचे वर्णन करतांना गर्भ राहिल्यापासून सुरुवात होते. ते एक दिवस होता दोन दिवस, दोन दिवस होता चार दिवसऽऽऽ. असे करता करता नऊ महिने आणि नऊ दिवस पूर्ण होतात. मग स्त्रीच्या पोटात दुखायला लागते. ती आर्बड्या गर्बड्या लोळायला लागते. अशावेळी मात्र तिच्याजवळ पतीशिवाय कोणीही नसते. ती पतीला सुयारीनला बोलवायला सांगते, त्यावेळी तो घाईघाईत बाजारात जाऊन सुया घेऊन येतो. अर्थातच असे वर्णन हास्य निर्माण करण्यासाठी केलेले असते. नंतर ती चिखल्या गायी गुंतल्या असे सुयारीनला जाऊन सांग असे सांगते. तेव्हा तो धावतपळत जाऊन सुयारीनला बोलावून आणतो. मग सुयारीन येऊन स्त्रीला प्रसूत करते.

प्रसूत करतेवेळी आलेले वर्णन थोडक्यात असे की, सुयारीनने हातावर खोबऱ्याचे तेल घेतले, हात मळला, गर्भावर हात टाकला, चोळचाळ केली, बाळ सोनिया दरवाजा (योनीद्वार) हलवायला लागला, बाळाच्या केसी धरले, केसी सोडून कपाळ धरले, कपाळ सोडून कान धरले, कान सोडून नाक धरले, नाक सोडून गच्ची (गळा) धरली, गच्ची सोडून छाती धरली, छाती सोडून पोट धरले, पोट सोडून कंबर धरले, कंबर सोडून कुली धरले, कुली सोडून जांग धरली, जांग सोडून गुडघी धरली, गुडघी सोडून नळा धरला, नळा सोडून ढोपर धरला, ढोपर सोडून तळपाय धरला, तळपाय सोडून आणि बाळ होता तो धरतीला पडला. नंतर नाळ खांडून, वरी पाडून, वरी खड्ड्यात पुरून बाळाची आणि आईची अंघोळ घालून प्रसूतीचे वर्णन पूर्ण होते.

एवढ्या बारकाईने प्रसूतीचे वर्णन क्वचितच दुसऱ्या ठिकाणच्या एखाद्या लोककथेमध्ये पाहायला मिळते. ज्या अर्थी हे वर्णन डांगच्या लोककथेमध्ये सापडते त्या अर्थी तेथील स्त्रोत्यांना आणि कथनकाराला त्याबद्दल भारी आवड, आकर्षण, उत्सुकता, कुतूहल आहे. या उत्सुकतेपोटीच एवढ्या बारकाईने वर्णन केले जाते.

### ३. ७. ६. पाचवीचा विधी:

मुलाच्या जन्माच्या पाचव्या दिवशी जो पाचवीचा किंवा पाचोऱ्याचा विधी असतो त्याचे डांगमधील स्वरूप कसे असते ते थोडक्यात या लोककथांच्या माध्यमातून समजून घेता येते. पाचवीचा विधी सुयारीनच्या किंवा सुईणच्या हातून केला जातो. सुईणसाठी या लोककथांमध्ये देवसुयारीन आणि झुग्गाधारी असे दोन शब्द वापरलेले आहेत. मुलाचा जन्म करून गेल्यानंतर पाचव्या दिवशी परत सुयारीन येते. तोपर्यंत घरातल्यांनी पाचवीला लागणारे सामान आणून ठेवलेले असते. ते सामान सुयारीनच्या हाती दिले जाते. या विधिवेळी पुरुषांचे काहीही काम नसते. त्यामुळे ते शक्यतो घराच्या बाहेरच बसलेले असतात. घरातील सर्व विधी सुयारीन करते. हळद, कुंकू, शेंदूर अर्पून देवादिकांची पूजा केली जाते. दोरी विणून दोरीला इखंड बांधले जाते. मग ते इखंड बाळाला आणि आईला बांधले जाते.

बाळाला झोक्यात टाकून आणि ताट वाजवून सुयारीन काही शिकवण देते. झोका देता देता, ताट वाजवता वाजवता बाळाच्या हाती दोन पैसे ठेवते आणि म्हणते 'आजूबाजूला बसशील नको, बाजारात जाशील, पैसे टक्के परत आणशील, मामा येईल मामाला पाणी देशील, बसायला देशील.' यातील प्रत्येक वाक्यानंतर बाळाला काढून आईच्या मांडीवर दिले जाते. परत झोक्यात टाकले जाते. ताट वाजवले जाते. अशा पद्धतीने हा पाचवीचा विधी पार पाडला जातो. बहुतेक सर्वच आदिवासी जमातींमध्ये थोड्याफार फरकाने पाचवीचा विधी किंवा सटी पूजनाचा विधी केला जातो. डॉ. भगवान राजपूत सांगतात त्याप्रमाणे, पालघर जिल्ह्यातही पाचवीच्या दिवशी कास्याचे ताट किंवा वाटी वाजवून काही लोकगीते म्हटली जातात. आणि या लोकगीतांतून नवजात बाळाला 'मायेच्या हाकेला धावत यीजोस, बापूसच्या हाकेला धावत यीजोस' अशी शिकवण देत असतात.[१३]

यावेळी प्रामुख्याने सती (सटी) आणि ब्रह्माची पूजा केली जाते असे या लोककथांवरून दिसून येते. यावेळी सती ब्रह्मा येऊन बाळाचे अक्षर ठोकून निघून जातात असेही म्हटले आहे. याच दिवशी बाळाच्या आयुष्याची रूपरेखा तयार करून सती ब्रह्मा निघून जातात असा येथील लोकांचा समज आहे. हाच समज मराठवाड्यातील लोककथांतूनही दिसून येतो. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, "सटवीचा लिखा ही लोककथा डॉ. यू. म. पठाण यांनी संपादिलेल्या 'मराठवाड्यातील लोककथा' या संग्रहातील असून श्री. सुखराम हिवराळे हे या कथेचे संग्राहक आहेत. सातवीला सटवी कपाळावर लिहिते आणि तिने जे लिहिलेले असते, ते खरे होते या लोकसमजावरच ही कथा उभी आहे."[१४] येथे पाचवीच्या ऐवजी सातवीला सटीची पूजा होते असे दिसते. दिवस कोणताही असला तरी त्यामागील प्रेरणा व प्रवृत्ती, श्रद्धा व समज सारखाच आहे.

### ३. ७. ७. खोटे बोलणे, लबाडी करणे, फसवणे:

खोटे बोलणे, लबाडी करणे, फसवणे असे प्रसंग अनेकदा या लोककथांमधून रंगवले जातात. महादेवाची अट ऐकून आणि पार्वतीचा राग पाहून इंद्रदेव पार्वतीला खोटे बोलून महादेवाला घ्यायला जातो. तो महादेवाची अट पार्वतीला न सांगता तिला दिवा, आरती घेऊन यायला सांगतो.

कुणब्याने वर्षभर कणसराची सेवा करूनही शेवटी त्याला महादेव फसवतो. आपला शब्द पाळत नाही व कुणब्याला अन्न धान्य न देताच हाकलून देतो. नंतर त्याच कुणब्याला शेती करून त्यात फसवण्याचा पयत्न करतो पण तेथे मात्र कुणबी फसत नाही.

एका ठिकाणी देवकणसराची कामगिरी पाहून तिच्यावर सर्व देवांची नजर पडते. ते तिच्यावर भाळले जातात. परंतु ती कोणालाच दाद देत नाही असे पाहून शेवटी पानदेवावर तिला फसवण्याची कामगिरी सोपवली जाते. पण तेथेही देवकणसरा फसत नाही.

कनसऱ्या बियारणाच्या शोधात असता तो काचण्यापुराला जातो तेथे त्याला घूस भेटते. तिच्याकडे शेतीचे बियारण असते. त्यावेळी कनसऱ्याने ते बी मागले असता घूस त्याला द्यायला तयार होते. परंतु ते बी परत करण्याच्या अटीवर. कनसऱ्याने घुशीची अट मान्य करून बी घेतले परंतु त्याने घुशीची अट मोडली. म्हणजेच घुशीची फसवणूक केली. त्याचा परिमाण म्हणून आजही शेतीचे नुकसान करून उंदीर, घूस हे प्राणी धनधान्य चोरून घेऊन जातात. आणि त्यांच्या बिळात भरून ठेवतात.

निळूपांडव मुरुदेवकन्याशी फसवूनच शरीरसंबंध ठेवतो.

सतरपती पाटलाला देवांनी शेतीच्या संदर्भात अनेकवेळा फसवण्याचा प्रयत्न केला परंतु सतरपती पाटील पोपटाच्या मदतीने देवांना फसला नाही. पुढे देव सुडाच्या भावनेने सतरपती पाटलाचा आत्मा घ्यायला आले तेव्हा बैलाच्या मदतीने पाटील वाचला. असे अनेक प्रसंग या लोककथांमधून कथन केले जातात.

**३. ७. ८. दारूची उत्पत्ती व उपयोग:**

देवांचा शोध घेता घेता महादेव पृथ्वीवर येतो. त्याआधी येऊन मरण पावलेल्या पोपट, वाघ आणि घोड्याची हाडे जमा करून एका ठिकाणी खड्डा खणून त्यात पुरून देतो. त्याच खड्ड्यात मोहुची टोळंबी (मोहाची बी) टाकतो. त्यानंतर त्या टोळंबीतून मोहाचे रोपटे उगवते, ते रोपटे मोठे होते. आणि बारा वर्षानंतर त्याला फुले फळे येतात. ही फुले गळायला लागली त्यावेळी तेथे महादेव पारशाचे रूप घेऊन येतो. मोहाची फुले वेचून त्यापासून दारू तयार करून विकतो. एक दिवस सतरपती पाटील त्याच वाटेने जात असता त्याला दारू पिण्याचा मोह झाला. दारू पीता पीता पैसे संपले म्हणून तो पारशाजवळ उधार दारू मागू लागला. पारशाने नाकारल्यावर सतरपती पाटील जोशात येऊन सांगतो की, "आरं तू कोण मला अडवणारा? मी देवाचे देव कोंडले." हे ऐकून पारशाने देवांचे दर्शन करण्याची इच्छा दर्शविली. मग पाटील पारशाला घेऊन घरी जातो आणि देव कोंडलेल्या खोलीचे दार उघडतो. नंतर देव मुक्त होतात आणि सतरपती पाटलाचा मृत्यू होतो.

येथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. ती म्हणजे पोपट, वाघ आणि घोडा (गोविंद गारे यांच्या 'आदिवासी लोककथा' या पुस्तकातील 'महूची गोष्ट' या कथेत घोड्याऐवजी गाढवाचा उल्लेख आहे.)[१५] यांचा उल्लेख उगीचच येथे आलेला नाही. त्यांची योजना करण्यामागेही कथाकाराचा काही एक तर्क, उद्देश, हेतू असावा. दारू पिल्यानंतर माणसात काही बदल घडून येतात. हे बदल म्हणजे दारू पिल्यानंतर शांत माणूसही पोपटासारखा बोलायला लागतो. सत्य बोलायला

लागतो. गुपित गोष्टीही सांगायला मागे पुढे पाहात नाही. यास्तव येथे पोपट या पक्ष्याची योजना केलेली असावी. दुसरे असे की, दारू पिल्यानंतर माणसात अनामिक शक्ती संचारते आणि तो गरीब, कमकुवत, अशक्त, शक्तिहीन असला तरी वाघासारखा डरकाळ्या फोडतो. दुसऱ्यावर वाघासारखा धावून जातो. भांडण करतो, हाणामारी करतो. ही दारुड्याची लक्षणे पाहता वाघाची योजना केलेली योग्य वाटते. तिसरे असे की, पूर्वी मोठमोठ्या राजे महाराजांकडेच घोडे असायचे. त्यामुळे घोडा हे संपन्नतेचे, श्रीमंतीचे प्रतिक मानले जाते. आता दारू पिलेला माणूस स्वतःला एखाद्या राजाहून कमी समजत नाही. तो स्वतःला सर्वशक्तिमान मानतो. खिशात पैसे नसले तरी खूप मोठा श्रीमंत समजतो. या धुंदीत तो कोणाशीही लडायला, भिडायला तयार होतो. तो लगाम नसलेल्या घोड्यासारखा नीटच उड्या मारतो. यास्तव घोड्याची योजना योग्य वाटते. या तिन्ही जीवांचे गुण दारुड्यात एकजीव झालेले असतात हेच यातून सिद्ध होते.

म्हणूनच एखादा दारुड्या रस्त्याने उतमात करत चालला की, त्याला बघून बाकीचे लोकं डांगी बोलीत म्हणतात, ''होयो हेर माजिर इसा त बोलं नि पण आता पोपटनेगत बोलहं. (तो बघ दारुड्या असा तर बोलत नाही पण आता पोपटासारखा बोलत आहे.)'', ''होयो हेर इसा त गरीब माणूस पण माजी अन खड्यानेगत रेकहं. (तो बघ असा तर गरीब माणूस (स्वभावाने) पण दारू पिऊन वाघासारखा ओरडतो आहे.)'', ''होयो हेर माजिर घोडानेगत निट्टज उडहं. (तो बघ दारुड्या घोड्यासारखा नीटच उडतो आहे.)'' ही आणि अशीच कितीतरी वाक्य डांगी लोकांच्या मुखातून, त्यांच्याच बोलीतून ऐकली की वरील तर्काला अधिक बळकटी मिळते.

कोणत्याही मुलाच्या पाचवीच्या वेळी पाचवीचा विधी पार पडल्यानंतर तेथे जमलेल्या अनेकांना दारूची आशा असते. त्यात सुईणीचाही समावेश असतो असे या कथांवरून सांगता येते.

### ३. ७. ९. स्वतंत्र निर्मिती:

एकाच कथेत अनेक स्वतंत्र कथांचा समावेश असल्याचे दिसून येते. यात प्रामुख्याने निर्मिती कथांचा समावेश आहे असेही दिसून येते. अर्थातच ही कथन करणाराची स्वतःची शैली आहे. कथक स्रोत्यांच्या ग्रहण शक्तीचा अंदाज घेत घेत मूळ कथेत अनेक बदल करून उपकथा गुंफत असतो. त्याचवेळी मूळ कथेचा बाजही ढळू देत नाही. मूळ कथेत बदल करण्यामागे कथकाचा हेतू विनोद निर्मिती करणे, उत्सुकता वाढविणे, कथेचा विस्तार करणे, समाज प्रबोधन करणे अशी अनेक कारणे असतात. ही कल्पना साम्यावर, सारखेपणावर टिकलेली आहे असे म्हणता येते.

सोनावती राणी महादेवाला घ्यायला आलेल्या देवांना स्वतःच्या विष्टेपासून तयार कलेली मुळे खायला देते. यात मुळाची चव पाद्रट, चरकट असल्याने त्याचा संबंध विष्टेशी जोडला आहे.

सावाय राणीला फुलदाण आल्यानंतर ती नदीवर जाते. अंघोळ करते. अंघोळ झाल्यावर केस विंचरते. निघालेल्या केसांची दोरी विणते आणि दगडीखाली दाबून देते. त्या विणलेल्या दोरीपासून तेरुली मुंगी जन्माला येते असे कथेत म्हटले आहे. तेरुली मुंगी ही मुंग्यांच्या अनेक प्रजातींपैकी एक आहे. तिचा रंग केसांसारखा काळा असतो. त्या मुंग्या चालतांना एकामागून एक अशा सरळ चालतात. त्यावेळी पाहणाऱ्याला एखादी विणलेली काळी दोरी पडलेली आहे असा भास होतो. हेच साम्य

लक्षात घेऊन येथे काळ्या केसांच्या विणलेल्या दोरीपासून तेरुली मुंगीची उत्पत्ती झाली असे म्हटले आहे.

साया कुणबीच्या तोंडातून पान खाऊन थुंकलेल्या लाल रंगापासून गोंड्या गुजबाल (एक वनस्पती) तयार झाला असे म्हटले आहे. येथेही लाल रंगाचे साम्य लक्षात घेऊन ही निर्मिती कथन केली आहे. याच कथेत पुढे देवसुयारीनने फेकलेल्या घुगऱ्यांपासून कोती तयार होते, भाकरीपासून भोवर तयार होते, बोण्यापासून आंड्या मध (कोती, भोवर आणि आंड्या मध हे मधाचेच प्रकार आहेत) तयार होते असे म्हटले आहे. ह्या सगळ्या स्वतंत्र निर्मिती आहेत. मूळ कथेचा आणि ह्या निर्मित उपकथांचा काहीही संबंध नाही. त्या जाणूनबुजून, ओढूनताणून मूळ कथेत घुसवल्या आहेत. म्हणूनच मला म्हणावेसे वाटते की ही स्वतंत्र निर्मिती आहे. कथकाची स्वतंत्र शैली आहे.

**३. ७. १०. रूपांतरण:**

व्यक्तीचे प्राण्यात, पक्ष्यात, झाडात, सापात, दगडात रुपांतर होणे, देवादिकांचे वेगवेगळ्या रूपांत रूपांतर होणे हे जगभरच्या लोककथांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. या लोककथांतून अनेक पशु पक्षी मानवाची मदत करतात. ही मदत करतांना ते वेगवेगळे रूप धारण करतात. एखादेवेळी एखादे गुपित जाणून घेण्यासाठी, उलगडण्यासाठी रुपांतर केले जाते. काहीवेळा एखाद्याच्या शापामुळे रुपांतर घडून येते. कारणे अनेक असली तरी रुपांतर होणे ही कल्पना जगभरच्या लोककथांतून दिसून येते. तशीच कल्पना डांगच्या लोककथांमधून दिसून येते.

देवकणसराला सावत्र आईने म्हणजेच पार्वतीने त्रास दिला असता ती महादेवाच्या अंघोळीच्या जागी जमिनीत उतरून जाते. आणि शेतीच्या रूपाने परत वर येते. नंतर ती एका मुलीचा वेश धारण करते. नंतर म्हातारीचा वेश धारण करते. असे आलटून पालटून अनेक रूपे घेत असते. यामागे तिला कोणी ओळखू नये हा हेतू असतो.

कुरुदेवकन्या सुर्यदेवाकडे जात असता वाटेत तिला निळूपांडव भेटतो पण तो मूळ रुपात तिला भेटत नाही. तो केव्हा दुकानदार होऊन साड्या विकतो, केव्हा कासार होऊन बांगड्या भरतो, केव्हा सोनार होऊन सोन्या चांदीच्या साखळ्या देतो, तर केव्हा तो म्हातारा होऊन मुरुदेवकन्याशी शरीरसंबंध ठेवतो. याच कथेत पुढे देवटाफरा पळसवनाला जाऊन पळसाचे रूप घेतो, शेंडेवन खंडाला जाऊन सावरीचे रूप घेतो.

देवांचा शोध घेण्यासाठी महादेव पारशाचा रूप घेऊन दारूचा धंदा करतो. अशा अनेक रुपांतराच्या कल्पना या लोककथांतून दृष्टीस पडतात.

**३. ७. ११. देवादिकांना कोंडणे:**

देवांना कोंडणे, देवांना बांधून ठेवणे, स्वतःच्या हुशारीने देवांवर मात करणे, देवांच्या कपटपणाला दाद न देणे, देवांना शक्य नसलेले काम शक्य करून दाखवणे, देवांबरोबर मैत्री ठेवणे अशा अनेक कल्पना या लोककथांतून दिसून येतात.

देवकणसराच्या कथेत देवकणसरा मुलीचे रूप सोडून शेतीचे रूप घेते त्यावेळी कोणाकडूनही ती ओळखली जातनाही. ती ओळखली जात नाही याची शिक्षा म्हणून सर्व देवांना महादेव कोंडून

देतो. शेवटी सामान्य दिसणारा कुणबी तिला ओळखतो आणि देवांची सुटका होते. हीच लोककथा विजया सोणार यांनी संकलित केली आहे. त्यातही वरील प्रसंग जवळजवळ सारखाच रेखाटला आहे.[१६]

'सतरपती पाटील' या लोककथेतील सतरपती पाटलाच्या मृत्यूची माहिती बैलाकडून मिळताच तो बैलाच्या सहाय्याने युक्ती योजून मृत्यूदेवतांना तळघरात फसवून नेऊन कोंडून ठेवतो. पण मृत्यू अटळ असल्याने बारा वर्षांनी काहोईना देव मुक्त होऊन पाटलाचा मृत्यू होतो अशी हकीकत कथेत दाखवली आहे. हीच लोककथा डांगमधूनच 'एक पाटीलनी गोठ' या नावाने डॉ. पुंडलिक पवार यांनी संकलित केली आहे. थोडेफार प्रसंग इकडे तिकडे झालेले असून देवांना कोंडणे हा कल्पनाबंध मात्र जशाचा तसाच आला आहे.[१७] नुसते देवांनाच कोंडल्याची कल्पना लोककथांमध्ये असते असे नाही. एखादी अट, एखादा पण कोण्यातरी व्यक्तीने पूर्ण केला नाही की, त्याला कोंडण्याची शिक्षा दिली जाते. अशीच एक लोककथा 'डांगच्या लोककथा भाग-१' या दुर्गा भागवतांच्या पुस्तकात सापडते. त्यात राजाने आपल्या मुलीच्या लग्नासाठी एक पण ठेवलेला असतो. तो अनेक राजकुमारांकडून पूर्ण न झाल्याने त्यांना कोंडून ठेवले जाते व नंतर मारले जाते.[१८]

**३. ७. १२. नावे धारण करण्याची पद्धती:**

नावे धारण करण्याची एक अनोखी पद्धती या लोककथांमधून दिसून येते. जसे सोनपूरनगरला सोनायदेवळीला राहणारी ती सोनावती राणी, सावायनगरला राहणारी ती सावाय राणी, जमसेदपुराला राहणारा तो जमसेदवाणी. ही स्थानविशिष्ट नावे आहेत. म्हणजेच त्या त्या स्थानावरून त्यांची नावे पडलेली आहेत. जंगलातील औषधी वनस्पती म्हणून वनसापती, पळस या झाडाचे वन म्हणून पळसवन, उंबर या झाडाचे वन म्हणून उंबऱ्यावन. ही जंगल आणि वनस्पतीयुक्त नावे आहेत. रसोडा बनवणारा तो रसोड्यादेव. ('रसोडा' हा गुजराती शब्द असून त्याचा अर्थ 'स्वयंपाक' असा होतो.)

दुर्गाबाई भागवत वरील नाव धारण करण्याच्या विशिष्ट पद्धतीला अधिक बळकटी देतात. त्या म्हणतात, "काजळावती, जीवनावती, शेंदरावती, हळदावती, चाफावती अशी नावे (लोककथांमध्ये) आढळतात. ती काजळ, जीवन, शेंदूर, हळद, चाफा यावरून पडलेली आहेत. नगरांची नावे राजांच्या नावावरून पडली आहेत. दशरथाचे दशरथपूर, नेमीचे नेमीपूर, गोपाळचे गोपाळपूर, दुधमीचे दुधमीपूर वगैरे."[१९]

सूर्यदेवाच्या बहिणीचे नाव मुरुदेवकन्या असे कथेत सांगितले आहे. मुळात मुरु हे एका छोट्याशा माशाचे नाव आहे. मुरुमासा डांगच्या नद्यांमध्ये भरपूर प्रमाणात उपलब्ध असतो. परंतु या कथेत मुरु माशाशी कुठेही संबंध जोडल्याचे दिसत नाही. मुरुदेवकन्या फक्त एकदाच तिला फुलदाण आल्यानंतर नदीला अंघोळीसाठी गेली होती. एवढा नदीचा संबंध सोडला तर कुठेही मुरुमाशाचा संबंध नदी-नाल्याशी जोडल्याचे सापडत नाही. त्यामुळे ह्या नावाची योजना का केली असावी हे समजायला मार्ग नाही.

याच मुरुदेवकन्येचा पती इंदोलीदेव याच्या नावाची मात्र फोड करता येते. इंदोली हे एका पक्ष्याचे नाव आहे. हा चिमणीसारखा छोटासा पक्षी असतो. (शिवाय तो माशांचे भक्षण करत नाही हेही येथे नमूद केले पाहिजे. नाहीतर कोणी भक्षाच्या दृष्टीने या पक्षाचा आणि मुरुमाशाचा संबंध जोडू

शकतो. पण तसेही नाही.) इंदोली हे पक्ष्याचेच नाव आहे हे याच कथेवरून स्पष्ट करता येते. जेव्हा मुरुदेवकन्येचा विवाह करायचा असतो तेव्हा सूर्यदेवाने एक पण ठेवलेला असतो. तो पण म्हणजे 'काळ्या वावराला सव्वाखंडी तिळी पेरून ती परत तेवढीच्या तेवढीच वेचून द्यायची.' हा पण पूर्ण करणे सामान्य माणसासाठी अतिकठीण आहे. त्यासाठी येथे पक्ष्याची योजना केली असावी. शेतात बी पेरले की, पक्षी ते बी वेचून खातात हे शेतकरी चांगलेच जाणून असतात. हीच कल्पना मध्यवर्ती ठेवून इंदोली पक्ष्याचे नाव दिले गेले असावे. हा पण पूर्ण करण्यासाठी इंदोलीदेव इतर इंदोलींना आमंत्रित करतो. म्हणजेच इतर पक्ष्यांना आमंत्रित करतो. तो इतर पक्ष्यांच्या मदतीने पण पूर्ण करतो असे सांगितले आहे. जमिनीत पेरलेले दाणे पक्ष्यांना वेचणे कठीण नाही. यावरून इंदोलीदेव हे नाव एका पक्षाचे आहे हे सिद्ध होते.

अर्थातच ही नावे धारण करण्याची पद्धती फक्त लोककथांपुरतीच मर्यादित आहे असे नाही. खऱ्याखुऱ्या जीवनातही अनेक नावे या पद्धतीची दिसून येतात. जसे की, बुधवारी जन्माला आला म्हणून बुध्या, सोमवारी जन्माला आला म्हणून सोम्या, गरोदर स्त्री जंगलात गेली असता एखाद्या झुरुडाचा आश्रय घेऊन बाळाला जन्म दिला म्हणून झुर्ड्या, जन्मताच निश्चल पडून असल्याने कोणीतरी देवाला नवस केले व देवाने त्या बाळाला जीवदान दिले म्हणून त्याचे नाव जिवल्या. करवंदीच्या जाळीचा आश्रय घेऊन जन्माला आल्याने त्याचे नाव करुंद्या. अशी अनेक उदाहरणे या डांग भागात सापडतात.

### ३. ७. १३. जेवणाआधीचे सोपस्कार:

दारात कोणी आले तर त्याला किमान पाणीतरी विचारावे, जेवत असताना कोणी आले तर त्याला जेवण विचारावे, एखाद्याने मदत मागितली तर त्याला मदत करावी असे संस्कारशील माणसे सांगतात. डांग भागातही जेवणाआधी काही सोपस्कार केले जातात. त्याचे दर्शन त्यांच्याच लोककथांमधून घडते. सोनावती राणी नदीवरून अंघोळ करून आल्यानंतर झाडझूड करून स्वयंपाकाची तयारी करते. स्वयंपाक करून झाल्यानंतर ती आपल्या पतीला म्हणजेच महादेवाला जेवायला बोलावते. त्यावेळी महादेव येऊन जेवायला बसतो. परंतु त्याआधी पहिला घास घेऊन देव पुंजून देतो, दुसरा घास घेऊन कुत्रा पुंजून देतो, तिसरा घास घेऊन वळीची (आड्याची) उंदरं पुंजून देतो आणि चौथा घास मुखी झेलतो. जेवण करता करता अर्धे जेवण उरते ते बाहेर बसलेल्या कुत्रीला घालून द्यायला सांगतो. हे जेवणाचे सोपस्कार अनेक घरांतून दिसून येतात.

## ३. ८. निवेदनशैली:

लोककथा मौखिक परंपरेने पिढी दर पिढी चालत येतात. एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत जातांना त्यात अनेक बदल घडून येतात. यासंदर्भात कुमार कमलेश म्हणतात, "वाचिक परंपरा में सुनी हुई कथाओं को आदिवासी कथावाचक फिर-फिर कहता-सुनाता है | इस प्रक्रिया में प्रायः हर कथावाचक कथा को तोडता-मरोडता और कुछ-कुछ जोडता-हटाता है | इससे कई बार तो ऐसा भी होता है कि कथा के नायक, नायिका और निष्कर्ष तक बदल जाते हैं, लेकिन फिर भी कथा का आधार नहीं बदलता, वह ज्यों-का-त्यों रहता है |"[२०] लोककथा बदलता बदलता इतक्या बदलतात की,

त्यातील कथानायक किंवा कथानायिकासुद्धा बदलतात. शिवाय निष्कर्षसुद्धा बदलतात. असे असले तरी त्यातील मूळ कल्पना, आशय मात्र बदलत नाही.

कोणत्याही लोककथेत बदल घडवून आणण्यासाठी कथकाची निवेदनशैली महत्त्वाचे कार्य करते. हा निवेदक किंवा कथक आपल्या अनुभवानुसार त्यात अनेक नवनवीन कल्पनांची गुंफण करत असतो. काही घटना प्रसंगांची काटछाट करतो तर काही घटना प्रसंगांची भर घालतो. तो निवेदन करत असतांना श्रोत्यांचाही विचार करत असतो. श्रोते कंटाळलेले असतील तर अशा वेळी एखादा हास्य विनोदही कथेतून गुंफून देतो. समोरचा एखादा श्रोता झोपेच्या डुलक्या घेत असेल तर त्याचा कथा निवेदकाकडून चिमटाही घेतला जातो. कसे ते पहा, "काय पाहणा बरा र बा, जवाईनी नदर लावले, पोऱ्या ज आता मामासारखा उमद्यावाला, त मराया डोळं लावत नाय, खोडगीसारखा बसेल आहे, माझेसारखा भाऊ, एक पिंद्या निगांड्या, ना? तेलं काहाची झोप, इकडून खाया मिळताय का तिकडून खाया मिळताय. भाऊ नदरा लाव रं. भाऊ नदरा लाव तूऽऽऽ."[२१] येथे जावयाने नजर लावली आहे की, मामा डुलक्या खात असूनही आपल्या जागी खोडगीसारखा (खोडगी हे नांगराला अडकावण्याचे एक साधन असते.) बसलेला आहे. आणि मुलगा मात्र मामासारखा उमदा झालेला आहे तरीही डोळे लावत नाही. असा आशय यातून व्यक्त होतो. हा चिमटा घेताच समोरच्या श्रोत्यांमध्ये हसू उमटते. या हसण्याने झोपेला हुलकावणी दिली जाते. कथा निवेदकाला एखाद्या वस्तूची गरज असेल तर अशा वेळी तो कथेत कोणताही व्यत्यय न आणता कथेच्या रूपातच त्या लागणाऱ्या वस्तूचा निर्देश करून सूचना करतो. त्यामुळे श्रोत्यांना कथेत खंड न पडल्याने कंटाळा येत नाही व कथा दीर्घकाळ चालू राहते. मात्र असे अनेक बाहेरील प्रसंग अनेक कथा निवेदकांकडून वारंवार जोडले जात असल्याने कथेचा मूळ पाया कमकुवत होतो, कथेचा बाज बदलतो.

### ३. ९. कथन स्थळे:

लोककथा या डांगी आदिवासींसाठी अतिशय महत्त्वाच्या असून त्यांच्यात मुलाच्या पाचवीच्या दिवसापासून ते मृत्यूनंतर दशक्रिया विधीच्या आदल्या रात्रीपर्यंत वेगवेगळ्या प्रसंगी लोककथांचे कथन व श्रवण केले जाते. मूल जन्माला आले की, त्याच्या पाचव्याच दिवशी लोककथा लावली जाते. मुलाच्या भावी आयुष्यासाठी चांगले चिंतन केले जाते. त्यानंतर घराघरातून आजी आजोबांच्या रंजक कथा गोष्टी ऐकायला मिळतात. दोन व्यक्ती एकत्र आले की त्यांच्या कथांना उधान येते. हिवाळ्यात शेकोटीवर शेकत बसले असता अनेकांकडून भुताखेतांच्या रंजक कथा गोष्टी सांगितल्या जातात. शेताच्या बांधावर काम करून कंटाळा घालविण्यासाठी एखाद्या अनुभवी व्यक्तीकडून श्रमपरिहारासाठी कथा सांगितली जाते. ही कथा कथन करत असतांना मात्र कामात कुठल्याही प्रकारचा व्यत्यय येत नाही. उलट उत्साहात काम पार पाडले जाते.

डोंगऱ्या देवाच्या उत्सवातही थाळीकथा लावली जाते. बहुतेक लोककथा या थाळीवर लावल्या जातात. आणि त्यांचा मक्ता बहुतेक भगत लोकांकडेच असतो. हे भगत डोंगऱ्या देवाच्या स्थापनेपासून तर विसर्जनापर्यंत सर्व कार्यक्रम नियंत्रणात ठेवण्याचे काम करत असतात.

एखादी व्यक्ती मरण पावली असता त्याच्या दशक्रीयाविधीच्या पहिल्या रात्री जागरण केले जाते. यावेळी अनेक नातेवाईक जमा झालेले असतात. गावकरी जमा झालेले असतात. कथकर

बोलावला जातो. मृत पावलेली व्यक्ती पुरुष असेल तर त्याच्यासाठी गोपाळदेवाची कथा किंवा रंगूनदेवाची कथा सांगितली जाते. आणि मृत पावलेली व्यक्ती स्त्री असेल तर तिच्यासाठी साळवाची कथा सांगितली जाते.[२२]

### ३. १०. लोकजीवनात लोककथेचे स्थान:

डांग जिल्ह्यातील आदिवासी लोकजीवनात लोककथेचे स्थान उच्च दर्जाचे आहे. लोककथांकडे पाहण्याची दृष्टी भाविकाची आहे. ते मोठ्या श्रद्धेने लोककथांकडे पाहतात. त्यांचे श्रवण, पठण करतात. म्हणूनच त्यांच्या विधी उत्सवांमध्ये लोककथांची रेलचेल पाहायला मिळते. कथा गीतांशिवाय त्यांचे विधी उत्सव पार पडत नाहीत. त्यांच्या लोककथांत नदी-नाले, डोंगर-दऱ्या, पशु-पक्षी, झाडे-झुडपे, दगड-खुट, भुते-खेते, देवी-देवता इत्यादींचे आदरयुक्त, भीतीयुक्त, आश्चर्यकारक, कल्पनातीत स्वाभाविक चित्रण केलेले असते. हा आदर, ही भीती, हे आश्चर्य, ही कल्पना त्यांना स्वाभाविकपणे पिढी दर पिढी मिळत आली आहे. हा संचय त्यांनी आपल्या मन आणि मस्तिष्कात साठवून ठेवला आहे.

गायीला हे आदिवासी पवित्र मानतात. तिला मातेचं स्थान देतात. तिच्या शेणापासून घर सारवून स्वच्छ करतात. गोमुत्राला अतिशय पवित्र मानतात. त्याला ते गोमतीर म्हणतात. कुठेही कोणताही विटाळ झाला तर ते गायीच्या गोमतीराचा शिडकाव करून पवित्र करतात. गाय जिथे राहते त्या गोठ्यालाही ते पवित्र मानतात. म्हणूनच दिवाळीच्या सणाला गोठदाराशी एकतरी कडू चिबडाचा दिवा पेटवितात. गाय जिथे चरण्यासाठी जाते त्या डोंगरालाही ते देव मानतात. म्हणूनच ते डोंगऱ्यादेवासारखा उत्सव ठेवून त्यांची मनोभावे पूजा करतात. या डोंगर दऱ्यांविषयी अनेक लोककथा त्यांच्यात प्रचलित आहेत. त्यातून या आदिवासींना अनौपचारिक शिक्षणाचे धडे दिले जातात.

लोककथांमधून स्थानिक परिसराची माहिती प्रभावीपणे चित्रित केलेली असते. तेथील लोकांच्या प्रचलित समजुती, चालीरीती, गुणदोष, ऐतिहासिक घटना, भौगोलिक परिसर यांचा चांगला परिचय करून दिलेला असतो. कनसऱ्या, धनसऱ्या, गार्ड्या, केंब, अताळा इत्यादी डोंगरांची वैशिष्ट्ये, इतिहास पुराणातील महत्त्व लोककथांतून वर्णन करून सांगितली जातात. त्यातून त्यांच्या संस्कृतीमूल्यांची चांगली ओळख होते.

घरातील लहान मुलांना रिझविण्यासाठी ‘होली न होला’सारखी एखादी छोटीशी पण परिणामकारक कथा सांगितली जाते. ही कथा लोककथागीत या प्रकारातील आहे. त्यामुळे गीतात्मक कथा ऐकायला लहान मुलांना खूप आवडते. त्याचा चांगला परिणामही होतो. अशा लहानशा कथेतूनही आई वडिलांना मुलांची किती काळजी असते, ही शिकवण दिली जाते. म्हणूनच लोककथा या अनौपचारिक शिक्षणाचे एक प्रभावी माध्यम आहे असे मानले जाते.

### ३. ११. समारोप:

डांग जिल्ह्यातील लोककथांचे काही कथाविशेष व कल्पनाबंध आपण वर पाहिले. त्यात आधी बाहुला तयार करून मग त्यात आत्मा सोडून माणूस किंवा इतर देव-दानव, पशुपक्षी इत्यादी निर्माण केल्याची कल्पना आहे. एखादा सामान्य वाटणारा कुणबी शेतीच्या बाबतीत देवांपेक्षा हुशार

असून तो देवांच्या फसवणुकीला बळी पडत नाही. एखादा सामान्य वाटणारा पाटील देवांना कोंडून त्यांचे हाल करतो. देवांना न उचलवणारी कणसरा गबाळ्या वाटणारा कुणबी सहज उचलून घेतो आणि मोठमोठ्या देवांना शरमेने खाली पाहायला लावतो. त्यामुळे सामान्य कुणब्याची बाजू भरभक्कमपणे, प्रभावीपणे या लोककथांतून मांडली गेली आहे असे दिसते.

जगबुडीच्याही कल्पना सर्वत्र आढळून येतात. तशीच कल्पना जळींतकाराच्या कथेत सविस्तर आली आहे. पृथ्वीच्या निर्मितीसंबंधी जे एक गूढ सर्वत्र पसरून आहे त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न अशा लोककथांतून केलेले दिसून येते. पृथ्वीवर एकेकाळी पाणीच पाणी असल्याची कल्पना यामागे दिसते. आणि मग मातीचा शोध कसा लावला जातो हेही अशा कथांतूनच सांगितले जाते.[२३] यातूनच पाण्यावर तरंगणारा एखादा भोपळा दिसतो. त्या भोपळ्यात दोन बहिण भाऊ आणि मग त्यांचे देवांकडून मिलन असे एकूण चित्र दिसते. बहिण भावाच्या मिलनातूनच आजची मानव निर्मिती झाली आहे असे अनेक उत्पत्तीकथा सांगतात.[२४,२५] या ठिकाणी जगबुडीला जळींतकार, पाणजंजळ असे प्रभावी शब्द वापरलेले दिसतात.

या लोककथांत पशु, पक्षी, देव, दानव इत्यादींशी मानवाचा सहज संवाद घडून आलेला दिसतो. अनेक पशु, पक्षी मानवाची मदत करतांना दिसून येतात. यातून त्यांच्यात उपजत असणारी परतफेडीची, उपकारफेडीची भावना दिसून येते. शेवटी सत्याचा विजय आणि वाईटाची हार असे कथासूत्र या लोककथांतून ओवलेले दिसून येते.

घरातील वातावरण, दिनचर्या यांचेही यथोचित वर्णन केलेले असते. उदाहरणार्थ, स्त्रीने नदीवर अंघोळ करण्यास जात असता किंवा शेतात काम करण्यास जात असता बरोबर एखादा हंडा घेऊन जावे व येतांना विहिरीवरून भरून आणावे. जेणेकरून दोन खेपांऐवजी एकाच खेपेत काम पूर्ण होईल. घेरी येताच अंगण, ओसरी झाडून टाकावी व मग हात पाय धुवून स्वयंपाकाला सुरुवात करावी. अशी छोटी छोटी शिकवण या लोककथांमधून दिली जाते. म्हणूनच कुमार कमलेश म्हणतात, "आदिवासी नंगा जरूर रहता है, लेकिन गंदा नहीं रहता |"[२६] त्यांचाकडे साबण शाम्पू नसला तरी आजही काही आदिवासी स्त्रिया नदीवर अथवा घरी अंघोळ करतांना चिकनमाती किंवा चिकुरमाती केसांना लावून केस धुतात. ह्या मातीमुळे केस मुलायम आणि सुदृढ असतात. ते लवकर पांढरे होत नाहीत. हीच शिकवण या लोककथांतून वारंवार दिलेली दिसून येते.

*****

**संदर्भ ग्रंथ:**


१. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन-औरंगाबाद, आवृत्ती चौथी: डिसेंबर २०००, पृ. २०५
२. भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रूपरेखा, वरदा बुक्स-पुणे, चौथी आवृत्ती: जुलै २०१७, पृ. २०
३. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे अंतःप्रवाह, गोदावरी प्रकाशन-औरंगाबाद, द्वितीयावृत्ती: फेब्रुवारी १९९७, पृ. ४७
४. कालभूत पुरुषोत्तम, लोकसाहित्य: स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन-नागपूर, पहिली आवृत्ती: १० जानेवारी २००७, पृ. २०३
५. वाकोडे मधुकर-संपा., मराठी लोककथा, साहित्य अकादेमी-नवी दिल्ली, दुसरे पुनर्मुद्रण: २००६, पृ. प्रस्तावना- VI
६. भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रूपरेखा, वरदा बुक्स-पुणे, चौथी आवृत्ती: जुलै २०१७, पृ. ६७
७. तत्रैव, पृ. ७३-७४
८. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे अंतःप्रवाह, गोदावरी प्रकाशन-औरंगावाद, द्वितीयावृत्ती: फेब्रुवारी १९९७, पृ. ४५
९. भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रूपरेखा, वरदा बुक्स-पुणे, चौथी आवृत्ती: जुलै २०१७, पृ. प्रस्तावना: १७
१०. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन-औरंगाबाद, आवृत्ती चौथी: डिसेंबर २०००, पृ. २२३
११. तत्रैव, पृ. २२४
१२. कालभूत पुरुषोत्तम, लोकसाहित्य: स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन-नागपूर, पहिली आवृत्ती: १० जानेवारी २००७, पृ. २३५
१३. राजपूत भगवान, पालघर जिल्हा आदिवासी समाज: लोकजीवन व लोकसाहित्य, अथर्व पब्लिकेशन्स-धुळे, प्रथमावृत्ती: २०१७, पृ. ५०-५२
१४. नलगे चंद्रकुमार, ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, रिया पब्लिकेशन्स- कोल्हापूर, आवृत्ती: २९ ऑगस्ट २०१३, पृ. २५२-२५३
१५. गारे गोविंद- संपा., आदिवासी लोककथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन-पुणे, द्वितीयावृत्ती: २०१०, पृ. १४३-१४४
१६. सोनार विजया, आदिवासी कोकणांच्या कथा, गोदावरी प्रकाशन-औरंगाबाद, प्रथमावृत्ती: २४ डिसेंबर २०००, पृ. ६५-६६
१७. पवार पुंडलिक, डांगी लोककथाओ (समज अने समीक्षा), आशिष पब्लिकेशन्स-आनंद (गुजरात), प्रथमावृत्ती: २००६, पृ. २२८-२३१
१८. भागवत दुर्गा-खानापूरकर द. पु., डांगच्या लोककथा-भाग १, वरदा बुक्स-पुणे, पहिली आवृत्ती: १ ऑगस्ट १९९२, पृ. ११

१९. भागवत दुर्गा-खानापूरकर द. पु., डांगच्या लोककथा-भाग ३, वरदा बुक्स-पुणे, पहिली आवृत्ती: १५ मे १९९२, पृ. २८

२०. कुमार कमलेश, आदिवासी विमर्श: अवधारणा और आंदोलन, तेज प्रकाशन-नई दिल्ली, पहला संस्करण: २०१४, पृ. ३८

२१. काळे एस. एस.-प्रमुख संपा., आदिवासी साहित्य, आर्हत पब्लिकेशन आणि आर्हत जर्नल-बदलापूर, आवृत्ती: २९ जानेवारी २०१८, पृ. ८२-८५

२२. तत्रैव, पृ. ८१

२३. गारे गोविंद- संपा., आदिवासी लोककथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन-पुणे, द्वितीयावृत्ती: २०१०, पृ. १७७

२४. तत्रैव, पृ. ७७-८०

२५. देवगांवकर एस. जी.; देवगांवकर शैलजा, पाच आदिवासी जमाती, श्री साईनाथ प्रकाशन-नागपूर, प्रथमावृत्ती: १५ जानेवारी २०१८, पृ. १४४

२६. कुमार कमलेश, आदिवासी विमर्श: अवधारणा और आंदोलन, तेज प्रकाशन-नई दिल्ली, पहला संस्करण: २०१४, पृ. आत्मनिवेदन- vii

**साधन व्यक्ती:**

१. काकड राम वाडेकर, मु. देवगाव पो. पांगारणे ता. सुरगाणा जि. नाशिक

२. मनाज खिराडे, मु. देवगाव पो. पांगारणे ता. सुरगाणा जि. नाशिक

३. चंदर सोळे, मु. देवगाव पो. पांगारणे ता. सुरगाणा जि. नाशिक

४. सुलभाज खिराडे, मु. रांजूणे पो. पांगारणे ता. सुरगाणा जि. नाशिक

५. रामू काकड वाडेकर, मु. देवगाव पो. पांगारणे ता. सुरगाणा जि. नाशिक

६. गंगा आनाजी ठाकरे, मु. बरमेवड पो. घोट्यामाळ ता. आहवा जि. डांग

७. सुभासभाई गावित, मु. सुसरदा पो. साकरपातळ ता. वघई जि. डांग